# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० ७ माहे एप्रिल सन १८७८ इसवी. | अंक १४


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०।०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

सर्व लोकांस जाहीर व्हावें कीं, आज पासून पुढें दुसरी जाहिरखबर देईपर्यंत आह्मी आपल्या वऱ्हाडसमाचार छापखान्याचे म्यानेजर रा. रा. हरी रामजी अणवीकर यांस नेमिलें आहे तर ते कारखान्या संबंधी पत्रव्यवहार व बिलें वगैरे करतील तीं आणि पैसा घेतल्याच्या पावत्या देतील त्या आह्मांस मंजूर आहेत. कळावें ता० २२ माहे नोवेंबर सन १८७८ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Braanch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 percent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, an- upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November 1877.

## नोटिसा.

रामजी वल्लद मुकुंदा पवार जात ठाकूर रहाणार तर्फ अंदुरें तालुके बाळापुर यासी खाली सही करणार इजकडून देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून जनरीतीप्रमाणें मी तुझे एथें बरेच दिवस संसारही केला व तुझे पोटचा मला एक मुलगाही आहे. माझे पोटीं मुलगा असतां व तुझ्या माझ्यांत कांहीं तंटा बखेडा नसतां मला न विचारतां पाठाची बायको करण्याची जरूर नव्हती. असें असून माझ्या भावानें घेऊन जाण्याविषयीं तुला बरेच निरोप पाठविले पण अखेर तू घेऊन गेला नाहीं असें जाणून चार चौघे पंच मिळवून त्यांचे सांगण्यावरून तूं मला घरीं नेलें. तेव्हां मी तीन महिने तुझ्या पाशीं होते. तितक्या दिवसांत तूं जनरुढीप्रमाणें पूर्ववत् वर्तणूक न करितां मुला सुद्धां माझ्या खाण्यापिण्याचे हाल केले. तेव्हां माझी खात्री झाली कीं, या ठिकाणीं आपला निभाव लागत नाहीं असें जाणून मी आपले भावाचे घरीं पोरासुद्धां जाऊन राहिले. आतां या नोटिशीनें असें कळवितें कीं, जर तूं मला घेऊन जाऊन जनरुढीप्रमाणें वागवित असून खाण्यापिण्याची तजवीज ठवित असल्यास मी तुझ्याशीं संसार करण्यास राजी आहे. आतां मला एथें १० वर्षे रहावें लागल्यामुळें खाण्यापिण्याला व वस्त्रप्रावर्णाला दरमहा ६ रुपये प्रमाणें ६०० रुपये मला कर्ज झालें आहे. करितां मला वागविणें व नेणें असल्यास सदर्हू कर्ज फेडून १५ दिवसांचे आंत मला घेऊन जावें. नेणें नसल्यास फारकती द्यावी अगर कांहीं तक्रार असल्यास नोटिसीनें जबाब द्यावा. सदर्हू मुदतींत तूं एकही न केलें तर तुझा नवरेपणाचा हक्क कायदेशीर रीतीनें रद्द करून दुसरा गंधर्वाचा घरठाव करीन. कळावें, तारीख ३ एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) अहिल्या मर्द रामजी पवार
निशाणी हातची बांगडी.

---

नोटिस.

गंगाराम वल्लद सखाराम वाघ जात कुणबी रहाणार मौजे किनखेडें तालुके अकोट यास तानी मर्द गंगाराम वाघ हल्लीं वस्ती मौजे आगर तालुके अकोला इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा गंधर्वाचा नवरा असून गंधर्व झाल्यास सुमार दोन वर्षे झालीं या सदर्हू दोन वर्षांचे मुदतींत मी तुझे घरीं सुमार ४ महिने राहिले होते. व त्या मुदतींततच मला दिवस राहून एक मुलगा आहे पण सदर्हू ४ महिन्याचें मुदतींतच तूं मला फार सताऊं लागला व खाण्यापिण्यास देईनासा झाला म्हणून मी मोल मजुरी करून तुझेच गावांत सुमार आठ नऊ महिने अलग राहून घालविले पण तूं मला घरीं येऊं दिलें नाहीं व मजजवळ कांहीं नाहीं असें म्हणतोस म्हणून मी आपल्या भावाचे एथें गेले तरी तूं त्यानंतर माझी परत केली नाहीं. म्हणून आतां तुला माझी गरज नाहीं असें उघड होतें. आतां तुला वागविणें असल्यास ८ दिवसांचे आंत येऊन मला आपले घरीं घेऊन जावें अगर तू म्हणतोस त्याप्रमाणें तुजजवळ कांहीं नसून माझा संभाळ होत नसल्यास फारकती द्यावी म्हणजे मी दुसरा गंधर्वाचा घरठाव करून संसार करीन. म्हणून मुदतीचे आंत मला घेऊन जावें अगर जबाब द्यावा. या प्रमाणें न केल्यास तुझा नवरेपणाचा हक्क कायदेशीर रीतीनें रद्द करून गंधर्वाची तजवीज करीन. कळावें तारीख २ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) तानी मर्द गंगाराम वाघ
रहाणार आगर
निशाणी हातची बांगडी

---

जाहिरात.

नोटिस— पेठ खामगाव तालुके मजकूर एथील सर्वत्र लोक व पाटील कुळकरणी यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे पुत्र नगू व ओंकार रंगारी हे दोघे आगदीं गैर चालीचे असोन त्यांची वर्तणूक खराबचालीची म्हणजे नाचतमासे व ख्यालीखुशाली करितात, त्यांची इच्छा अशीच बहिवाट करण्याची दिसत आहे त्यांस आमचे नावलौकिकावर कोणी कांहीं एक कर्ज देऊं नये म्हणोन ही नोटिस दिली आहे. त्यास या नोटिशीचे तारखेपासून कोणी कर्ज दिल्यास त्याचे जाबाबदार आमचे पुत्र आहेत. आह्मी कांहीं त्याजबद्दल पैसा देणार नाहीं. व आमची जिदगीही जबाबदार होणार नाहीं व ह्या पूर्वींही त्यांची चाल खराब असल्याचे लोकांस ठाऊक असोन कोणी कांहीं त्यास दिलें असेल तर त्याचे जबाबदार तेच आहेत; आह्मी नाहीं या प्रमाणें मजकूर येथाकदम पाटील कुळकरणी खामगाव यांणीं खामगाव एथील सर्वत्र लोकांस मेहेरबानीनें जाहिर करावें अशी त्यांस विनंती आहे. ता. १ एप्रिल सन १८७८ इसवी.

[ सही ] धोंडीसा वल्लद गुलाबसा रंगारी वस्ती खामगाव दस्तूर खुद.

## जाहिरखबर.

"मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी" स्थापन करण्याचे संबंधानें पूर्वी दोन जाहिराती 'किरण' 'ज्ञानप्रकाश' 'इंदुप्रकाश' व इतर वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्याच आहेत. हल्लीं वर्गणीदार ८०० वर झाले आहेत, याजकरितां कोणा ग्रंथकाराजवळ छापण्यासारखीं पुस्तकें असून खर्चाचे वगैरे अडचणी मुळें त्यास छापवत नसतील, अगर प्रसिद्ध करवत नसतील, तर त्यांनीं पुस्तकाच्या, हातानें लिहिलेल्या अगर छापिल प्रती रावजी प्रभाकर भावे ट्रान्सलेटर, फर्स्ट क्लास सब जज्ज कोर्ट, पुणें, यांजकडे पुणें एथें, अगर रा. ब. माधवराव गोविंद रानडे किंवा रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांजकडे नाशीक येथें, ता. ३० एप्रिल १८७८ चे आंत पाठवून द्याव्या, म्हणजे त्यांची पुढें तजवीज पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें होईल.

रावजी प्रभाकर भावे

पुणें, ता. २७।३।७८.

☞ सदरील जाहिरात सर्व वर्तमानपत्रकर्ते व मासिक पुस्तककर्ते यांणीं आपापल्या पत्रीं निदान तीन वेळ लोकहितार्थ छापून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी करावी.
किरण.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

---

वाई — ता० १७ माहे मार्च १८७८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपल्या एखा अंकीं खालील मजकुरास जागा द्याल अशी उमेद आहे. ता. ८ मार्च १८७८ इ० रोजीं दोन प्रहरीं तीन वाजतां मिस्तर मारुती कडताजी पाटील सेगाव आनररी माजिस्ट्रेट वर्ग ३ व रजिष्टर हे रजेवर आले होते. त्यांनीं वाई तालुका मजकूर जिल्हा सातारा एथील नंबर ४ चे शाळेंत येऊन मुलांची परीक्षा घेऊन मुलांस मिठाई वाटली, व एथील मास्तर मि. महादेव सखाराम अभ्यंकर व त्यांचे असिस्टंट हे एकचित्तानें वागून मुलांचा अभ्यास चांगल्या प्रकारचा करविला असें भाषण करून तो रा लिहून ठेविला आहे. पत्रकर्ते महाराज पाटील हे वयानें लहान असून यांचे गुणाची स्तुती करावी तितकी थोडी आहे. कळावें लोभ आहेच हे विनंती.

गंगेचें पाणी आटत चाललें आहे धारण ६।६॥ शेरावर येऊन बसली. एथें एका ब्राह्मण स्त्रीनें तांब्या हरविला म्हणून जीव देण्याकरितां गेली होती तिला पकडून माजिस्ट्रेट साहेब यांजकडेस पाठविली त्यांनीं शिक्षा दिली. कळावें.

आपला
एक नूतन मित्र.

⁂ रा. रा. मारुती कडताजी हे आमच्या वऱ्हाडांतील शिगावचे पाटील व आनररी माजिस्ट्रेट आहेत. व यांचें लक्ष सुधारणेचे कामीं आपले प्रांतींच आहे असें नाहीं तर सुधारलेल्या दक्षिण प्रांतीं वाई सारख्या ठिकाणी जाऊन तेथील शाळेतील मुलांची परीक्षा घेऊन त्यांस उत्तेजनार्थ बक्षिस दिलें हें त्यांस मोठें भुषणाह आहे व इतर देशमुख, देशपांडे व पाटील यांस देखील हें कित्ता घेण्यासारखें वर्तन आहे. हें कळविण्यास आह्मास फार संतोष वाटतो.

ए. व. स.

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध ५ शके १८००

## रणधीर और प्रेममोहिणी.

या नावाचें नाटक नुकतेंच छापून प्रसिद्ध झालें आहे व त्याची एक प्रत ग्रंथकारानीं आह्माकडे पाठविली आहे हें गेले अंकीं आह्मी आपले वाचकांस कळविलेंच आहे आज त्यांतील संक्षिप्त माहिती आह्मी एथें देतों.

या नाटकाचा नायक रणधीरसिंह असून नायका प्रेममोहिनी ही आहे. रणधीर हा पाटणपतीचा पुत्र होता. पाटणपतीस दोघी बायका असून धाकटीच्या पुत्रास राजगादीचा अभिषेक करण्याचा त्याचा निश्चय झाला व त्याप्रमाणें युवराज्य त्यांस दिलेंही. तेव्हां रणधीरसिंह आपल्या सेवकजनांसह पित्याची आज्ञा घेऊन देशपर्यटणास निघाला तो सुरतपतीच्या नगरीं आला. सुरतपतीचा पुत्र रिपुदमन हा एके दिवशीं शिकारीस गेला असतां सिंहाच्या तावडीस सांपडला; पण तेथें रणधीरसिंहही अकस्मिक जाऊन पोंचला व त्यानें त्या सिंहाचा, सुरा भोंसकून प्राण घेतला व रिपुदमनाला सुरक्षित सोडविलें. तेणेंकरून रणधीर व रिपुदमन यांची मैत्री होऊन उभयतांत अत्यंत प्रेमभाव वाढला व एकमेकासाठीं एकमेकानें प्राणसुद्धां द्यावा अशा शपथा घेतल्या. पुढें सुरतपतीनें आपली कन्या प्रेममोहिनी इचें स्वयंवर मांडिलें व त्यानें असा पण केला कीं, जो कोणी शस्त्रविद्येंत परिपूर्ण ठरेल त्यास प्रेममोहिनी अर्पण करावयाची. असें ठरून तिथीचा निश्चय झाला व सर्व राजांस आमंत्रण पत्रिका पाठविल्या. नेमलेल्या दिवशीं सर्व राजमंडळ जमा झालें. रणधीरसिंह जरी नगरांतच रहात असे व रिपुदमनाशीं मित्रभाव असे तरी आपण राजकूलोप्तन्न आहों असें रणधीराकडून कोणासच समजलें नव्हतें ( त्यास कारण पाटणपतीचें व सुरतपतीचें पूर्वापार वैर असावें ) ह्मणून सदहू समारंभाचें रणधीरसिंहास पाचारण नव्हतें. तथापि रणधीरसिंह जात्या शूर असल्यामुळें आपले घोड्यावर बसून समारंभास जाण्यास सिद्ध झाला व मंडपद्वारीं आला, पण सुरतपतीच्या प्रधानानें 'एक परदेशीय गृहस्थ' जाणून आंत जाण्यास मनाई केली व टाकून बोलला. तेव्हां रणधिरानें आपले भाल्याचे योगें त्या प्रधानास आकाशांत उडविलें. हें पाहून सर्व भयाभीत झालें व या स्थितींतून जो कोणी प्रधानास वाचवील त्यासच प्रेममोहिनी मिळेल असा सुरतपतीनें दुसरा पण बोलून दाखविला परंतु त्यास सोडविण्याला जमलेल्या राजांपैकीं कोणीच समर्थ झाले नाहीं. शेवट रणधीरसिंहानेंच या प्रधानाला जमीनीवर आदळूं न देतां वरचेवर झेलून खालीं ठेविलें पण हें पाहून सुरतपतीला नवीन पण केल्याचा पश्चात्ताप झाला व हा पण फक्त राजेलोकांकरितांच होता असें ह्मणूं लागला तें अपमानकारक भाषण ऐकून रणधीरास अतिशय वाईट वाटलें. इतक्यांत दरबार खलास झाला व रणधीर आपल्या सिबीरास आला. नंतर रात्रीं सरोजनीं वेश्येचें नृत्यगान सुरतपतीनें करविलें व त्या प्रसंगीं सर्व राजास बोलाविलें होतें. याही प्रसंगीं रणधीर बोलावण्यावाचून राजमंडळांत जाऊन बसला हें पाहून सुरतपती व इतर सर्व राजे यांचे मस्तकांत तिडीक उठली तथापि रिपुदमनास फार आनंद झाला. तेणेंकरून बाप लेकाशीं कुरबूर होऊन लागलीच दुफळी झाली ह्मणजे या सर्व समाजांत रणधीर जो एकटाच एके बाजूस होता त्यास रिपुदमन ही सहाय्य झाला व बापाची मर्यादा न ठेवितां रणधीराची गुणप्रशंसा करूं लागला व मजलस बेरस होऊन गेली. नंतर सुरतपतीनें सर्व राजांशीं तिसरा पण असा केला कीं हा रणधीर आमचा शत्रू आहे याचा जो नाश करून येईल त्यास मी आपली कन्या अर्पण करीन. हें ऐकून सर्व राजांचे दळभार रणधीराचे घरावर चालून गेले. व हें पाहून रिपुदमनही आपली सर्व सेना घेऊन रणधीराचे संरक्षणार्थ गेला. तेथें उभय सैन्याचें तुमुल युद्ध झालें आणि रणधीर व रिपुदमन यांणीं सर्व राजमंडळ संहारिलें पण इतक्यांत रिपुदमन हा पडल्याची बातमी रणधीरानें ऐकिली व मोठा शोक केला. व राहिलेल्याचा संहार करून आपण प्रेममोहिनीच्या महालाकडे चालता झाला. कारण या पूर्वीं रणधीर आणि प्रेममोहिनी एकमेकांचे गुणानुवाद ऐकून एकमेकांस मोहित झालीं होतीं इतकेंच नाहीं तर त्यांची एकांतांत गाठ पडून गंधर्व विवाहही झाला होता व एकमेकानें एकमेकांस प्रेमबंधानें घट्ट आवळून टाकिलें होतें. ह्मणून युद्धांत विजयी होऊन तचाचोतिचे महालांत गेला, मोठें प्रेमयुक्त तिच्याशीं भाषण केलें व रिपुदमनाच्या मरणामुळें प्रीतीस्तव आपला प्राणत्याग करण्याचा दृढ निश्चय कळवून देहावसान ठेविलें. त्या सरशीच प्रेममोहिनीनें आपले शरीर ठेवून परलोकवासी झाली. हेंही सुरतपतीनें पाहून अतिशय शोक केला व त्यास रणधीर, रिपुदमन व प्रेममोहिनी यांचे परस्पर प्रीतीविषयीं मोठा चमत्कार वाटला; या मृत शरीरांचें दहन वगैर करीत असतां पाटणपतीही रणधीराचे शोधार्थ तेथें आला व पुन्हा सर्व शोक समुद्रांत गटंगळ्या खाऊं लागले. याप्रमाणें या नाटकाची गोष्ट रचिली आहे. या शिवाय मधून मधून नाथुनाम, सुखवासीलाल, निरंजन चौबे व सोमदत्त यांचीं मारवाडी, उर्दू, व्रिजि व गुजराथी या भाषेंतून उत्तरें प्रत्युत्तरें चांगली आहेत. तशीच मालती, चंपा यांचीही भाषणें खुबीदार आहेत.

हिंदी भाषेंत साधारण पत्र जरी लिहावयाचें असलें तरी त्यांत एक दोन दोहरे व कांहीं जंगीक नियमांस अनुसरून दाखले लिहिण्याचा प्रघात सामान्य प्रतीच्या लोकांत सुद्धां चालू आहे. मग हा ग्रंथ दिल्ली एथील सदादर्श नामक वर्तमान पत्राचे एडिटर अशांचे हातून नाटकरूपांत तयार झाला आहे तेव्हां तो किती उत्तम प्रकारचा झाला असेल याची कल्पना वाचकांचे मनांत सहज येईल. यां नाटकांतील बहुतेक पात्रांचीं भाषणें बोध घेण्यासारखीं, दूरदृष्टीचीं, पूर्ण विचाराचीं व ईश्वरी नियमांस विरोध न आणणाऱ्या दाखल्यानीं पूरित आहेत. याचें कथानक जरी विशेष खुबीचें व कौशल्याचें आहे असें वाटत नाहीं तरी यांतील नाथूरामाचा व्यापारी कावा, सुखवासीलालचें खुनसी व कृतघ्नतेचें वर्तन, रिपुदमनाचें चातुर्य व मित्रप्रीतीसाठीं जीव देण्याची शिकस्त, रणधीरसिंहाचा पराक्रम व वेश्येच्या ठायीं रत न होण्याविषयीं दृढनिश्चय आणि प्रेममोहिनी व रणधीर यांचें परस्पर प्रेम हे भाग माठे चित्तवेधक आणि चातुराईचे आहेत.

आपल्या इकडे मराठी भाषेंत बरींच नाटकें रचलेलीं आहेत तथापि परभाषेंतील लोकांकरितां नाटकें करावयाचीं झटलीं ह्मणजे "प्रमिलास्वयंवर" 'गोपिचंद' व "अफजुलखानाचा मृत्यू" व कसें तरीं दामाजीपंताचें या चोहोंशिवाय पाचवें सांपडत नाहीं. पंरतु या 'रणधीर और प्रेममोहिनी' नाटकाचा आमच्या इचलकरंजीकर गुणीजन नाटककारांस चांगला उपयोग होऊं शकेल. व इतर हिंदी भाषा जाणणारास तसेंच तें बालबोध लिपींत छापलें असल्या कारणानें, महाराष्ट्र जनांसही हिंदी भाषेचा संस्कार थोडा बहुत झालेला असतोच ह्मणून हें त्यांस सुद्धां संग्रह करण्यास योग्य आहे. याचा सांचा डेमी षोडष पत्री असून पृष्ठें १०८ आहेत व किंमत ८८ आणे ठेविली आहे तीही ग्रंथाचे योग्यतेकडे पाहिलें असतां फार थोडी आहे ह्मणून याचा सर्वांनीं अवश्य संग्रह करावा असें कळवून ग्रंथ कर्त्यांची व आह्मी आपल्या वाचकांची रजा घेऊन हा लेख पुरा करितों.

## घर फिरलें कीं घराचे वासे पण फिरतात.

मनुष्याचें दैव अनुकूळ असलें ह्मणजे माती धरल्या सोनें होतें. व्यापारांत बढती होते, रनांत जयप्राप्त होतो व नम्र होऊन वेड्या पिशा सारखा जरी भटकं लागला तरीं साधू, तपस्वी, वैरागी अशीं मोठमोठीं विशेषणें त्याला मिळून सर्व जगांत अगाध कीर्ति होते; पण तें दैव जेव्हां प्रतिकूळ होतें तेव्हां महा रत्नाच्या गारा होतात. व्यापारांत तोटा येऊन दिवाळें निघतें, क्षुल्लक प्राण्यांचे हातून गजेंद्रादिकांचा पराभव होतो व पंचाग्नि साधन आणि धूम्रपान इत्यादि क्रूर तपें आचरणाराही ढोंगी ठरतो हे सर्व दैवाचे चमत्कार आहेत. ह्मणून कोणी दुःख दारिद्र्य भोगित असला तर त्याची हेळणा करणें अगर कोणी सर्व ऐश्वर्य संपन्न पाहून त्याचा मत्सर करणें हें बरोबर नाहीं. ईश्वरानें ज्या स्थितींत ठेविलें आहे ती मोठ्या आनंदानें ग्रहण करावी. व त्यांत समाधानमानावें.

कोणी ह्मणतात असल्या स्थितींत समाधान मानून जर सर्व लोक राहिले असते तर आज जी जगाची स्थिति दृष्टीस पडते ती कधीं पडली नसती व नव्या नव्या सुधारणा झाल्या नसत्या. हेंही ह्मणणें खरें आहे. परंतु आजवर जग सुधरत जाऊन उत्तम दशेस पोंचलें आहे तें समाधान वृत्तीनें न पोंचतां धडफडत राहिल्यानें व इतरांचा मत्सर केल्यानें पोंचलें काय? नाहीं. समाधान वृत्तीवाचून कोणतेंच काम निर्विघ्न पार पडावयाचें नाहीं. ह्मणून दैन्य दशास प्राप्त झाली असतां सन्मार्ग धरून मोठ्या शांततेनें ती सहन केली पाहिजे ह्मणजे इश्वराच्या इच्छामात्रें ती क्षणांत लयास जाऊन अनैच्छिकसुखप्राप्ती होईल. पण जर त्या दुःखद स्थितीचा तो कांटाळा मानून दुराचरणावलंबनानें तिचा त्याग करावयास पाहिल तर त्या स्थितीपासून त्याची सुटका न होतां त्याचा मात्र त्या योगें चुराडा होण्याचा संभव आहे. ही गरीबाविषयीं गोष्ट झाली- आतां श्रीमंताविषयीं पाहूं जातां तिकडेही असाच प्राकार लक्षांत येतो. तशांतून गरीबांची तरी गोष्ट असो पण श्रीमंतानीं तर प्राप्त झालेल्या सामर्थ्यानें अनाथाची हेळसांड न करितां सर्वोपरीं प्रतिपाळच करणेंच योग्य आहे. कारण या जगांत ईश्वराखेरीज जर दुसरी कोणतीच वस्तु शाश्वत नाहींतर धनद्रव्याचा व ऐश्वर्याचा काय भरवसा? कांहीं नाहीं. कारण ज्या शरीररूपी पायावर ही इमारत रचावयाची आहे तो पायाच मूळीं अशाश्वत व नाशिवंत आहे मग ऐश्वर्य व धनद्रव्य हीं तर केवळ दुपारची सावली आहे. ह्मणून यांत दंग रहाणें व त्याचे भरवशावर अनाथाची हेळसांड करणें कोणासच विहित नाहीं.

आज हे विचार सुचण्यास कारण ता. २९ मार्च १८७८ चे दीनबंधूंतील लेख झाला. आडाणी चांभाराचा पालथा संसार, सांधतां येईना जोडा, घेतो रोटाचा विसार" या सदरा खालीं वर्तमान पत्राचे संबधानें नवीन झालेले कायद्याबद्दल मजकूर लिहितांनीं ते सरकारास दोष देऊन ह्मणतात. ते असें:—

"आमच्या सरकारच्या राज्य कारभारांत जातील तिकडे मुसळाचे भारेचेभारे जातील. नाहीं तर कुसळाचे आगराचा पण प्रवेश होणार नाहीं. अशीं उदाहरणें अनेक आहेत. त्यापैकीं आह्मी एथें एक लहानसें उदाहरण देतों तें येणें प्रमाणें:—

केवळ दहापांच कुबुद्धी व हेंकड वर्तमान पत्रकर्त्यांनीं सरकाराविरुद्ध दुष्ट बुद्धीनें लिहिण्याची वहिवाट घातल्या मुळें अज्ञानी शूद्रादि अतिशूद्र लोकांचीं मनें राज्य निष्ठेपासून भ्रष्ट होत आहेत या भयास्तव सरकारानें एकाएकी रात्रीचा दिवस करून तत्संबंधी एक नवीन कायदा केला, हें यथायोग्य केलें, ज्या आवडंबर शाळा खात्या कडील हजारों शिक्षक लोक शाळेंत शिकवितांना अथवा सभेनीं भाषणें करतांना आडपडद्यानें सरकारच्या विरुद्ध गोष्टी सांगून अक्षरशून्य शूद्रादि अतिशूद्र लोकांचीं मनें भ्रष्ट करीत नसतील हें कशावरून? व या विषयीं आमच्या मशोधक सरकारानें कधींतरी शोधकरून पा

हिला आहे काय? आह्मास असें वाटतें कीं शिक्षक लोकांच्या राज्य निष्ठेविषयीं सरकारची खात्री झाली आहे ह्मणूनच स्वस्थ बसलें आहे कीं, काय?"

आतां या अशा लिहिण्यांत दीनबंधूकर्ते यांस काय वाटत असेल तें असो. आह्मास तर वाटतें कीं, कोणत्याही कामांत सरकारास दोष देणें योग्य नाहीं. कारण सरकारास जे कांहीं कमी जास्त करानें लागतें तें २४ कोट प्रजेच्या सुखासुखाचा विचार करून करावें लागतें तेव्हां तें करणें जसें कोणास हितावह होतें तसें कोणास अहितकारकही होत असेल हें उघड आहे. ह्मणून देव दानवाचे वेळचें वैर मनांत आणून संधी साधून कोणा एका जातीवर आग पाखडून सरकारची त्यावर इतराजी होण्याकरितां अगर आपल्यावर पूर्ण कृपा होण्याकरितां भलतेंसें लिहिणें दीनबंधू ह्मणविणारांस कसें शोभत असेल तें असो.

चांगल्या व वाईट वर्तणुकीचे लोक सृष्टी उत्पन्न झाल्यापासून हाकालपर्यंत आहेत इतकेंच नाहीं तर पुढेंही सृष्टीलयास जाईपर्यंत रहाणारच आहेत. ह्मणून आजवर कोणी असा नियम ठरवून टाकिला नाहीं कीं, अमुक जातीचे, धर्माचे, व देशाचे लोक बरे किंवा अमुक अमुक वाईट. मनुष्याचें बरेंपण किंवा वाईट पण त्याचें त्याच्या बरोबर असतें यास उदाहरण— बाप कितीही दुष्ट स्वभावाचा असला, तरी मुलगा सद्गुणी निघतो त्याचप्रमाणें बाप मोठा पंडित असला तरी मुलगा मूर्ख निपजतो इतकेंच बस आहे. यावरून कोणती ही जात बरी किंवा वाईट ठरविण्यास आपल्या जवळ बिलकूल आधार नाहीं. मनुष्य हा केवळ संवयीचा गोळा आहे त्यास ज्या वळनांत घालाल तें वळन लागेत.

कोणत्याही देशांत तथील लोकांचे ठळक ठळक ४ वर्ग देशाचे व्यवस्थे करितां करावे लागतात त्याप्रमाणें हिंदुस्थानांतही ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ग पुरातन काळीं कल्पिले आहेत. यांत आपापल्या धंद्याच्या योगानें इतर गोष्टीकडे दुर्लक्ष्य होऊन एक देशीय असें ठरीव वळण लागतें यास अनुसरून या देशांतील विद्येनें अंग कसें तरी ब्राह्मण जातींत राहिलें व इतर आपल्या उद्यो धंद्यांत निमग्न राहिले. इतकेंच नाहीं तर अजूनही कांहीं लोक असे कापी आढळतात कीं, इंग्रज सरकार जबरदस्तीनें विद्यामृतपान करवीत असतां आपली दांतखिळी गच्च बसवितात; पण घटकत नाहींत व तेणेंकरून सरकारची विद्यावृद्धि करण्याविषयींची उमेद नाहींशी होऊं पहाते. तेव्हां हा दोष कोणावर घालावा? दीनबंधूचे लेखाचा झोंक अशाप्रकारचे दोषारोप बहुतकरून ब्राह्मणावर घालण्याचा असतो व तसाच आजही याबरील लेखांत असावा असें दिसतें. नाहींपेक्षां "शाळाखात्यांतील लोक मुलांची व सभेच्या द्वारें लोकांची मनें कशावरून भ्रष्ट करीत नसतील" असा प्रश्न केला आहे यास काय आधार आहे? व यावरून सरकारानें एकदम शाळाखातेंच बंद करून टाकावें कीं काय? किंवा त्या खात्यांतून ब्राह्मण तेवढे काढून टाकावें व तेथें सर्व शेतकऱ्यांची भरती करावी ह्मणजे सुरळीत चालेल? आमच्या मतें तर या अप्रयोजक सूचनेंत कांहीं अर्थ नाहीं. इंग्रज सरकार दूरदर्शी व पूर्ण विच्यारी आहे. त्यानें कोणतीच एक जात ग्राह्य अथवा त्याज्य मानिलेली नाहीं. त्यांची सर्वांवर सारखी नजर आहे. यांत किमपि संदेह नाहीं.

कांहीं वर्षां पूर्वीं मुंबईबंदरांत पाहूं जातां शिरस्तेदार कारकून या धंद्याचे लोक परभू जाती खेरीज दुसऱ्या जातीचे मिळत नसत व तेणेंकरून "परभू" हें नाव केवळ शिरस्तेदार कारकून अशा आर्थानें उपयोगांत घेतलें जात असे पण हल्लीं तेथेंच पाहूं जातां अठराही वर्णांतील लोक शिरस्तेदार व कारकून झालेले आहेत तेव्हां त्यांस परभू लोकांनीं मना केलें काय? नाहीं. त्याचप्रमाणें हल्लीं सर्व जातीचे लोक थोडे बहुत सर्व खात्यांत सांपडतात.

हे इंग्रज सरकारच्या समदृष्टीचेंच फळ होय पण तेंदेखील दीनबंधूस सहन न होतां एका जातीस निराधार मोकलण्या विषयीं ते सूचना करतात यांत त्यांस काय भूषण वाटत असेल तें असो.

दयाळु इंग्रज सरकार अपराध्यास शिक्षा करण्यास जितकें उद्युक्त असते तितकेंच अपराध करणाऱ्या समुदायास सुमार्गीं लावून रवाबा ठेवण्यासही तत्पर असते तरच शिक, पेंढारी, गोंड इत्यादि रानटी जातीचे लोकांस दुराचरणापासून सोडवून खजिन्या सारख्या मौल्यवान व महत्विक ठिकाणचे त्यांस संरक्षक नेमिलें. हें आमच्या बंधूस माहित असलें पाहिजे. मग अशा भयंकर सुचनापासून व अवाच्य बलगणांपासून काय फळ व कशी सुख प्राप्ति व्हावी बरें! आधींच आपल्या देशास दैन्य दशा आल्यासारखें झालें आहे व त्या सर्वांचे बंधूत्व आमच्या बंधूनें आंगिकारिलें आहे ह्मणून एकाचे दुष्कृतीवरून त्या वर्गांत येणाऱ्या गरिब, अनाथ, सज्जनसांवर अशा सर्वचलोकांवर अरिष्ट लोटण्याचा प्रयत्न करणें हे तरी अवश्य वर्जिलें पाहिजे. असें आमचे निरभिमानत्वें व प्रांजळ बुद्धीनें नामधारी "दीनबंधू" यांस सांगणें आहे मग तिचा त्याग अथवा ग्रहण करणें त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे.

## मृत्यु

आह्मास कळविण्यास अतिशय दुःख वाटतें कीं वाशिमचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. वामन बाळाजी ओझरकर यांस पुणें मुक्कामीं ता० ३१ मार्च रोजीं देवाज्ञा झाली. हे खानदेशचे रहाणार असून ८।१० वर्षें एथील विद्याखात्याच्या डायरेक्टर साहेबांचे हेडक्लार्क होते व सन १८७६ चे अक्टोबर महिन्यांत हे वाशिम एथें डे. इ. इ. चे जागेवर गेले त्या वेळेस यांचे सद्गुणाविषयीं, हुशारीविषयीं, व लोकप्रियतेविषयीं कविता रूपानें मजकूर आमचे पत्रांत आला होता. त्यावरून व यांचे आंगचे सुस्वभावावरून थोडी बहुत माहिती सर्वांस असेलच ह. वाशिमास गेल्यापासूनच हवा न मानवल्यामुळें वगैरे दिवसेंदिवस कृश होत गेले. ह्मणुन गेल्या जानेवारींत ३ महिन्यांची रजा घेऊन ते हवा पालटण्याकरितां मंडलेश्वरीं गेले. पण तेथेंही त्यांची प्रकृति अधिक बिघडली ह्मणून फेब्रुवारी महिन्यांत ते पुण्यास गेले व नामांकित वैद्यांचे हातून १॥ महिनापर्यंत औषधोपचार केले पण ते लागू न पडतां उदररोगाचे योगानें सदर्हू तारखेस त्यांचें देहावसान झालें. यांचे अकाळीं मरणानें यांचे इष्टमित्रांस दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं. व यांचे कुटुंब, वृद्ध मातुश्री व अज्ञान कन्या पुत्र हीं तर अगदींच उघडीं पडल्या सारखीं झालीं. तथापि ईश्वर इच्छे पुढें उपाय नाहीं. त्याच्या इच्छेचें उल्लंघण करतां कामास नये इतकेंच लिहून हा दुःखद लेख आज आह्मी संपवितो.

## वऱ्हाड.

हवमान— या आठवड्यांत उष्णतेचें मान जरी पूर्वींप्रमाणेंच आहे तरी बुधवार गुरुवार या दिवशीं दिवस रात्र आकाश ढगानीं व्याप्त होतें व थोडा पाऊसही पडला तेणेंकरून लागलीच हवेंत गारठा आला होता. हवा अद्याप ह्मणण्या सारखा स्वच्छ नाहीं व धान्याचे भावांत फेर बदल नाहीं. तेल मात्र ७ रुपये मण होतें तें ८॥ पर्यंत गेलें आहे.

मे० डब्ल्यु. वी. जोन्स साहेब कमिशनर गेल्या गुरुवारीं उमरावतीहून एथें आले व करन्सी आफीस व खजिना यांची तपासणी करून दुसरे दिवशीं परत उमरावतीस गेले.

आमचे जुडिशियल कमिशनर मे. बेल सा. ब. यांची स्वारी लवकर सेशनाकरितां उमरावतीस जाणार. व तिकडून परभारेंच सा. ब, यांची स्वारी चिखलदऱ्यास जाईल असें ह्मणतात.

आमचे डिपुटी कमिशनर कर्नल मेन साहेब बहादूर गेले शुक्रवारीं नरनाळ्यास गेल्याचें समजतें.

आमचे हुशार व लोकप्रिय शानिटरी कामिशनर सरजन मेजर डॉ. आबट साहेब हे २ वर्षांचे रजेवर विलायतेस जाणार हें आह्मी मागें कळविलें आहेच. त्यांचा परत येण्याचा इरादा दिसत नाहीं ह्मणजे रजा संपतांच ते पेनशन घेणार असें ह्मणतात. ते गेले गुरुवारीं एथून बिदा होऊन गेले. यांस ता. ३ रोजीं एथील टाऊनहालांत पान सुपारीचा समारंभ झाला. त्या प्रसंगीं मे० जुडिशियल कामिशनर मेजर बेल साहेब, मे- देविस साहेब, डा. लिटल साहेब, मे. ग्रांट साहेब, इलिचपुरचे सर्जन मेजर इवंस साहेब, रा. ब. डायरेक्टर साहेब, मि. लक्ष्मीपति नायुडु बारिस्टर यांशिवाय क्लार्क, शिरस्तेदार, वकील व व्हाक्सिनेशन खात्यांतील लोक अशी बरीच मंडळी होती. सभेस आरंभ रा. ब. डायरेक्टर साहेब यांणीं केल्यावर मि. लक्ष्मीपती नायुडु यांणीं संभाषण केलें. नंतर मि. इमामबेग हे उर्दू भाषेंत डाक्टर साहेबांच्या स्तुतीपर दोन शद्ब बोलले. व त्यावर डा. आबट साहेब यांणींही उभें राहून सर्वांचे आभार मानिले. नंतर हार तुरे अत्तर गुलाब होऊन सभा विसर्जन झाली. या प्रसंगीं देवी खात्यांतील नेटिव्ह सुप्रिंटेंडेन्ट यांणीं चांगली मेहनत केली ह्मणून त्यांची आह्मी तारीफ करितो.

डा. आबट साहेब यांचें जागीं इलिचपुरचे सरजन मेंजर इवस यांची नेमणूक झाली, व ते काम पाहूं लागले.

वाशिमचे कायमचे पोलिस सुप्रिटेंडेंट मे. क्रिश्चन साहेब हे रजेवर विलायतेस गेले होते व त्यांचें काम मे. मोफेट साहेब हे पहात होते परंतु ता० १५ मार्च पासून तेही रजेवर गेल्या मुळें तेथील ए. अ. कामिशनर मे. अबदुल हक्क साहेब हे क्रिश्चन साहेब पो. सु .चें काम येईपर्यंत पहातील असें कळतें.

रा. रा- रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर उमरावती हायस्कुलांतील आसिस्टंट मास्तर यांची एथील हायस्कुलांत बदली झाल्या प्रमाणें गेले ते शुक्रवारीं एथें येऊन दाखल झाले व काल सकाळीं त्यांनीं आपले कामाचा चार्जही घेतला.

आमचे विद्याखात्याचे डायरेक्टर रा. ब. नारायण भाई दांडेकर यांचे चिरंजिवाचा वृतबंध आज तारेखस ३ घटिकेच्या मूहुर्तावर झाला. थोर लोकांचे रिवाजा प्रमाणें परवा संध्याकाळीं श्री राजेश्वरास अक्षत मोठ्या थाटानें गेली होती.

इलिपुरचे डिपुटी इजुकशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळाजी नृसिंह व उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजणी एम. ए. हे काल रोजीं एथें आले आहेत.

## वर्तमानसार

तुर्की फौजेंतील तोफखान्यानें बोयुकडेरी हें ठिकाण आपल्या ताबेंत घेतलें.

डान्यूब नदीवरील किल्ले तुर्की लोक खाली करून देणार होते पण हें काम तूर्त लांबणीवर पडलें.

जनरल इग्नातिफ व कौंट आंड्र्याशी यांची भेट झाली तेव्हां कौंट आंड्र्याशी यांणीं आस्ट्रो हंगेरियन लोकांचें हित कोणत्या गोष्टींत आहे हें स्पष्टरीतीनें सांगितलें. व आणखी असेंही बोलून दाखविलें कीं, तुर्क व रशियन यांचे मध्यें सान्स्टेफानो एथें झालेला तहनामा आस्ट्रोहंगेरियनच्या व युरोपांतील इतर राष्ट्रांच्या विरुद्ध आहे ह्मणून तो आह्मास कबूल नाहीं. जनरल इग्नातिफ यांणीं, ह्या गोष्टी आह्मी रशियाचे बादशहास कळवूं असें कबूल करून तेथून निघून आले.

धोंडपासून मनमाड पर्यंत सरकारी रेलवे करण्याचा जो कारखाना सुरू झाला आहे ती रेलवे पुरी झाल्यावर लागलीच धोंडपासून वेंगुर्ल्यापर्यंत एक सरकारी रेलवेचा फाटा करण्याचें काम सुरू होणार व ती रेलवे सातारा, कोलापुर, वगैरे वरून जाणार असे ह्मणतात.

गेल्या शुक्रवारीं मुंबईस फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटमध्यें वर्तमानपत्रकर्ते व त्यांच्या तर्फे आलेल्या मुकत्यारांची सभा झाली. सभेंत असा ठराव झाला कीं, जेणेकरून वर्तमानपत्रांस वजनदारी येईल, देशांतील घडामोडीविषयीं त्यांचे एकसारखे व योग्य प्रकारचे विचार होतील व त्यांत राज्यभक्ती वाढेल; हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां "कानूफरेन्स" नामक सभा स्थापन करावी. याप्रमाणें सभा स्थापन होऊन सभेचे अधिकाऱ्यांच्या नेमणुकी झाल्या नंतर सभा विसरजन झाली.

भयंकर अपघात— सतलज नदींतून एके दिवशीं एक बोट मजूर लोकांनीं भरून येत असतां पालथी झाली ह्मणून कळतें. सुमारें पन्नास लोक बोटींत होते. पैकीं चार पांच मात्र जिवंत सांपडले असें लिहिलें आहे.

येत्या मे महिन्याचे अखेरीस ह्मैसूरचे महाराजाचा विवाह होणार ह्मणून कळतें. या समारंभाप्रीत्यर्थ सोन्याचे व चांदीचे हौदे व दुसरें सामान तयार होत आहे.

ब्रह्मदेशांत तेलाच्या खाणी सांपडल्याचें मागेंच कळविलें आहे. हल्लीं असें कळतें कीं, बरोडगास या गांवीं तेल काढण्याचें काम सुरू आहे. एका खाणींतून प्रत्यहीं २०४ ग्यालन तेल निघत असल्याचें कळतें.

वायव्य प्रांतांत दुष्काळ संबंधानें जीं कामें सुरू केलीं आहेत त्यांवरील मजूरदार लोकांच्या संख्या पुढें दिल्या आहेत:— मथुरा जिल्ह्यांत ३१,६६२; आग्रा जिल्ह्यांत २२,८३९, बरेलींत ५,०००; लखनौ ९,०००; उन्नौ ६,०००; रायबरेली २४,६४२; हरदुई २१,७००, धर्मार्थ अन्न प्रत्यहीं ५,१८७ लोकांस मिळतें.

वादविवाद— नाशीक एथील प्रार्थनासमाजांत गेले रविवारीं रा. ब. गोपाळराव हरी, महादेव गोविंद व वे. रा. यादवशास्त्री टकले वगैरे मंडळी आली होती. तेव्हां प्रार्थना वगैरे झाल्यावर रा. ब. गोपाळरावजी यांणीं उपदेश केला त्यांत वे. रा. यादवशास्त्री व रावबहादूर यांचे उत्तर प्रत्युत्तर रूपानें बरेंच संभाषण झालें. त्यांत यादवशास्त्री यांचें ह्मणणें ईश्वर निर्गुण असून तो कांहीं करीत नाहीं. कर्माचे योगानें बरें किंवा वाईट व पर्जन्य पडणें व न पडणें वगैरे होतें असें असून त्या ह्मणण्याचें निराकरण रावबहादूर गोपाळराव हरी यांणीं अत्युत्तम केलें कीं, ईश्वर सगुण असून तो कर्ता आहे. कर्माचें फळ होणें किंवा न होणें हें ईश्वराधीन आहे. पर्जन्य पडणें किंवा न पडणें हे कर्माचें फळ नाहीं. ती सर्व सत्ता ईश्वराची आहे वगैरे याप्रमाणें संभाषण झाल्यावर रीतीप्रमाणें साख्या वगैरे ह्मणणे होऊन मंडळी गेली.

ने. ग्रो.

मुंबईची लिटगोची परीक्षा तारीख ८ एप्रिल रोजीं मुंबईस टाऊनहालांत सुरू होईल.

अ. द.

## खर्चाचें बजेट.

नुकताच हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटांत जमा खर्चाचा तक्ता प्रसिद्ध झाला आहे. यांत जमाखर्चाचे आंकडे पुढीलप्रमाणें दाखविले अहेत. १८७६।७७ चे वसूल रुपये ५६,०२,२२,७७० आणि खर्च ५८,२०,५०,५५०; दुष्काळाकरितां आलेला तोटा ३,४२,००,००० व पाटबंधारे वगैरे कामाकडे १८०९२८८० रुपये खर्च झाले. त्या शिवाय जमेपेक्षां २,१८,२७,७८० ज्यास्त खर्च झाला ह्मणजे त्या सालीं एकंदर जमा ५६,०२,२२,७७० व एकंदर खर्च ६१,६५,९०५५० यावरून त्या वर्षी जमे पक्षां सुमारें ६,००,००,०००० ज्यास्त खर्च झाला असें होतें. पुढें सन १८७७-७८ झालेल्या जमाखर्चाचे अदमासावरून जे आंकडे दिले आहेत त्यांत त्या वर्षी जमा ५६,३१,०९,००० व खर्च ६२,११,३०,००० असा दिला असून दुष्काळाकरितां ६,५०,००,००० व बंधारे वगैरे कामाकडे ४,८७,७०,००० खर्च झाले ते शिवाय करून ३,४३,१०,००० जमेपेक्षां ज्यास्त खर्च असें दाखविलें आहे. दुष्काळाशिवाय अदमासापेक्षां ३,०६,००,००० ज्यास्त जमा झाले. सन १८७७ ७८ सालीं एकंदर ८,६२,००,००० कर्ज काढलें आणि सुमारें ५,००,००० ह्मैसूर सरकारास व ५,००,००० शिंदे सरकारास दुष्कळाच्या कारणानें कर्जाऊ दिले आणि वर्षाच्या अखेरीस हिशेब बंद करण्याचे वेळीं शिलक १४,७५,००,००० होती यावरून १८७७—७८ सालींही सरकारानें जमेपेक्षां ८,२५,००,००० रुपये जास्त खर्च केले असें होतें.

१८६८—७९ सालच्या जमाखर्चाचे अदमासाचे जे आंकडे दिले आहेत त्यावरून समजतें कीं, इलाखयानिहायच्या करांचे २,७५,००,००० रुपये उत्पन्न होण्याचा अदमास असून त्यासुद्धां एकंदर उत्पन्न ६३,२५,००,००० दुष्काळाकरितां बसविलेल्या करांचे उत्पन्न १२००,००० व थकलेल्या जमीन धाऱ्याचें उत्पन्न ६,७०००० आणि एकंदर खर्च ६१,०९,४२२०० व त्या पैकीं ५०००००० रुपये मद्रास इलाख्यांत दुष्काळा करितां व उत्पन्न होणाऱ्या कामांकडे ४५५५०००० खर्च होण्याचा अदमास असून ते शिवाय करून एकंदर २ १५, ६०००० रुपये खर्चापेक्षां जास्त जमा होतील असा अदमास आहे, हा केलेला अदमास नक्की हिसेबाच्या आंत कायम राहील तर फार बरें होईल. ह्या वर्षी नेटिव्ह राजांस कर्ज देण्याकडे वगैरे ६० लक्ष व ज्या रेल्वेस सरकार जामीन आहे अशा रेल्वेकडे १ कोटी रुपये ह्याप्रमाणें खर्च होईल व वर्षांच्या अखेरीस हिंदुस्थानच्या खजिन्यांत मागच्या वर्षी इतकी शिलक न रहातां १३ कोटी रुपये शिलक राहील असा अदमास आहे. ह्या वर्षी बहुतकरून दोन कोटी पंचवीस लक्ष कर्ज काढलें जाईल. १७ कोटी रुपये विलायतेस पाठविण्याकरितां ३ कोटी रुपये हुंडणावळ खर्च लागेल असा अदमास आहे. माळव्यांतील अफूचीं शेतें चांगलीं नसल्या कारणानें अफूबद्दल सरकारास ६ कोट रुपये उत्पन्न होईल. गेल्या जानेवारींत नवीन कर बसविण्याची जी व्यवस्था झाली आहे त्या करापासून सरकारास एक कोटी रुपये वसूल होईल व त्या शिवाय या सालीं नवीन कर वगैरे कांहीं बसविले जाणार नाहींत. पंधरा लक्ष पन्नास हजार उत्पन्न होणारा साखरेवरील कर बंद करण्यांत आला आहे. परदेशातून हिंदुस्थानांत येणाऱ्या कापूस, किरकोळ कापड, वगैरेवरील जकातीचें उत्पन्न दरसाल दोन लक्ष तीस हजार होत असे व त्याचप्रमाणें दुसऱ्या निरनिराळ्या २७ जिनसांवर असात जकातीचें उत्पन्न दरसाल पांच लक्ष चाळीस हजार होत होतें तें सर्व ह्या वर्षी बंद केलें आहे. रेल्वेची व्यवस्था ह्या वर्षी विशेष चांगली करण्यांत आली आहे व १८७७—७८ सालीं अशा रेल्वेंच्या व्याजाचा बोजा सरकारावर पडला नाहीं.

## साम

बाहेर बोलावयाची गोष्ट नव्हे परंतु अलीकडे आपल्या लोकांच्या मनांत इंग्लिश लोकांविषयीं मोठी, आढी पडून तिच्या योगानें त्यांचे तोंडांतून नानाप्रकारचे भयंकर आणि अनर्थोत्पादक उद्गार निघतांत, ही गोष्ट कोण सूज्ञ नाकबूल करणार आहे ? आणि ही मनोव्याधि लहान दहा दहा बारा बारा वर्षांच्या उनाड आणि बेबंद पोरांत देखील पसरत गेल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. आमच्या अल्प समजुतीप्रमाणें हा प्रकार आपल्या देशाच्या अहितास कारण होईल असें आह्मांस वाटतें. कोणी असें ह्मणतात कीं अशी अप्रीति आमचे ठायीं उत्पन्न होईल अशा वाईट रीतीनें इंग्लिशांनीं आह्मांशीं कशासाठीं वागावें ? होय आह्मी ह्मणतो. त्यांनीं असें वागू नये. हें खरें, पण ते वागतात त्यास आपण काय करणार? त्याजवांचून सध्या आह्मास दुसरी गती नाहीं. परमेश्वर भक्तीचा मार्ग खरोखर फार अवघड आहे, त्या मार्गानें जाणें ह्मणजे फार कठीण काम आहे, [illegible] सर्व गोष्टी खऱ्या. परंतु ज्यांस परलोक सुख साधावयाचें आहे; त्यांनीं देवाची निंदा केली असतां किंवा त्या मार्गास वाईट ह्मटलें असतां कांहीं उपयोग आहे काय? नाहीं, परमार्थ साधनार्थ त्या मार्गानें निमूटपणें गेलेच पाहिजे. त्याप्रमाणें, राज्याधिकार संबंधानें आपण तूर्त बहुत करून अनन्यगतिक झालों आहों. आपणांत शिवाजी राजा शूर होऊन गेला, त्यानें राज्य स्थापिलें होतें. तसाच "परवाचा शूर" ह्मणजे नानासाहेब. ह्यानें २ दिवस इंग्रज सरकारास घाबरविलें होतें; त्यांतलेच आपण असें ह्मणून कितो एक पुरुष. उगीच मुंडे ठोकितात आणि मिशा पिळवळून "एके दिशीं दाखवू" ह्मणतात हें शूरपण नव्हे; तर शौडादशिपाईपण आहे. साताऱ्याच्या राजपुत्रांस आणि राण्यांस केवळ संशयावरून इ. स. १८५७ सालीं एकदम शहरांतून काढून पाहिजे तिकडे दूर दूर नेऊन ठेविलें, डोसूमियासारखे लोक मल्हाररावास बाहेर न नेऊं देण्याविषयीं मिशावर ताव देऊन आणि हातांत हत्यारें घेऊन उभे राहिले असून परवा त्यांस पुटकर बडोद्यांतून काढून मद्रास दाखविली ह्या गोष्टी लोकांस अत्यंत दुःखप्रद वाटल्या. परंतु अशा गोष्टी पासून जगण्यापेक्षां मरणें बरें, असें समजून कोणी मायचा पूत त्यांस आडवा झाला काय ? नाहीं झाला हें फार शहाणपणाचें कृत्य झालें, कारण कीं असा जर कोणी पुढें येता तर त्यापासून दुसरें कांहीं एक निष्पन्न न होतां तो मात्र प्राणास मुकता. ह्या गोष्टी एकदेशीं आहेत त्या असोत. बंड उत्पन्न झाल्यानंतर इंग्लिश सरकारानें हिंदुस्थानच्या सर्व प्रजेचीं हत्यारें घेतलीं, हें त्यांचे केवढें धैर्य आणि आपलें केवढें अजागळपण झालें बरें! त्या प्रसंगीं ती गोष्ट मोठ्या नुकसानीची आणि फार शरमेची होती. तेव्हां तिच्याविरुद्ध एक शब्द तरी तोंडा बाहेर काढला काय!

ह्यावरून असें उघड सिद्ध झालें कीं; आपल्या राज्यकर्त्यांपासून आपणास आपण जर हित करून घ्यावयाचें आहे तर तें त्याजविषयींचा द्वेष मनांत धरून साधितां यावयाचें नाहीं; ह्मणजे आपणास हितावह अशी आपणाविषयीं भीति त्यांचे ठायीं उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आपले ठायीं सांप्रत नाहीं; तर मग आतां इष्टकार्य साधण्याचा एक उपाय राहिला. तो कोणता. तर आपणांविषयीं आपल्या राज्यकर्त्यांचे ठायीं प्रीति किंवा भक्ति उत्पन्न करणें. त्याचें अवलंबन आपणास केलें पाहिजे.

आमच्यांतील कितीएकांचा असा समज होऊन गेला आहे कीं इंग्लिश लोकांच्या अंतःकरणांत हिंदुस्थानच्या लोकांविषयीं खरें प्रेम किंवा खरी प्रीति कधींही उत्पन्न व्हावयाची नाहीं. हें मत अगदीं खोटें आहे. पहा मनुष्य कसाही उंच किंवा नीच स्थितीस पावलेला असो त्याचे अंगचे साधारण स्वभावसिद्ध मनुष्यधर्म कधीं नाहींतसे व्हावयाचे नाहींत. दुसऱ्याचें मन वश करून घेण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें मनुष्यमात्राचे ठायीं ठेविलें आहे, त्याप्रमाणें जे कोणी त्यांशीं शुद्धमनानें आणि निर्मळ नम्रतेनें वागतात, त्यांशीं शुद्ध प्रेमानें वागण्याविषयीं त्यांची वृत्ति अगदीं सहज व्हावी, अशी योजना त्या चतुर विधात्यानें करून ठेविली आहे. ह्याचे प्रचीतीचीं पुष्कळ उदाहरणें इतिहासांतरीं दृष्टीस पडतात. बिभीषण शत्रूचा प्रत्यक्ष बंधू असून दाशरथी रामाच्या पूर्ण कृपेस पात्र झाला. हें आपणा सर्वांस ठाऊक आहे. ही मनुष्या मनुष्यांतली तरी गोष्ट आहे. आंड्रोक्लिसानें, आपल्या शुद्ध नम्र भावानें आणि प्रीतीनें क्रूरांतला क्रूर जो पशु सिंह, त्यास वश करून आपणामागें एकादा कुत्र्याप्रमाणें हिंडायास लाविलें होतें. ही गोष्ट कांहीं कल्पित नव्हे, खरी आहे. असा जर खरोखर प्रकार आहे आणि इंग्लिश लोकांचीं मनें आपणाकडे वळवून घेतल्यावांचून जर आपणास दुसरें गत्यंतर नाहीं तर त्याविषयीं उद्योग केला असतां ते खचीत सफळ होतील. अशी उमेद धरण्यास आपणास तिळभर देखील शंका वाटूं नये.

पुढें चालू.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १४ माहे एप्रिल सन १८७८ इसवी. अंक १५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ॰४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १॰८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ॰१॰६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ॰१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ॰४ |
| ,, दुसरे खेपेस | ॰२ |

## जाहिरखबर.

सर्व लोकांस जाहीर व्हावें कीं, आजपासून पुढें दुसरी जाहिरखबर देईपर्यंत आह्मी आपल्या वऱ्हाडसमाचार छापखान्याचे म्यानेजर रा. रा. हरी रामजी अणवीकर यांस नेमिलें आहे तर ते कारखान्या संबंधी पत्रव्यवहार व बिलें वगैरे करतील तीं आणि पैसा घेतल्याच्या पावत्या देतील त्या आह्मांस मंजूर आहेत. कळावें ता० २२ माहे नोवेंबर सन १८७८ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 per-cent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, an-upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November 1877.

## जाहिरखबर.

"मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी" स्थापन करण्याच संबंधानें पूर्वीं दोन जाहिराती 'किरण' 'ज्ञानप्रकाश' 'इंदुप्रकाश' व इतर वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्याचे आहेत.

हल्लीं वर्गणीदार ८०० वर झाले आहेत, याजकारितां कोणा ग्रंथकाराजवळ छापण्यासारखीं पुस्तकें असून खर्चाचे वगैरे अडचणी मुळें त्यांस छापवत नसतील, अगर प्रसिद्ध करवत नसतील, तर त्यांनीं पुस्तकाच्या, हातानें लिहिलेल्या अगर छापील प्रती रावजी प्रभाकर भावे ट्रान्सलेटर, फर्स्ट क्लास सब जज्ज कोर्ट, पुणें, यांजकडे पुणें एथें, अगर रा. ब. माधवराव गोविंद रानडे किंवा रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांजकड नाशीक येथें, ता. ३० एप्रिल १८७८ चे आंत पाठवून द्याव्या, ह्मणजे त्यांची पुढें तजवीज पूर्वीं प्रसिद्द केल्याप्रमाणें होईल.

रावजी प्रभाकर भावे

पुणें. ता. २७।३।७८.

☞ सदरील जाहिरात सर्व वर्तमानपत्रकर्ते व मासिक पुस्तककर्ते यांणीं आपापल्या पत्रीं निदान तीन वेळ लोकहितार्थ छापून प्रसिद्द करण्याची मेहेरबानी करावी.

## नोटिसा.

मि० महालिंगम पिल्ले डाक्टर रहाणार अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं. तुह्मी माझे मकानांत तारीख २० माहे आक्टोबर सन १८७८ इसवी रोजीं भाडें दरमहा ७ रुपये प्रमाणें कबूल करून राहिले परंतु आज तारखेपावेतों रुपये दिलें नाहींत व भाडेचिट्ठीही करून दिली नाहीं व आह्मी मकान खाली करून मागत असतां देत नाहीं. तर ही नोटिस पावल्या तारखेपासून ४ दिवसाचे आंत भाड्याबद्दल रुपये चुकते देऊन आमची रशीद घ्यावी आणि मकान खाली करून द्यावें असें न कराल तर आज तारखेपासून दरमहा रुपये १५ प्रमाणें भाडें घेतलें जाईल व रुपयाबद्दल दिवाणींत दावा करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां घेतले जातील. व आपण मोरींत लद्दा करून ठेविला त्या योगानें दिवाल फार भिजली आहे त्याची नुकसानी झाल्यास त्याबद्दलही नुकसानीचे रुपये तुमचेकडून घेतले जातील हें आपणास कळावें. तारीख ६ माहे एप्रिल सन १८७८.

( सही ) जोरावरमल गंगाधर साहू
दुकान अकोलें. तर्फे
जैराम बळवंत कुलमुक्त्यार
दस्तुर खुद्द.

नोटिस.

रा. रा. रामचंद्र वल्लद रामप्रसाद तिवारी वस्ती कसबे निजामपुर आडगांव बुजरुख ता. अकोट यासी नरसाजी वल्लद चहादाजी माळी वस्ती मौजे खंडाळें तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा आमचा १०।१२ वर्षांपासून घरोबा व प्रेम असल्यामुळें आमच्या मालाटालाची रकम तुह्मापाशीं ठेवित असो व खर्चास लागेल तसा पैसा उचलत असो. व सर्व सुरळींत चालत असे. पण सन १२८५ फसली सालचे आगष्ट महिन्यापासून तुमचा आमचा सफाईचा हिशेब अजून झाला नाहीं. या अलिकडच्या मुदतींत मालाचे व रोख चिल्हर चिल्हर मिळून सुमार १६४० सोळाशें चाळीस रुपये तुह्मापाशी आह्मी ठेविले व चिल्हर रितीनेंच सुमार ८५२॥=॥ अठशें बावण साडेदाहा आणे तुह्मापासून खर्चाकरितां वगैरे उचलले ही रकम वजा जातां तुमचे जवळ आमची ७८७।–॥ सातशें सत्यांशी रुपये साडेपांच आणे फिरतात पण त्याचा तुह्मी हिशेब करीत नाहीं व आमची सर्व बाकी देत नाहीं. आह्मी दोस्तीच्या नात्यानें हिशेब करण्यासाठीं दोन च्यार वेळ ह्मटलें पण तिकडे तुह्मी लक्ष्य दिलें नाहीं. ह्मणून निरुपाय होऊन ही नोटिस देणें भाग पडलें. तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचा हिशेब पंचमार्फत करून निकाल करावा. व घरोबा कायम ठेवावा या मुदतीचे आंत सदरी लिहिल्याप्रमाणें तुह्मी न केल्यास सदहू रकम मिळण्याविषयीं दिवाणी कोर्टांतून तजवीज करावी लागेल व तेणेंकरून कोर्टखर्च तुह्मावर बसेल. या नोटिशीचाही खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ६ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) नरसाजी वल्लद चाहादाजी माळी रहाणार मौजे
खंडाळें दस्तुर खुद्द.

नोटिस.

दावल, लक्ष्मण, होनू रामु व हिरामण जात बुरूड रहाणार पेठ खामगाव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मिती फाल्गुन शुध्ध ७ या रोजीं आमचे एथें लग्न झालें. त्या लग्नप्रसंगास आमचे सोयरे लोक इलिचपुर एथील आले होते त्यांस आमचे एथें ते लोक जेवले कारणानें त्या लोकांस जातीबाहेरील टाकण्याविषयीं पत्र लिहून त्याजला जातीबाहेर टाकिलें व आह्मासही एथें जातीबाहेर टाकिलें त्यास आमचे कडे कोणता दोष आहे हें तुह्मास विचारलें असतां सांगत नाहीं. करितां ह्या नोटिसीनें तुह्मास कळवितों कीं, आमचे कडे दोष आहे तो ही नोटिस पावल्यापासून चार दिवसांत आमचे पदरांत घालावा. या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचेवर आब्रूची फिर्याद करून आब्रूची नुकसान भरून घेऊ. कळावें ता. ८ माहे एप्रिल १८७८ इसवी.

[ सही ] फकिरा वल्लद नारायण
बुरुड रहाणार खामगाव
व परशराम वल्लद पुंजाजी
बुरुड वस्ती खामगाव
दस्तुर सखाराम महादेव.

नोटिस.

रा. रा. परशराम वल्लद रंभाजी काटोलें रहाणार मौजे काटेळ तालुके जळगाव पोष्ट तेल्हारे यांस लालचंद किसनदास साहू दुकान माळेगाव ता० अकोट पोष्ट तेल्हारे याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास मौजे काटेळ तालुके मजकूर पैकीं, सर्वे नंबर ३१, एकर ३२ व गुंठे ४ याचा आकार रुपये ६१ चा एक व काकणवाडे एथील सर्वे नंबर २० एकर १६ व गुंठे १७ याचा आकार रुपये ३२. एकूण नंबर २ तुह्मी आह्मास विकत दिले असून खरेदी देते वेळेस, त्यांस दुसऱ्या कोणाचे हिस्से वगैरे नाहींत. ह्मणून तुह्मी लिहून दिलें आहे. असें असतां साल मजकुरीं काकणवाडे एथील शेतांत रा. बाबुजी वल्लद भोनाजी डामरे यांणें आपला ३ रा हिस्सा रजिस्टराचा पुरावा दाखवून आह्मापासून हिस्सा आणि मालाचे रुपये भरून घेतले. व तहशिलदार साहेबाचे मार्फत हिस्सा वाटून घेतला. त्यास वरील नुकसानी बद्दल ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचे दुकानीं येऊन आपसांत निकाल करावा. तसें न केल्यास कोर्ट मार्फत तजवीज करणें प्राप्त होणार आहे. कोर्टाचा आणि नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ८ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) लालचंद किसनदास साहू
दुकान माळेगाव
दस्तुर उत्तमचंद

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध १२ शके १८००

## व्यापारावरील कराच्या संबंधानें सुरत एथें दंगा

या कराच्या संबधानें जागोजाग सभा वगैरे भरून सरकारास कायदशीर रीतीनें अर्ज केल्याचें वर्तमान आह्मी मागें कळविलें आहेच पण गेले आठवड्यांत सुरत एथील लोकांनीं गैरशिस्त रीतीचें वर्तन करून दंगा वगैरे केल्याचें वर्तमान प्रसिद्द झालें होतें. तथापि तें इतक्या थरास जाईल असें वाटत नव्हतें. ह्मणजे तेथें नवीन बसणाऱ्या कराच्या संबंधानें यादी वगैरे गावांत सुरू झाल्या. कर देण्यास पात्र अशा लोकांस नोटिसा दिल्या तेव्हां तेथील व्यापारी लोकांनीं कट करून एक दम सर्व दुकानें बंद केलीं व दंगा कर-

ण्यास आरंभ केला. असा अविचाराचा प्रकार पाहून तेथील अॅक्टिंग कलेक्टर मि. आलिव्हंट साहेब यांणीं तेथील प्रमुख व सभ्य व्यापारी वगैरे लोकांची सभा भरवून हा गैरशिस्त प्रकार बंद करण्या विषयीं सर्वांस उत्तम प्रकारें समजूत दिली. व त्या प्रमाणें त्या प्रमुख शेटे लोकांनीं वगैरे सर्वांस समजून सांगितलें पण तो बोध त्या अडाणी लोकांचे हृदयांत बिंबला नाहीं व त्यांनीं हळुहळु दंगा करणें सुरू केलें.

तारीख ९ मिनहू रोजीं सर सुरत एथें सुमार २५००० हजार लोक एकत्र जमून तेथें ज्या सुताच्या व कापडाच्या गिरण्यांचे काम चालत होतें तेथें गेले व आपण जशीं दुकानें बंद केलीं तसेंच गिरणीचेंही काम बंद करा असें गिरण्यांवरील म्यानेजरास धमकी देऊन सांगितलें- तेव्हां इतक्या लोक समूहाच्या दर्पानें गिरण्यांचें काम बंद पाडणें जरूर झालें. नंतर ती लोकांचो अम्मेत कलेक्टर साहेबांचें बंगल्याकडे जाण्यास वळली. पण मध्यें तेथील पोलिस सुप्रिन्टेंडेन्ट व इतर एक दोन थोर गृहस्थ भेटले त्यांनीं त्या बिथरलेल्या लोक समूहास सामोपचारानें सांगितलें कीं, हें असें व्यर्थ खूळ न करितां आपले उद्योगास लागा; पण तें सांगणें त्यांचे पथ्यास न पडतां त्या उपदेशकांवर त्यांणीं पाषाणवृष्टी सुरू केली. तेव्हां त्यांस आढोसा पहाणें जरूर झालें. ह्मणतें मि. खरशेटजी फरदुनजी यांचे दवाखान्यांत शिरले तरी दंगा करणारे लोक स्तब्ध न होतां त्या इमारतीवर देखील धोंड्याचा भडिमार करूं लागले. इतक्यांत तेथें पलटणीचे लोक येऊन पोंचले व त्यांनीं या बेफाम झालेल्या बाजारबुणग्यांवर गोळी सुरू केली. तेव्हां ते वनिये वगैरे लोक शुद्धीवर येऊन आपःपाल्या घराचा मार्ग शोधूं लागले. व अकालिक मेघ डंबर सर्व वितळून गेलें. मात्र चालू झालेल्या बंदुकीच्या गोळीनें २ इसम यमसदनास जाऊन पांच चार असामी जखमी झाले. त्यांत शाळेतून घरीं येत असतांनां हाय कोर्टाचे वकील मि नानाभाई यचें जावयासही गोळी लागून ते जखमी झाले. ही मात्र मोठी वाईट गोष्ट झाली. त्याचप्रमाणें मि. आलिव्हंट मि. व्हाईट, मि. जहांगिरशा पोलिस इन्स्पेक्टर हे सरकारी अधिकारीही थोडें जखमी झाले असें ह्मणातात. हा बिथरलेल्या लोकांचा मेळा कांहीं अपकार करण्याकरितां रेलवे लायनीवरही गेला होता व तेथें रेलवे पोलिस इन्स्पेक्टर मि. नवरोजी यांस कांहीं जखमा लागल्याचें समजतें.

या दंग्याचा आरंभ सोमापचाराचाच होता ह्मणजे सर्वांनीं आपलीं दुकानें बंद केलीं. व दारू पिणारे लोकांनीं दारूचे दुकानीं जाणें वर्ज केलें यांत कांहीं दंगा होण्याची गरज नव्हती. नंतर दारूचे मक्तेदार लोकांनीं सरकारांत गिल्ला केला तेव्हां त्यांसही सरकारानें स्वस्थ बसण्यास सांगितलें. याबद्दल कोणावर कांहीं सक्ति वगैरे केली असें थोडेंच. तेव्हां असा दंगा उद्भवण्याची कांहीं गरज नव्हती पण ज्यांणीं आपलीं दुकानें बंद केलीं होतीं त्यांस खुदबुदी सुटून त्यांनीं सर्व कारखानें बंद करण्याचा प्रयत्न चालविला व तेणेंकरून हें अरिष्ट वाढत गेलें. या अशा दंग्यापासून सरकार सदर्हू कर घेण्याचें बंद करणार असें तर नाहींच पण येणेंकरून एकदोंघे आपले जिवास मुकून बरेच लोक जखमी झाले आणि पुढारी अशा पन्नासेक लोकांस कैदेच्या शिक्षा मिळाल्या इतकेंच होऊन रहाणार नाहीं तर या अविचारी वर्तनानें सरकारचे मनांत पंगु बनलेल्या प्रजेविषयीं गैरभरवसाही उत्पन्न होण्याचा संभव आहे. कारण हे दंगा करणारे लोक जरि "सुंकरोसे." "सुंकसोसे." असें करणारे वानियेच होते ह्मणजे शुगिराई कोणीच नव्हते तरी यासाठीं सरकारास बरीच बंदोबस्ती करावी लागली शहरांतून जागोजाग पोलिसचे व पलटणीचे लोक ठेवावे लागले, फिल्यावर काळ्या पलटणीची योजना करावी लागली व तेथील ख्रिस्ती धर्मानुयायी सभ्य वार्यांस सुरत सोडून मुंबईत यावें लागलें. तेव्हां सरकारचे मनावर आपल्या विषयीं गैरभरवसा कसा उत्पन्न होणार नाहीं? होईलच.

आतां आमच्या व्यापाऱ्यापैकीं आह्मास कोणी असें आड येतील कीं जर आमच्या व्यापार धंद्यांत आधींच कांहीं कस राहिला नाहीं तर हा नवीन बसणारा लायसेन्सस्याकस कशाचे आधारानें द्यावा? तर त्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं इंग्रज सरकार हें पूर्वींच्या जुलमी राजांप्रमाणें नसून न्याय आणि दया यांणीं संपन्न आहे ह्मणून पूर्वींची दाद मागण्याची दांडगाईची रीति हल्लीं उपयोगी नाहीं आतां इतक्या दिवसाच्या सहवासानें आपणा सर्वांची इंग्रज सरकारच्या दूरदृष्टीविषयीं व पूर्ण विचाराविषयीं खात्री झाली असेल कारण इंग्रज सरकारचे कोणतेंच काम उतावीळपणाचें नाहीं. जें करणें तें शांततेनें करीत असतात ह्मणून त्यांस जें एक वेळ पाऊल पुढें ठेविलें तें मागें घेण्याचा प्रसंग येत नाहीं. पुढें पाऊल टाकून मागें घेणें हें अपेशकारक आहे. व अपेश हें मरणापेक्षांहीं वाईट गणलें आहे. वँ तें टाळण्या विषयीं आपले इंग्रज सरकार सदैव मोठ्या सावधगिरीनें वर्तत असते. तेव्हां आपणही आपल्या गीतेंतील 'संभावितस्य चाकीर्तिमरणादतिरिच्यते' या श्रीकृष्णाच्या वाक्याचा अगर प्रत्यक्ष आपले राज्यकर्त्यांच्या वर्तनक्रमाचा बोध कां न घ्यावा. ह्मणजे त्यांनीं बांधून दिलेल्या राजरोष मार्गानें का दाद मागूं नये व आलेलें संकट दूर करूं नये. यावर कोणी ह्मणतील कीं राजरोष मार्गानें जर दाद लागेनाशी झाली तर मग काय करावें? यावर आह्मी एकच सांगतों कीं अपंग व निराधारी अशा प्राण्याची दया येणार नाहीं असा पाषाण हृदयी मनुष्य कोणीच पृथ्वीवर असावयाचा नाहीं. तशा स्थितींत वैऱ्याला देखील दया आलीच पाहिजे. यदाकदाचित प्रसंगवशांत स्वार्थापुढें तशा दुर्घट स्थितीकडे सज्जनांचें देखील लक्ष पोचलें जाणार नाहीं तथापि आपण जर शुद्ध अंतःकरणानें व त्यांचे मन न दुखवितां वागूं लागलों तर केव्हां तरी आपली अडचणीची दुःखद स्थिति पाहून दयाळु सरकारास दया येईल. यांत संशय नाहीं [या शिवाय अधिक शंका असल्यास आमच्या पत्राच्या गेल्या अंकांत चवथ्या पृष्ठावर "साम" या सदराखालील निबंध पहावा) ह्मणून आडमार्गीं संचार न करितां राजरोष मार्गानेंच भ्रमण करावें ह्मणजे त्यांतच आपलें व आपले राज्यकर्त्यांचेही परमेश्वर कल्याण करील.

## ब्रह्म अथवा प्रार्थना समाज

मुळारंभापासून सर्व मनुष्य प्राण्यांचा जरी एकाच वर्गांत समावेश झालेला आहे तरी त्यांच्या वर्तनक्रमानें, उद्योग धंद्यानें व दिवसेंदिवस जग वाढत गेल्यानें आज त्याचे पोटभाग अते शेकडों वर्ग झाले आहेत. हें सिद्ध करण्याला फार दूर जावयास नको. आपल्या हिंदुस्थानांतील जातिभेदाकडे लक्ष्य दिलें असतां बस्स आहे. आपल्या देशांत हे जातिभेदाचें बंड किती वाढत गेलें आहे हें सांगावयास नकोच आहे. या शिवाय निरनिराळे मताचे अनेक पंथ स्थापन झाले आहे. व दिवसेंदिवस नवे नवे होतही आहेत. त्याप्रमाणें "ब्रह्मसमाज" अथवा "प्रार्थना समाज" या नावाची मंडळी थोड्या दिवसापूर्वीं मुळारंभीं राजा मोहनराय यांणीं कलकत्यास स्थापन केली नंतर तिची शाखा मुंबईसही सुरू झाली. अलीकडे या मंडळीचा प्रसार बराच होऊं लागून पंढरपुर, नाशिक इत्यादि क्षत्राच्या ठिकाणीं सुद्धां समाजाच्या शाखा स्थापन झाल्या आहेत.

हा समाज जरी नव्यानेंच स्थापन झालेला आहे तरी यांतील नियम आपल्या अनादि ह्मणविणार वेदाज्ञेच्या बाहेर नाहींत इतकेंच नाहीं तर यांतील बहुतेक नियम वेदाज्ञेच्याच आधारानें योजिलेले आहेत वर्तनक्रम कोणाचा कसाही असो पण सर्व पंथाच्या धर्मपुस्तकांत अन्यायाची आज्ञा सापडावयाची नाहीं. त्याचप्रमाणें वेद हें आपलें एक धर्म पुस्तक होय. ह्मणून त्याला सन्मान देणें व त्याच्या आज्ञा उल्लंघन न करणें आपलें कर्तव्यकर्म आहे पण या वेदमार्गाची प्रौढी जाणून युरोपांतील सुद्धां पंडित लोक याची कीर्ति गातात तेव्हां तेथें आपला काय केवा? पण मोठा दुर्दैवाची गोष्ट कीं अशा अमोल्य वेद विद्येचा दिवसेंदिवस लोप होऊन आज अगदीं आमचे ठायीं त्याचा अभाव झाल्या सारखें झालें आहे. आमचें तें धर्मपुस्तक खरें. पण आह्मी त्याच्या कित्येक आज्ञांचें उल्लंघन करून अनेक कुभांड मताचें अवलंबन करितों. इतकेंच नाहीं तर त्या आमच्याच धर्मपुस्तकांत कोठें काय आज्ञा देऊन ठेविली आहे याची सुद्धां आह्मास माहिती नाहीं. व नवीं नवीं मतें सुरू होऊं लागलीं आहेत व मतभेदाचें बंड वाढत आहे तरी दुःखांत सुखाची गोष्ट इतकीच कीं हा जरी नवा पंथ स्थापन झालेला आहे तरी आपल्या पूर्वापार रीतीचें पुनरुज्जीवन करणारा आहे. या समाजांतील लोक पापभीरू निर्दोष सदाचरणानें वागणारे व इश्वराचें अस्थिरत्व मानून प्रार्थना करणारे आहेत. या समाजांत शिरण्याकरितां जातिभेदाचा जरी विशेष अडथळा नाहीं तरी त्यांचें सन्मार्ग वर्तनाचे नियम पाळण्याविषयीं मनोवृत्तीचा निग्रह केला पाहिजे व असा निग्रह झाला ह्मणजे तोच साधू, तोच महापुरुष व तोच ब्रह्मवेत्ता आहे असें उघड होतें पण समाजाच्या संबंधानें थोडी दिलगिरीची गोष्ट समजण्यांत आली ती अशीः— कलकत्ता ब्रह्म समाजाचे प्रमुख सभासद बाबू केशव चंद्रसेन यांणीं आपल्या मुलीचा विवाह कुचबहारचे अल्पवयी महाराजाशीं लाविल्यामुळें त्या समजाचा नियम मोडला गेला व तेणेंकरून कलकत्ता ब्रह्म समाजांत द्वैत उत्पन्न झालें तें इतकें कीं, जें काम क्रोधाच्या सावलींत उभे रहावयाचे नाहींत ते हात घाईवर येण्याचा प्रसंग आला. आह्मास वाटतें कीं अशा प्रकारच्या सुधारलेल्या समाजांत अशा प्रकारचा कलह उत्पन्न होणें ह्मणजे त्या समाजास कलंक आणणोर कृत्य आहे, ह्मणून ज्या कलहानें आपला सर्व देश या दैन्यदशेस येऊन पोंचला तो कलह सुधारलेल्या ठिकाणीं अवश्य वर्ज केला पाहिजे तरच इह व परत्र सुख होऊन दुर्लभ इश्वरप्राप्तीचाही लाभ मिळेल.

## मलकापुर इं. म. शाळेंतील मुलांस बक्षिसें वाटण्याचा वार्षिक समारंभ

( लिहून पाठविलेला मजकूर. )

सदर्हू समारंभ तारीख २८ माहे गुदस्त रोजीं इंग्लिश हिंदुस्तानी शाळेचे इमारतींत मोठ्या थाटाचा झाला. समारंभास सुमारें १५०—२०० मंडळी हजर होती. सभेस प्रातःकाळचे सुमोरें ८ वाजतां प्रारंभ होऊन दहाचे सुमारास विसर्जन झालें. अध्यक्ष स्थान रा. सा. पुरुषोत्तमराव नारायण भट्ट ए. अ. क. यांणीं विभूषित केलें होतें. गावांतील बहुतेक शिष्ट मंडळी सरकारी नोकर, वकील, शेट सावकार वगैरे— हजर होती. शाळेचे हेड मास्तर रा. रा. हरि मोरेश्वर शेवडे यांणीं रीतीप्रमाणें सभेचा उद्देश सांगून व सदर्हू वार्षिक समारंभ इतका लांबण्याचें कारण वगैरे मंडळीस कळवून सभेस सुरुवात केली. तदनंतर हेड मास्तर यांणीं सन १८७७ सालाबद्दल शाळेच्या हकीकतीचा रिपोर्ट वाचला. रिपोर्ट वाचून झाल्यावर शाळेंतील कित्येक मुलांनीं इंग्रजी व मराठी कवितांचे नेचे मंडळीच्या मनोरंजनार्थ सुरस आवाजानें गाइलें. नंतर सन १८७७ सालचे वार्षिक परीक्षेंत पास झालेल्या मुलांस सरकारतून आलेलीं बक्षीस पुस्तकें सुमोरें पंचवीस रुपये किंमतीचीं अध्यक्ष रा. सा. पुरुषोत्तम रावजी यांणीं स्वहस्तें दिलीं. बक्षिसें वाटून झाल्यावर रा. सा. पुरुषोत्तम रावजी उभे राहिले व सुमोरें २० मिनिटेंपर्यंत उत्तम प्रकारचें वक्तृत्व गुणविशिष्ट आणि चित्तवेधक भाषण करिते झाले. त्यांनीं जुन्या व नव्या शिक्षण पद्धतीचा भेदाभेद लोकांस सांगितला. तसेंच व्यायामाच्या जरूरीविषयीं उचव दाखले वगैरे देऊन चांगलें प्रतिपादन केलें. ते ह्मणाले सर्व आयुष्यांतील

पुढचें सुख तारुण्यांत संपादिलेल्या शारीर शक्तीवर अवलंबून आहे. पूर्वींच्या रीतीप्रमाणें मुलांनीं तालीमबाजी करणें वगैरे गैरसमजलें जात होतें. परंतु आपले राज्यकर्ते यांणीं आपणास कित्ता घालून दिल्यापासून तो लोकांचा समज उडत जाऊं लागला आहे व आतां या गोष्टीकडे सर्वांचीं मनें लागत चाललीं आहेत. या गोष्टीचा विचार करणें ही अगदी खासगी संबंधाची गोष्ट आहे. हीं सर्व मुलें आपलींच आहेत. यांच्या शरीरसंपत्तीचा विचार करणें आपणा सर्वांस फार जरूरीचें आहे. इत्यादि उत्तम प्रकारचें संभाषण केलें. सदर्हू संभाषण झाल्यावर नवीन रीतीप्रमाणें सार्वजनिक मान्यतेचीं प्रदर्शक अशी एक मोठी टाळी झाली. नंतर सर्व शाळेंतील मुलांस आनंदविण्याकरितां आमचे अत्यंत उदार व लोकप्रिय रा. सा. पुरुषोत्तम रावजी यांणीं आणविलेली पांच रुपयांची मिठाई वांटली. नंतर व्यायामशाळेला अवश्यक असें सामान घेण्याकरितां वर्गणीची यादी करावी असा सर्वानुमतें विचार होऊन लागलीच यादी फिरविली व त्याच समेस अठ्ठावन रुपयांचे आंकडे पडले. ज्या उदार गृहस्थांनीं वर्गणीचे आंकडे घातले त्यांच्या नावांची यादी खालीं दिली आहे. वर्गणीची यादी फिरून झाल्यावर हेड मास्तर यांणीं शाळेच्या तर्फे सर्व लोकांचे त्यांच्या औदार्याबद्दल व व्यायामशाळेस मदत देण्याबद्दल प्रसंगोचित अशा भाषणानें आभार मानले. मग पान सुपारी, अत्तर, गुलाब हीं रीतीप्रमाणें वांटलीं जाऊन समारंभ समाप्त झाला.

एथील अधिकारी लोक व इतर ग्रामस्त लोक विद्येच्या कामाकडे फार लक्ष पुरवितात ही गोष्ट मोठी आनंद मानण्या जोगीं असून एथील लोकांस फार भूषणावह आहे.

—वर्गणी दिलेल्या लोकांचीं नावें—

| रुपये. | नांव. |
| --- | --- |
| १० | रा. रा. पुरुषोत्तमराव ए. क. अ. |
| ५ | ,, ,, त्र्यंबकराव यशवंतराव तहशी. |
| ५ | ,, ,, गणु बिन संभाजी पाटील. |
| ४ | ,, ,, मल्हार राव आबा साहेब. |
| ४ | ,, ,, काशी बदीउद्दीन अ. मा. |
| ४ | ,, ,, त्र्यंबकराव वकील. |
| ३ | ,, ,, रावजी राघव वकील. |
| २ | ,, ,, बाळुसा सावजी. |
| २ | ,, ,, पर्वत राव देशमुख. |
| २ | ,, ,, पांडुरंग गोविंद वकील. |
| २ | ,, ,, दामोदरपंत वकील |
| २ | ,, ,, बापुजी देशपांडे. |
| २ | " " मथुरादास बैजनाथ. |
| २ | ,, ,, अनोबा नांद्रेकर, |
| २ | " " हरि मोरेश्वर, |

याशिवाय १२ गृहस्थांनीं एक एक रुपयाचा आंकडा घातला, ते रुपये बारा, येकूण रुपये ६३ पैकीं पांच रुपयांची मिठाई.

## वऱ्हाड.

हवामान—उष्णता साधारण ऋतुमानाप्रमाणें असून परवा रात्रीं व काल सकाळीं पावसानें शिंपणें केलें. बाजारभावांत विशेष फरक नाहीं. तापाचा आजार चालू आहे.

श्रीमत् शंकराचार्य स्वामी यांची स्वारी आपल्या लवाजमासह एथें आली आहे व एक स्वामी महाराज पुण्याकडेही आहेत असें तिकडील पत्रावरून समजतें.

वाशिम जिल्ह्याचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टरची जागा खाली झाल्यामुळे तिजवर वाशिमचेच इंग्लिश मराठी शाळेवरील हेड मास्तर रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषि यांस अक्टिंग नेमिलें व ऋषि यांचे जागेवर रा. रा. पुरुषोत्तम गणेश केळकर कारंजा इं. म. शाळेचे हेड मास्तर यांस १०० रुपयांवर नेमिलें. यांचे जागीं गणेश अनंत वैद्य तळेगांव दशसहस्र एथील इं. म. शाळेचे हेड मास्तर त्याच पगारावर (७५) व तळेगाव एथें रा. रा. शिवराम रघुनाथ कुळकर्णी ज्यांस नुकतेंच एथील हायस्कुलांतून बाळापुरास नेमिलें होतें यांस नेमिलें आतां बाळापुरची मात्र काय मची शाळा लोअरक्लास झाली असावी असें वाटतें. कारण तेथें इंग्लिश शिकविण्याचें पूर्वीच बंद केलें आहे असें समजतें.

इलिचपुर एथील इंग्लिश मराठी शाळेचे हेड मास्तर रा. रा. केशवराव ब्रह्मगिरी हे रजेवर गेले होते ते तारीख ११ एप्रिल रोजीं परत येतांनां एथे मित्रमंडळीचे भेटीसाठीं वगैरे उतरले होते व दोन दिवस राहून काल आपले जागेवर रुजू होण्याकरितां इलिचपुरास निघून गेले.

शिगावाहून आलेलें "हैद्राबादी गुंडा" या सहीचें पत्र पोंचलें त्यावर सही नसल्या कारणानें त्या मजकुरास जागा देववत नाहीं.

ता. २० रोजीं अकोलें हायस्कुलांतील विद्यार्थी संस्कृत शाकुंतल नाटकाचा प्रयोग विद्वान् लोकां समोर करून दाखविणार आहेत.

( रेसिन्डेंसी आर्डवरून )

मि० शेख हिसामुदीन साहेब पोलिटिकल असिस्टंट व असिस्टंट क्यांटोन्मेंट माजिस्ट्रेट हे आफिसिएटिंग सेकंड क्लास होते ते थर्ड क्लास झाले.

मि० स्टेवर्ट हे फारेस्टकडे सब असिस्टंट कान्सरवेटर होते ते थर्ड ग्रेड असिस्टंट कान्सरवेटर झाले.

मे. सी. हार्डन सा. मागील सोमवारीं मुंबईस जाण्या करितां उमरावतीहून गेले. प्रथम हे १४ दिवसांचे रजेवर जाणार होते पण आयते वेळेस त्यांची पेनशन मंजूर झाल्याची तार आल्यामुळें सर्व सामाना सुद्धां ते गेले. पुढें तसेच मुंबईहून विलायतेस जाणार, यांनां बारा हजार रुपये बोनस [ बक्षीस ] व दरमहा २५० रुपये पेनशन मिळालें असें ह्मणतात. सा. ब. यांचे एकाएकीं जलदीनें जाणें झाल्यामुळें त्यांचे सन्मानार्थ तेथें जे समारंभ होणार होते ते तसेच राहिले. तेथील डे० कमिशनरचे कामावर कोण जाणार हें अद्याप कळलें नाहीं.

वाशीम जिल्ह्याकडे हद्दीवर हैदराबादेकडून मे. आ. रेसिडेंट साहेब कांहीं दुसरे सरदार मंडळीसह कांहीं स्वार वगैरे शिबंदी बरोबर घेऊन शिकारीकरितां आले होते असें ह्मणतात. शिकारींत ४।५ मोठमोठे वाघ मारल्याचें कळतें.

मि० कीन साहेब हे डा. क. आफीस हे ३ महिन्यांची रजा संपल्यामुळें उमरावतीस येऊन पुनः १ वर्षाचे रजेवर जबलपुराकडे गेले.

वाशिमचे तहशिलदार मि० बाकरअली यांस पुसद एथें, पुसदचे तहशिलदार मि० राद आमीरखान यांस चिखलीस, चिखलीचे मि० लक्ष्मण बाळाराम यांस मंगरूळास, व मंगरूळचे मि० शाबासखा यांस वाशमास याप्रमाणें बदल्या झाल्याचें कळतें. प्र. सिं.

## वर्तमानसार

### लढाई प्रकरण

ता. ६ —चीनचे किनाऱ्यावर इंग्लिश सरकारचें जें आरमार आहे त्यास कुमक होण्यासाठीं पेनिंकेप नामक तारू इं. स. नें रवाना केलें.

इंग्रज सरकार नुस्त्या हरकती काढीत आहे व जर करितां इंग्लंड आणि आस्त्रिया या उभयतांनीं रशियन सरकारास कांहीं सूचना केल्या तर उभयतांचा एक विचार होण्याचा संभव आहे असा मजकूर सेंटपिटर्सबर्ग एथील सरकारच्या पक्षांतील एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला आहे.

पासिफिक महासागरांतील इंग्रज सरकारचे आरमारास कुमक होण्याकरितां ट्रायंफ नावांचें लढाऊ जहाज पाठविलें आहे

बर्लिन ता. ६ — उइलियम बादशहाचा आजार बरा झाला.

कानस्टांटिनोपल ता. ६— नवें नवें रशियन सैन्य सांन्स्टेफयानो एथें येत आहे.

आपलें सैन्य स्वदेशीं परत जातांना बोयुकडेरेचे मार्गानें जावें ह्मणून रशियन सरकारानें फिरून तुर्कस्थानच्या सुलताना स सूचना केली आहे.

बुचारेस्ट ता. ६ — रोमेनिया प्रांताचे राजे प्रिन्स चार्लस यांणीं गार्डसचेकाफ यांस असें जाहीर केलें आहे कीं रोमेनियन सरकारचें सैन्य आपला सर्वांशीं नाश करून घेण्यास कबूल होईल परंतु शस्त्र देण्यास कधीं राजी होणार नाहीं.

सेंटपिटर्सबर्ग ता. ७ — रशियांतील वर्तमानपत्रांचें असें ह्मणणें आहे कीं इंग्रज सरकारानें मागितलेल्या गोष्टी नाकबूल करण्यास रशियन सरकाराची खरोखर मात बरी आहे.

नवीन कर्जाऊ रकम काढण्याविषयीं रशियन सरकारानें बोलणें चालणें सुरू केलें आहे.

कानस्टांटिनोपल ता ७ — तुर्की सैन्य बोयुकडेरी नामक ठिकाण आपले कबजांत फिरून घेण्याचे बेतावर आहे.

बर्लिन ता. ८एप्रिल—रशिया व इंग्लंड या उभयतांत सल्ला होण्याकरितां जर्मन सरकार मध्यस्ती करीत आहे.

भविष्य— वे. रा. रघुनाथ रामचंद्र गोखले टेंभूरकर ज्योतिषी यांणीं आपल्या देशी पंचांगावरून असें भविष्य केलें होतें कीं फाल्गुन शुद्ध १५ पासून ज्येष्ट अखेर धान्याचे भाव तेज रहातील पण त्यांनीं आतां रा. ब. प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे यांचे नवीन रीतीचे पंचांगावरून असें सिद्ध केलें आहे कीं सदरी मुदतींत सारखेच भाव रहातील इतकेंच नाहींतर थोडे उतरतीलही. हें पंचांग पूर्वींच्या जुन्या रीतीनें केलेल्या पंचांगा पेक्षां ज्या अर्थी अस्त; उदय व ग्रहणें वगैरे अधिक नक्या मानानें दाखविते त्या अर्थी इतर गोष्टीही याचेच अनुरोधानें बिनचूक घडल्या पाहिजेत असा शास्त्री बावाचा अभिप्राय आहे असें ज्ञानप्रकाशवरून समजतें.

आग्रा व ग्वालेर यांमधील स्टेट रेलवेचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे. आग्र्यापासून धोळपुरपर्यंत रस्ता तयार असून त्या गांवापासून ग्वालेरपर्यंत तयार होत आहे, येत्या हिवाळ्यांत ग्वाल्हेरीपर्यंत मालाच्या गाड्या जाऊं येऊं लागतील असें दिसतें.

मुंबई इलाक्यांत दुष्काळ अगदीं नाहींसा झाला असें आजच ह्मणवत नाहीं. कारण सुमारें अर्ध वर्षांपूर्वीं धान्याचा भाव जितका चढला होता तितका बहुतेक ठिकाणीं तसाचा तसाच आहे व दुष्काळ हिंदुस्थानांत इतर ठिकाणीं पडला असल्यामुळें धान्याचा भाव पूर्ववत प्रमाणें होण्यास आणखी बरेच दिवस लागतील. ही गोष्ट सरकारानें लक्षांत आणून ठिकठिकाणीं पुनः कामाची सुरुवात केली ही मोठी आनंदाची गोष्ट होय. पुणें जिल्ह्यांत भिमथडी व इंदापुर या दोन तालुक्यांत कामें सुरू केलीं. याचप्रमाणें नाशिक जिल्ह्यांत यवलें गांवास पाण्याचा चांगला पुरवठा व्हावा ह्मणून खर्डी तलावाचें काम सुरू केलें असून दिंडोरी तालुक्यांत काम सुरू केल्याचें कळतें. हीं कामें अपुरीं झाल्यास आणखी एक दोन ठिकाणीं कालव्याचीं कामें सुरू करावीं असें ठरल्याचें कळतें. ने. गो.

कलकत्ता येथील राव बहादूर बाबु कनय्यालाल देव यांणीं हिंदुस्थानांतील खाण्याच्या निरनिराळ्या पदार्थांच्या गुणाविषयीं माहिती दिली आहे ती येणें प्रमाणें:—

| पदार्थांची नावें | दर शेंभरास | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| तांदुळ……………… | ७ | ७८ | ? | १४ |
| आरोरुट व टापिओका | ४ | ८२ | १ | १३ |
| बटाटे……… ……… | २ | २३ | १ | ७४ |
| साखर ……………… | ० | १०० | ० | ० |
| लोणी व तुप……… | ० | १०० | ० | ० |
| गहु…………… | १३ | ७२ | २ | १३ |
| ज्वारी………………… | ९ | ७४ | १ | १६ |
| बाजरी………… | १० | ७३ | २ | १५ |
| कांजनी …… | १२ | ७० | १ | १७ |
| ओटमिल | १३ | ६९ | ३ | ११ |
| जव | ११ | ७२ | २ | १५ |
| मांस | १४ | ७ | १ | ७८ |
| शिजविलेलें मांस | २२ | १४ | १ | ६३ |
| चण्याची डाळ | १९ | ६२ | ३ | १६ |
| तुरीची वगैरे डाळ | २५ | ५८ | २ | १५ |
| मसुराची डाळ | २४ | ५९ | २ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चौळ्या | २९ | ६९ | ३ | १४ |
| हिरवे चणे व मूग | २९ | ३० | ३ | १३ |
| दूध | ५ | ८ | १ | ८६ |

☞ पहिल्या कोष्टकांत मांस उत्पन्न करण्याचें प्रमाण, दुसऱ्या कोष्टकांत उष्णता उत्पन्न करण्याचें. तिसरें मिन. ग्या. आणि चौथ्यांत पाणी व चरबी करण्याचें. दी. बं.

मुंबईची लिटलगोची परिक्षा ता. ८ एप्रिल रोजीं मुंबईस टाऊनहालांत सुरू होईल.

लंडन ता. १९ ची तार—कालरात्रीं हौस आफ् लार्डस मध्यें लार्ड विकन्सफिल्ड ह्मणाले कीं. कान्ग्रेस सें सभा भरण्याची आशा उरली नाहीं व भूमध्यसमुद्रांत समशक्तित्व बिघडल्याचा प्रकार प्रथम राणी सरकारच्या कानावर घालून. राखून ठेविलेले सैन्यास प्रसंगाकारितां बोलावलें परंतु हा प्रकार लार्ड डर्बी यांस न आवडून त्यांनीं राजीनामा दिला. मि. गाथोर्न हार्डी ( लढाई खात्याच मंत्री ) ह्मणाले कीं हल्लीं बोलावलेले लाक राखून ठेवले त्या अर्मी व मिलि शिपायांच्या लोकांपैकीं पहिल्या प्रतीचे आहेत व यांची एकंदर संख्या ३८ हजार आहे. इंग्लंडानें पूर्वेकडे सैन्याची स्वारीच काढल्यास मात्र त्यांत मिलिशिपायांचे लोक घालायाचे.

## कान्स्टंटिनोपल शहरची माहिती.

कान्स्टांटिनोपल या शहराकडे हल्लीं व त्याच लोकांचें लक्ष लागल्यामुळें त्याबद्दलची थोडी बहुत माहिती देणे या वेळीं बरेंच महत्वाचें आहे. या शहरास मुसलमान लोक स्तांबुल अथवा इस्तांबूल असें ह्मणतात. यांस प्राचिन काळीं वायझानशीझम असें नांव होतें, पण इसवी सन ३३ व्या वर्षीं कान्स्टनटाइन नांवाच्या बादशाहांन रोमन राज्याची हें शहर राजधानी करून त्यास कान्स्टंटिनोपल असें आपलेंच नांव ठेविलें. या घटके पासुन या शहरचें बरेंच महत्व वाढत चाललें आणि तेव्हांपासून वायझनटाइन बादशाहांनीं तें काबीज करीपर्यंत रोमन लोकांच्याच स्वाधीन होतें, व इसवी सन १४५३ या सालात तें शहर तुर्क लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतलें आणि त्या वेळेपासून तें सुलतानाची मुख्य राजधानी झालें आहे. या शहरच्या नजीक समुद्राचा एक फाटा सुमारें ५ मैल लांबीचा आला असून त्याच्या योगानें या शहरास अती मोठी मजबुती आली असून व्यापाराचीही उत्तम सोय झालेली आहे. हल्लीं ज्या भागास युरोपियन लोक इस्तांबूल असें ह्मणतात त्या भागासभोंवतीं वाइझेन्टाइन बादशाहापासून एक मजबूत कोट बांधलेला असून सुलतानांच्या राज्यांतही तो जास्त मजबूत केला आहे. या कोठाचा सभोंवार घेर सुमार १२॥ मैल असून यास २८ दरवाजे आहेत. आणि त्यापैकीं तापकापुसी नावाचा दरवाजा मात्र इतिहासांत फारच प्रसिद्ध आहे. कारण याच दरवाजानें तुर्क लोकांनीं प्रथम शहरांत प्रवेश केला व यथेंच पूर्वींचा शेवटचा राजा मारला गेला. हें शहर एका लहानशा डोंगराळ उंचवट्यावर असून याच्या भोंवतालच्या बागा, शहरांतील मोठमोठ्या मशिदी, राजवाडे, वस्ती ठेवण, समुद्राचा किनारा या सर्व गोष्टी मुळें त्यास एक विशेष प्रकारचीं शोभाच आलेली दिसते. एकंदरींत हें शहर दुरून पाहिलें असतां याची शोभा अनुपमेय आहे. पण जवळ आल्यावर याची रचना आपल्या कडील रिवाजाची असून हें सारखें वसविलेंलें नाहीं असें स्पष्ट दिसतें, तथापि क्रिमियन लढाईपासून याची बरीच सुधारणा होत चालली आहे. सन १८६५—६६ व ७० सालांत या शहरच्या एका भागास आग लागून सुमारें पाव मैल पर्यंत शहरांतील जुनी घरें फडशा उडाली आहेत. या शहरांत कित्येक ठिकाणीं ट्रामवेच्या गाड्या आहेत. ग्यालेटा नांवाचें ठिकाण जिनोइज लोकांनीं प्राचीन काळीं वसाविलेलें असून तें हल्लीं युरोपियन व्यापाऱ्यांचें मुख्य ठिकाण आहे. त्यांत निरनिराळ्या वखारी. दुकानें व रहाण्याचीं घरें बांधलेलीं आहेत, पण हें ठिकाण सर्व शहरापेक्षां फारच घाणेरडें असतें. या ठिकाणच्या पलीकडे एका टेकडीवर पिरा नांवाचें ठिकाण आहे तेथें परकीय राष्ट्रांचे वकील असतात. १८७० सालीं या पिरापैकीं सुमारें दोन तृतियांश भाग जळून फस्त झाला. त्यांत इंग्रजांच्या वकिलाचें ठिकाणही जळालें आणि सुमारें १०,००० लोक अगदीं निराश्रित होऊन बसले होते. आग लागण्याच्या पूर्वीं या ठिकाणीं एकंदर ७०,००० युरोपियनांची वस्ती होती, पण या आकांतानंतर निमे वस्ती कमी झाली. १८७३ सालीं या शहराची वस्ती ७,५०,००० पासून ८,००,००० पर्यंत होती व त्यांत निमे मुसलमान असून बाकीचे इतर जातीचे लोक होते. किरण.

## ✓ साम

( मागील अंकावरून पुढें चालू )

इंग्लिश लोक अत्यंत स्वार्थबुद्धी आहेत; आणि ते हिंदुस्थानचें जें राज्य करितात, तें केवळ आपल्या फायद्या करितां करितात हिंदुस्थानच्या फायद्या करितां करीत नाहींत ह्या गोष्टी इतक्या स्पष्ट आणि उघड आहेत कीं, त्या छपविण्यास उद्योग करणें हें सूर्य लपवून ठेवण्याच्या खटपटी इतकें शहाणपणाचें आहे. ह्मणून त्या उद्योगास कोणाही शहाण्या माणसानें लागूं नये, आणखी ह्या परकीय लोकांनीं आपलें कडून कितीही उत्तम रीतीनें आपणांवर राज्य केलें, तरी. परकीय राज्यकर्ते असल्यामुळें ज्या अनिवार्य अडचणी राष्ट्रांस भोगावयास लागावयाच्या त्या आपणास चुकवितां यावयाच्या नाहींत. अशी जी हल्ली आपली स्थिति आहे ती फार दुःखाची आणि फार लाजिरवाणी आहे. परंतु ती टाळणें हें ज्या पक्षीं आपल्या हातीं नाहीं त्यापक्षीं प्राप्त स्थितीमध्येंच शुद्ध मनानें होईल तितकी खटपट करून सुखप्राप्तीचा उद्योग करावा हा आपला धर्म होय. सांप्रतच्या अवस्थेमध्यें दुःखांत सुख एवढें आहे कीं, ज्यांचें मन आपणांस संतुष्ट करावयाचें आहे ते लोक अत्यंत विद्याचारसंपन्न कलाकौशल्यांत निपुण आणि नीतीनें वागणारे किंवा निदान आपण नीतीनें वागतों अशा प्रतिष्ठेचा डौल मिरविणार तरी आहेत 'शहाण्याचें चाकर होणें बरें पण मूर्खाचें धनी होणें बरें नाहीं' असें जें ह्मणतात त्यांतला प्रथम सांगितलेला पर्याय आमच्या वांट्यास आला आहे. ही आमच्या सुदैवाची गोष्ट होय. कोणत्याही सद्गुणाचा उगाच डौल करणें हें चांगलें नाहीं, हें आह्मी कबूल करितों. परंतु राज्यव्यवहारामध्यें आणि इतर कामकाजामध्यें असे डौल मिरविणारे लोक हे आपणास उघड दुर्जन ह्मणविणाऱ्या लोकांपेक्षां पुष्कळ बरे वाटतात. कारण अशा प्रतिष्ठेचा डौल मिरविणाऱ्या लोकांस, मनांत कसेंही असलें तरी प्रसंगीं बोलण्याप्रमाणें चालणें भाग पडतें तें त्यांस भूषणास्पद आणि इतरांस सुखप्रद होतें. आपणास कर्णाचा अवतार ह्मणविणाऱ्या अत्यंत कृपण मनुष्यानें मनांत अतिशयित संतापून, जरी कोणा अनाथास केवळ आपल्या लौकिककरितां एक रुपया दिला तरी तो रुपया त्यानें धर्माकडे खर्चिला आणि त्यानें गरीबास पुष्कळ सहाय झालें, ह्या दोन गोष्टीस बाध येत नाहीं. कितीएकांचे ह्मणणें असें पडतें कीं, इंग्लिश लोक आपल्या नीतिमानपणाचा जितका डौल मिरवितात तितक्या खरोखर नीतिमानपणानें ते हिंदुस्थानच्या लोकांशीं वर्तत नाहींत. होय. ही गोष्ट खरी आहे. परंतु ते लोक सुशिक्षित असल्यामुळें तोंडानें बोललेल्या शंभर गोष्टी पैकीं त्यांस दहा तरी हातानीं करून दाखवाव्या लागतात.

इंग्लिश लोकांचीं मनें आपणाविषयीं शुद्ध असल्याशिवाय त्यांचे हातून आपणास पुष्कळ सुख प्राप्त व्हावयाचें नाहीं, हें उघड सिद्ध झालें आहे. त्या पक्षीं त्यांचीं मनें तशीं करण्याविषयीं प्रयत्न करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म होय तें आपणांस केलें पाहिजे. तें करण्यास फार खटाटोप नको. त्याचा एक उत्तम उपाय आहे आणि तो फार सुलभ आहे. तो उपाय हाच कीं त्यांशीं अगदीं शुद्ध मनानें आणि नम्रपणानें वागणें. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं ज्या गोष्टी इंग्लिश लोकांचे हातून आपणास अवश्य मिळाव्या असें आपण इच्छितों, त्यांतल्या पुष्कळ गोष्टी प्राप्त न होण्यास कारण त्यांचा आपणांवर अविश्वास हें होय. हा अविश्वास आज कालचा नाहीं. त्याचा आपला संबंध निकट झाल्या दिवसांपासून तो उत्पन्न होऊन वाढत गेला आहे. ता इ. स. १८५७।५८ ह्या वर्षीं तर अतिशयित वाढला. कितीएक ठिकाणीं असा चमत्कार झाला कीं जे ५त देशीय लष्करी अमलदार आज दुसऱ्या बंडखोरांच्या चौकशीकरितां कोर्टमार्शलांत बसवि त्यांवरच उद्या बंडास सामील असल्याची शाबीदी व्हावी. अशा कृतींच्या योगानें फार अविश्वास उत्पन्न झाला आहे. इंग्लिश लोकांच्या आणि आपल्या स्नेहासंबंधी कितीएक वेळां साहेब लोकांशीं आमचें संभाषण झालें. त्यावरून आह्मास असें स्पष्ट दिसून आलें कीं आपणांवर त्यांचा तिळभर देखील खरा विश्वास नाहीं. ह्याचीं उदाहरणें शोधण्यास दूर जावयास नको. ते आपल्या गावांत येऊन रहात नाहींत, राज्यव्यवस्थेच्या गुप्त गोष्टी आपणास कळूं देत नाहींत, आपणांस लष्करांमध्यें मोठ्या हुद्यापर्यंत चढूं देत नाहींत, आणि इतर खात्यांत देखील मोठ्या जागा देण्यास कुरकुरतात, हीं त्या अविश्वासाचीं फळें होत. तो आधीं नाहींसा केला पाहिजे. त्याचा उपाय एवढाच कीं आपण त्यांशीं शुद्ध मनानें आणि नम्रतेनें वागावें.

अलीकडे कितीएकांचें मत असें झालें आहे कीं स्वदेशाभिमान आणि राजनिष्ठा हीं कधींही एकत्र रहावयाचीं नाहींत परंतु हें मत भ्रांतिमूलक आहे. आह्मांस तर असें वाटतें कीं स्वदेशाभिमान आणि राजनिष्ठा हीं बहीणभावंडे आहेत आणि त्यांचें मोठें सख्य आहे. स्वदेशाभिमान ह्मणजे आपल्या देशाचें चांगलें करण्याची बुद्धी आणि राजनिष्ठा ह्मणजे आपल्या राज्यकर्त्यांचें कल्याण व्हावें अशी इच्छा आणि जें प्रजेचें चांगलें तेंच राजाचें कल्याण, किंवा जें राजाचें कल्याण तेंच प्रजेचें चांगलें असें आहे. तेव्हां ह्या दोहोंमध्यें वैपरीत्य नाहीं हें सांगायास नको. स्वदेशाभिमानी पुरुषांस राजनिष्ठ राहून आपलीं कर्तव्यकर्में करितां येतील. आपले लोक सांप्रत काळीं पुष्कळ गोष्टीनीं इतर देशांपेक्षां उणे आहेत त्यांच्यांत विद्येचा प्रसार कमी आहे, त्यांच्यांत पुष्कळ चाली फार वाईट आहेत यंत्रांचें ज्ञान त्यांस नाहीं, परदेशांतील लोक कशानें सुखी झाले हें ठाऊक नाहीं, इंग्लिश सरकारच्या ताब्यांत आपणास हक्क कोणते आहेत, हें ठाऊक नाहीं, सांप्रत काळीं आपण जसे मुख्य राज्यकारभाराच्या विचाराच्या बाहेर आहों तसे कांहीं दिवसांपूर्वीं याहुदी लोक इंग्लंडांत होते ते अनेक उद्योगांनीं श्रीमंत होऊन केवळ आपल्या संपत्तीच्या बळानें राज्यकारभारांत इंग्लिश लोकांच्या बरोबरीचे झाले अशा प्रकारच्या उद्योगसिद्धीच्या गोष्टी त्यांस माहीत नाहींत ह्या व दुसऱ्या अनेक न्यूनता ज्या आपल्या लोकांचे ठायीं आहेत त्यांस नाहींसे करण्यास स्वदेशाभिमानी पुरुषांस स्वराजनिष्ठा तिळभर देखील आड येणार नाहीं.

आमच्या लोकांनीं आपल्या राज्यकर्त्यांशीं एकचित्त होऊन आपलें आणि आपल्या देशाचें हित साधावें हा बोध मनांत बिंबविणें हा ह्या लेखाचा मुख्य उद्देश होय. त्या विषयीं जितकें सांगावयास पाहिजे आहे तितकें सर्व सांगण्यास वेगळे ग्रंथ लिहावे लागतील. आणि असे ग्रंथ झाल्यावाचून तो सिद्धीस जावयाचा नाहीं. परमेश्वर कृपेनें तसे ग्रंथ सुज्ञ पुरुषांचे हातून होवोत आणि उभय पक्षांच्या कल्याणाचा हा हेतु सिद्धीस जावो अशी प्रार्थना करून हा अल्प लेख समाप्त करितों.

वि. ज्ञा. बि.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० २१ माहे एप्रिल सन १८७८ इसवी. | अंक १६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रजी लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून या पासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ०६ सहा आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज, व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागूं होतें.

⁂ या गजकरणाच्या औषधाच्या डब्या दोन वर्षां पूर्वी आमचे छापखान्यांत विक्री करितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलीकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेली गिऱ्हाईकें परत गेलीं ह्मणून आह्मी ह्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत ता. १८ एप्रिल सन १८७८ इसवी.

## जाहिरखबर.

सर्व लोकांस जाहीर व्हावें कीं, आज पासून पुढें दुसरी जाहिरखबर देईपर्यंत आह्मी आपल्या वऱ्हाडसमाचार छापखान्याचे म्यानेजर रा. रा. हरी रामजी अणवीकर यांस नेमिलें आहे तर ते कारखान्या संबंधी पत्रव्यवहार व बिलें वगैरे करतील तीं आणि पैसा घेतल्याच्या पावत्या देतील त्या आह्मांस मंजूर आहेत. कळावें ता० २२ माहे नोवेंबर सन १८७८ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 per cent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, and upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November 1877.

## नोटिस.

राजश्री नरसाजी वल्लद चहादाजी माळी रहाणार मौजे खेडाळे तालुके अकोट यास रामचंद्र रामप्रसाद तिव्हारी रहाणार मौजे निजामपुर तालुके अकोट याजकडून— तुह्मी तारीख ६ एप्रिल सन १८७८ इसवीची नोटिस तारीख १४ मिनहूचे वऱ्हाडसमाचार पत्रांतून आह्मास दिली ती आज रोजीं पावली त्याचा जबाब खालीं लिहिल्याप्रमाणें: —

सुमारें १०।१२ वर्षांपासून तुमचा व आमचा घरोबा व प्रेम असल्यामुळें आमच्या मालाची रकम तुमच्या जवळ ठेवीत असून खर्चास लागेल तो पैसा उचलीत असों ह्मणून तुह्मी लिहितां त्यास तुह्मी आह्मा जवळ मालाची रकम स्नेहसंबंधानें ठेविली नसून तुह्मास खर्चासही आह्मी दिले नाहीं. इतर कुळाप्रमाणें तुह्मास कर्जाऊ पैसा दिला आहे.

सन १२८५ सालीं तुह्मी आपली जमीन आह्मास ७०० रुपयांस विकली ती रकम तुह्मास अदा केल्यावर त्याच सालीं जमीनीचें खातें आमचे नांवें झालें आहे. सन १२८५।८६ दोन सालें सदर्हू जमीन तुह्मास वटाईनें वाहितीस दिली त्या संबंधानें शेताचा निमें माल आह्मास पावला आहे.

सन १२८७ सालीं सदर्हू शेतें गणाजी वल्लद पुंजाजी याला बटाईनें वाहितीस दिलीं त्यानें निम माल न दिल्यामुळें अडगाव कोर्टांत मुकदमा नंबर २७९ सन १८७८ इसवीचा दावा केला आहे. त्यांत तुमचा संबंध उत्पन्न झाल्यावरून कोर्टानीं तुह्मास पक्षकार केलें. तुह्मी आपले जबाबांत ७०० रुपयांचे फेडींत ९७९।।। ची रकम माल व नगदी मिळून दिली असें बोलला त्यावरून चौकशी सुरू आहे अद्याप निकाल झाला नाहीं ज्या गोष्टी बद्दल वाद कोर्टांत चालू आहे त्या बद्दल अपसांत नोटिस देऊन काम चालविणें रास्त नाहीं.

तुह्मी लिहितां कीं, आमचे रु. ७८७।—।। तुह्माकडे घेणें आहेत यास तुमचे तर आह्मास कांहींच देणें नसून आमचे तुह्माकडेस घेणें आहेत ते रु. : —

१०० ता. १९ आगस्ट सन १८७५ इसवीचीं गहाणखतें राजिस्टर केलेलीं दोन. तिनशें व दोनशें.

३०० सदर्हू तारखे नंतर सुमारे एक महिन्यानें तुमचे बायकोस रोख दिले ते. व्याज दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणें.

६६ कुंजीलाल मारवाडी यानें तुह्मावर जप्ती ची दरखास्त दिल्यावर जप्तीचे वेळेस तुह्मास दिले ते. व्याज सदर्हू प्रमाणें.

८६६

सदर्हू रुपये शिवाय अव्वल मितीपासून दोन रुपये शेकड्या प्रमाणें व्याज असें घेणें आहे. याचा निकाल आजपासून १५ दिवसांत करून दस्तैवज परत घ्यावे. नाहीं तर कोर्ट सुरू झाल्यावर रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. या जबाबाचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख १७ एप्रिल १८७८ इ०

(सही) रामचंद्र रामप्रसाद तिवारी
याचे हातची निशाणी
दस्तुर दाजी अंताजी.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पत्रकर्ते महाराज, आपल्या हिंदुस्थान देशांत अलीकडे दुष्काळाचें आगमन वारंवार होऊं लागलें आहे, इतकेंच नाहीं, तर दुष्काळानें आपल्या या हतभाग्य देशांत कायमचें ठाणेंच बसविल्यासारखें वाटतें मी अलीकडे पंध्रा वीस वर्षांपासून पहातों तों आपल्या वऱ्हाडांत चांगलीं सुबत्तेचीं अशीं दोन तीनच वर्षें गेलीं असतील. आपला देश सुपीक आहे. व थोड गोड्या पावसानें देखील यांत मध्यम किंबहुना उत्तम प्रकारचें पीक येऊं शकतें. तथापि आपल्या विस्तीर्ण प्रदेशाचे मानानें कोण्या तरी भागांत अवर्षण होऊन दुष्काळ पडतोच. व तेणेंकरून त्याच्या आसपास देखील महर्गता होऊन दुष्काळाचें तोंड सुरू होतें. १५।१६ वर्षांपूर्वी नागपुर कडे अवर्षण होऊन दुष्काळ पडला त्या पूर्वी या आपल्या वऱ्हाडप्रांतांत एक रुपयाला ६४ शेर जवारी व ४०।५० शेर (पक्के) गहूं विकले जात होते, ते एकदम १५।१६ शेरावर येऊन बसले. तो तिकडचा दुष्काळ संपल्यानंतरही धारण ५।६ वर्षें पूर्वपदावर आली नाहीं. व त्यांत केव्हां केव्हां पर्जन्यानेंही दगा दिला. हें संपतें आहे तोंच कलकत्याकडे दुष्काळ उद्भवला व पुन्हा धान्याचे भाव वाढले. आतां हें पूर्वीचें झालें पण गतवर्षाचे दक्षिण प्रांतातील दुष्काळानें तर कहरच करून सोडला.

या प्रांतांत जरी उत्तम प्रकारचें पीक आलें होतें तरी याची अवस्था ज्या प्रदेशांत अवर्षण होऊन दुष्काळ पडला त्यासारखीच झाली. इतकेंच नाहीं. तर त्यापेक्षांही वाईट झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण ज्या भागांत दुर्भिक्ष पडतें त्या भागाकडे इतर प्रदेशांतून धान्याचे लोटचे लोट जात असतात व तेणेंकरून तेथील अडचण दूर होते. पण ज्या भागांतून दाणा बाहेर जातो त्या भागांत दिवसेंदिवस धान्याचा साठा कमी होऊन महर्गता वाढते. यास अनुसरून गतवर्षापासून आपल्या वऱ्हाड प्रांतांत पीक साधारण बरें आलें असतांही महर्गता होऊन गरीब गुरदांचे हाल होताहेत. गतवर्षी इकडे दयाळु व परोपकारी अशा सरकारी अधिकाऱ्यांनीं गरीबांकरितां स्वस्त दरानें धान्य विकण्याचीं दुकानें घालून त्यांत येणारा तोटा वर्गणी करून बुजून काढिला तेणेंकरून गरीब लोकांस फार मोठें सहाय झालें. दक्षिण प्रांतांतील दुष्काळ संपला नाहीं तोंच वायव्यप्रांत, गुजराथ, दिल्ली वगैरे उत्तम सुपीक प्रदेशांत अवर्षण पडून दुष्काळ उद्भवला. पुन्हा दाणा गुजराथेकडे वगैरे जाऊं लागला. हल्लीं आमच्या वऱ्हाडांत ज्वारी एक रुपयाला १३।१४ शेर, गहूं ८।९ शेर, तुरीची व लाखाची वगैरे डाळ तितकीच. चण्याची ७ शेर व तांदूळ चांगले ह्मटले ह्मणजे ५।६ शेर विकतात. तेव्हां दुष्काळ प्रदेशांत तरी याहून अधिक काय असावयाचें?

आपलें दयाळु इंग्रज सरकार जर दुष्काळ प्रदेशांत देखील आबादानी करून सोडते तर आबादानीच्या ठिकाणीं अशी महर्गता होऊं देणार नाहीं अशा प्रकारची तजवीज त्यांचे हातून होणार नाहीं असें नाहीं. पण ही अशी स्थिति सरकारचे कानीं जाऊन पोंचत नसेल. बाकी या वऱ्हाडांत सदैव इतकी महर्गता रहाण्याला कारण केवळ व्यापारी लोकांच्या हावरेपणानें इकडून बाहेर प्रांतीं अनियमित प्रमाणानें जाणारा धान्याचा लोट असावा. हा दाणा जर कांहीं नियमित पत्तेपर्यंत बाहेर प्रांतीं जाऊं दिला आणि अतोनात जाऊं लागला तर त्यास कांहीं धरबंध घातला ह्मणजे सुबत्तेच्या ठिकाणीं तरी महरगता प्रवेश करणार नाहीं.

ईश्वराच्या सत्ते खेरीज जरी कोणताच कार्यभाग सिद्धीस जाऊं शकत नाहीं तरी पश्चिमेकडील देशांतील लोकांचे उद्योग धंद्यास (कलाकौशल्याचे कामास) ह्मणण्यासारखा अडथळा या दुष्काळानें देखील येतो दिसत नाहीं व तेणेंकरून त्यांचें काम निशीदिनीं बिनघोक चालून मनांत चिंतल्याप्रमाणें द्रव्यप्राप्ती त्यांस करून घेतां येते व यांस दुष्काळाची बाधा ह्मणू

न सहसा होत नाहीं. पण आपल्या हिंदुस्थान देशांत तसें न होतां सर्वांशीं ईश्वरावर भरवंसा ठेवूनच बसावें लागतें. कारण या देशांत शेतकीचा धंदा प्रमुख आहे व तो सर्वस्वी ईश्वरी नियमानें घडणाऱ्या ऋतु मानावरच अवलंबून असतो. मृग व आर्द्रा या दोन नक्षत्रांत जर पर्जन्यवृष्टी विपुल झाली नाहीं तर कपाशी, ज्वारी इत्यादि खरीपाचे पिकास एकदम धक्का बसतो इतकेंच नाहीं, तर त्याची पेरणीस होत नाहीं. ह्मणून आरंभीच्या दोन नक्षत्रांत विपुल पर्जन्यवृष्टी झालीच पाहिजे. ही पूर्ववृष्टी यथास्थित होऊन पेरणीचें काम शेवट झालें ह्मणजे पुढील तीन चार नक्षत्रांत मधून मधून पावसाची झड व मधून मधून उघाडी पडून सूर्यकिरणाचा ऊष्मा त्या उगवलेल्या पिकाचे संगोपना साठीं अवश्य पाहिजे. या दोहोंतून जर एकानेंच धामा पुरविला व हवेंत फेरबदल झाला नाहीं तर तीं प्रयोफजण आपल्या दीर्घ काल सहवासानें त्या पिकाचे नाशास कारणीभूत होतात. ह्मणजे केव्हां पावसाची सतत झड लागून पाण्याच्या अजीर्णानें पिकें पिवळीं पडून दग्ध होतात व केव्हां अनावृष्टी पडून सूर्याच्या उग्रतापानें तीं सुकून जातात. असा प्रकार आहे. या पुढील पिकाची हकीकत पुढें केव्हां तरी सादर करीन. ही पर्जन्याची वृष्टी होणें किंवा स्वच्छ ऊन तापणें हीं दोन्ही कार्यें केवळ ईश्वराधीन आहेत यांतून एकही कार्य पाहिजे तेव्हां प्राप्त करून घेण्यास अगर पाहिजे तेव्हां त्याला नाहींसें करण्यास अजून कोणीही पुरुष आपल्या पृथ्वीवर समर्थ झालेला नाहीं मग अडाणी शेतकरी लोकांचे हातून अशा अरिष्टाच्या वेळीं काय उपाय होत असतील हें वाचकांचे सहज लक्षांत येईल. जें ईश्वरी सत्तेनें घडून येईल तें तें त्यांस निमूट पणें सोसणेंच भाग आहे. ह्मणून इकडे इच्छिल्याप्रमाणें उत्पन्न प्राप्त करून घेतां येत नाहीं व ह्मणूनच दुष्काळाची स्वारी आपले देशावर पूर्वीपासून होत असल्याचें प्रसिद्ध आहे. पण अलीकडे विपत्तीचो प्रीति आपले देशाशी अधिक जडल्यामुळें दुष्काळानें आपलें कायमचें ठाणें आपल्या देशांत बसविण्याचा डाव मांडला आहे ह्मणून तें ठाणें न बसूं देण्याकरितां इतर सुधारलेल्या देशांतील लोकांचा कित्ता घेऊन सदैव बिनधोक चालणार कलाकौशल्याचे धंद्याची थोडी बहुत सुरुवात केली पाहिजे. ह्मणजे तेणेंकरून विपत्तीचा नाश होऊन दुष्काळाची विशेष बाधा होणार नाहीं असें मला वाटतें. पत्रविस्तार भयास्तव आतां पुरें करितो. कळावें ही विनंती. मिति चैत्र शुध्द १

तुमचा दास
" रामात्मज "

## हिंदुस्थानांतील राजेरजवाडे.

राजा असो किंवा रंक असो, कोणास ही लोक समुदायांत वागणें आहे तर त्यानें नीतीनें व व्यवस्थितपणानें वागलें पाहिजे. आपले देशांत पूर्वापार अशी एक समजुत आहे कीं ताबेदार जो आहे त्यानें वरिष्ठाचे धाकाक रेतीमात्र जपून वागावें. बाकीच्यास तसें करण्याची जरूर नाहीं. ह्मणजे घरचा मुख्य यजमान घरांत हवें तसें वागेल तर तो मुखत्यार आहे. तसेंच संस्थानिक व राजे रजवाडे आपल्या दौलतीचे व प्रजेचे मालक आहेत ह्मणून ते पाहिजे तसे वागले तरी चालेल, त्यास कोणी जबाब मागणारा नाहीं. पण हें मत आतां इंग्लिश सरकारच्या प्रभावानें बरेंच बदलत चाललें आहे. घरचा यजमान पाहिजे तसा वागेल आणि त्यापासून लोकांस त्रास होईल तर गावचा पाटील त्यास गुन्हेगार ह्मणून धरील, तसेंच संस्थानिक व राजे रजवाडे अनीतीनें वागतील, पैसा उधळतील, कर्जबाजारी होतील, अव्यवस्थित वागतील, व आपल्या प्रजेवर जुलूम जबरदस्ती करतील तर त्यांच्या त्या गैरसाळ गोष्टीचा जाबसाल सार्वभौम सरकार त्यांस विचारील व ओळीस लावील, या गोष्टी अनुभवानें आतां लोकांस समजूं लागल्या आहेत. मागेंच जर या गोष्टी आमचे देशांत सर्वांस चांगल्या ठाऊक असत्या तर आमचा देश हल्लींपेक्षां फार अधिक सुधारलेला असता व किंत्येक संस्थानें आणि राज्यें नाशाप्रत पावलीं व उधळपट्टींत आलीं तशी त्यांची स्थिति झाली नसती. असतु. "गतंन शोचामि"

ही गोष्ट यास आठवड्यांत आह्मांस आठवण्यास संस्थानिकांचीं २१३ उदाहरणें आमचे वाचण्यांत आलीं तीं अशीं:—

पुरी एथील राजावर खुनाचा आरोप शाबीद झाला सबब इंग्लिश सरकारानें त्यास काळे पाण्यावर पाठविलें.

सुकेत नावाचें ७०,०० रुपयांचें संस्थान सिमल्याचे उत्तरेस ९ मैलांवर आहे तेथील हल्लींचा राजा फार जुलमी व दुर्बळ होऊन रयतेस पीडा देऊं लागला. तेणेंकरून लोक इतके त्रसले कीं ५०० लोकांनीं राजधानीवर जाऊन हल्ला केला व राजाचे मुत्सद्दी सर्व धरून कैद केले. या गोष्टीची इंग्लिश सरकारानें चौकशी करितां सर्व दोष राजाचा आहे व राज्योपभोगास तो केवळ नालायक आहे असें दिसून आल्यावरून त्यास त्यांनीं पदच्युत केलें व लाहोरास नेऊन ठेविलें.

याचप्रमाणें तिसरी एक गोष्ट परिस्फुट झाली आहे ती अशी:—

बिकानियर संस्थानांतील कित्येक लोकांनीं इंग्रज सरकारास असा अर्ज केला आहे कीं हा मुलूख आपण घेऊन आपले राज्यास जोडावा. राजानें केवळ अंदाधुंद बादशाही माजविली आहे. व तो अतोनात जुलूम करितो. महेश्वराच्या जमीनदार लोकांपासून कांहीं कराचें द्रव्य घेण्यासाठीं राजानें फौज पाठविली होती. तींतील लोकांनीं जमीनदार लोकांच्या गावांत शिरून इतकी गर्दी केली कीं जमीदार लोक व त्यांच्या तिघी बायका त्यांनीं ठार मारिल्या व एकंदर ९ मनुष्यें ठार गेलीं व पंध्रा जखमी झालीं, सबब सरकारानें या गोष्टीची जलद चौकशी करून त्या संस्थानांतील प्रजेचे जीव बचावावे.

काय हीं भयंकर कृत्यें! व काय ही राजे लोकांची सद्बुद्धी! पुत्रवत् प्रजेचें पालन करावें ही जी शास्त्राज्ञा तिला अनुसरूनच ही कृती काय? अहाहा! अशीं कृत्यें हजारों लोकांच्या पालनवाल्याकडून घडावीं हें यांचें केवढें दुर्दैव! ईश्वराच्या अनुकंपेनें नष्टचर्य प्राप्त झालें ह्मणजे अशींच कृत्यें सुचत जातात. अरेरे! अज्ञानें आमच्या देशांतील किती राष्ट्रांचा नाश झाला! याजकरितां राहिलेल्यांनीं तरी मद्बोध घेऊन पापभीरुत्वानें वागावें असें त्यांस आह्मी नम्रतापूर्वक सुचवितों.

## धोंडमनमाडरेलवे.

या रेलवेचें चालू असलेलें काम शेवटास गेलें व मनमाडपासून थेट धोंड पर्यंत गाडी नेण्याचा प्रथम समारंभ १७ वे तारखेस नामदार गवरनर साहेबांनीं केला हें ऐकून आह्मांस संतोष होतो. आतां १९ वे तारखेपासून सर्व लोकांकरितां तिकडील आगगाडी चालू झाली आहे. गवरनर साहेबांस नगरचे म्युनिसिप्यालिटीनें मानपत्र दिलें तें स्वीकारतांना त्यांनीं तिकडील जमीदार, शेतकरी वगैरे लोकांची फार तारीफ केली. ते ह्मणाले कीं या लोकांच्या उद्योगीपणानें व नागाईताच्या साधनानें या भागास रेलवे करावी अशी अवश्यकता उत्पन्न झाली ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. नगरचे किल्यांत गवरनर साहेबांस मेजवानी झाली तींत मि० ऐशेट साहेब त्या रेलवेचे चीफ इंजिनियर हे प्रेसिडेंट होते त्यांनीं सर्व असिस्टंट इंजिनियर व डिपुटी इंजिनियर यांच्या भेटी करविल्या. मग जेवणानंतर संभाषणें झालीं त्यांत नामदार साहेबांनीं ऐशेट साहेबांची फार तारीफ केली. हे ऐशेट साहेब आमच्या अकोल्यास थोड्या वर्षांमागें एक्झीक्युटीव इंजिनियर होते हें सर्वांस माहित असेल. यांनीं या सुमार १५० मैल रेलवेचें काम ९ महिन्यांत तमाम पुरें केलें ही त्यांस मोठी भूषणाची गोष्ट आहे. या रेलवेला मैली ४२००० रुपये खर्च आला. कित्येक पुलांचें काम अजून व्हावयाचें आहे तें पुढील सालीं होईल. गवरनर साहेब आपले भाषणांत असेंही ह्मणाले कीं, हीच रेलवे दक्षिणेकडे पुढें चालविणें अगत्याचें आहे ह्मणजे सातारा कोल्हापुर वगैरेकडे ही रेलवे वाढविली जाईल. मुंबई इलाख्यांत झालेली व पुढें व्हावयाची मिळून एकंदर १३०० मैल रेलवे व १३०० मैल इरिगेशन ह्मणजे पाटबंधारे व्हावेत असा सरकारचा हेतु आहे व ईश्वराच्या कृपेनें तो लवकरच शेवटास जाईल.

**दुष्काळसंबंधी चौकशी—** गुदस्त सालीं दक्षिणेंत जो मोठा दुष्काळ पडला त्याचे कार्यकारणाची चौकशी करावी व पुढें असे दुष्काळ न पडण्याविषयीं काळजी घेण्या योग्य सूचना व्हाव्या ह्मणून एक कमिशन सरकार नेमणार अशी बरेच दिवस वाटाघाट चालली होती त्याप्रमाणें या आठवड्यांत कमिशन नेमण्यांत आलें. त्यांत जनरल स्ट्रेची साहेब प्रेसिडेन्ट व मि. इलियट साहेब वायव्य प्रांतांतील सिविल सर्विस हे सेक्रेटरी आहेत. बाकी मेंबर — मि. कायर्ड, आनरेबल मि. जस्टिस कनिंगहाम कलकत्ता हायकोर्टांतील जडज, मि. बल्लार्ड मद्रास सिविल सर्विस, मि. ख्वाटन बंगाल सिविल सर्विस, मि. पील काठेवाडचे पोलिटिकल एजंट, मि रंगाचार्लु म्हैसुरचे कंट्रोलर, व रा. ब. माधवराव वासुदेव बर्वे कोल्हापुरचे कारभारी इतके मेंबर आहत.

**मुनसफीची परीक्षा—** मुंबईस नुकतीच मुनसफीची परीक्षा झाली. तींत ७९ उमेदवार होते त्यांतून तीन पास झाले त्यांचीं नांवें १ रा. रा. महादेव रघुनाथ नाडकरणी १ रा. रा. रामचंद्र गणेश खवले व १ रा. रा. नवनिधीलाल गोविंदलाल जव्हेरी.

**लढाई —** लवकर सुरू होईलच असा कांहीं निश्चय नाहीं, पण इंग्लिश सरकार तयारी करण्यांत गढून गेलें आहे. व हिंदुस्थानांतील काळी फौजही कारण पडेल तेव्हां माल्टाकडे पाठवावी अशा विषयीं हुकुम आले आहेत.

## वऱ्हाड.

कमिशनर साहेब, जुडिशियल कमिशनर साहेब, व स्यानिटरी कमिशनर साहेब चिखलदऱ्यास आहेत.

उमरावतीचे डिपुटी कमिशनरचे कामाचा कर्नल मॅंजिस साहेब यांनीं चार्ज घेतला.

क्या० बुलक साहेब यांनीं रजा घेतली आहे त्यांचें काम पहाण्या करितां पहिले तारखेस क्या० क्यारर साहेब जाणार असें समजतें.

मि० अबदुल हक्क साहेब वाशिमचे एक्स्ट्रा असि० क० रजेमध्यें हैदराबादेकडे गेले असें समजतें.

मि. क्रिश्च। साहेबपोलिससु० विलायतेस रजेवर गेले होते ते परत येऊन वाशिमास आपले कामावर रुजू झाले.

एथील हायस्कुलांतील मुलांनीं काल संस्कृत भाषेंत शाकुंतल नाटक केलें. तें फार चांगलें झालें. त्या करितां उमरावतीहून बरीच मंडळी आली होती.

आमच्या दस्तुर बहेमनजी साहेबांचे बंधु दस्तुर होशंगजी साहेब यांस खानबहा

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य ५ शके १८००

दुरचा किताब सरकारांतून मिळाला त्या प्रीत्यर्थ पुण्याच्य व इतर बहुत ठिकाणच्या पार्शी लोकांनी एकत्र होऊन पुण्यास मोठी सभा केली व आपला आनंद प्रदर्शित करून मानपत्रें दिलीं. आमच्या वऱ्हाडांतीलही पार्शी मंडळींनीं त्यांस मानपत्र पाठविलेलें त्या समाजांत वाचलें गेलें त्याचें उत्तर खानबहादूर साहेब पाठविणार आहेत.

गेल्या सोमवारच्या मागील सोमवारीं उमरावतीच्या मिडल क्लास स्कुलांतील मुलांस बक्षिसें देण्याचा समारंभ झाला. त्या प्रसंगीं कमिशनर साहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें होतें. डिपुटी इन्स्पेक्टर यांनीं शाळेची हकीकत वाचतांना उमरावतीचें मिडलक्लास स्कूल वऱ्हाडांतील उत्तम मिडलक्लास स्कूलांपैकीं आहे असें सांगितलें. व कमिशनर साहेबांनींही बक्षिसें वाटल्यावर थोडे भाषण केलें त्यांत म्हटलें कीं, ही शाळा चांगल्या स्थितींत आहे व लहान लहान मुलें बऱ्या वर्गांतून असुन तीं हुशार आहेत हें शाळेच्या मास्तरास भूषण आहे. उमरावतीस या शाळेवर मास्तर रा. रा. गोविंद विश्वनाथ भावे आहेत हें आमच्या वाचकांस ठाऊक असेलच. त्यांना साऱ्या वऱ्हाडचे मुख्याधिकारी कमिशनर साहेब यांजकडून हें उत्तम सरटिफिकीट आहे असें आम्ही समजतों त्याकरितां संतोष मानितों मेहकरास या गृहस्थास लवकर बढती मिळण्याचें चिन्ह दिसेना. म्हणून डायरेक्टर साहेबांनीं यांस उमरावतीस आणिलें कारण तेथील स्कूल लवकर १०० रुपयांचें करण्याचा त्यांचा विच्यार होता. पण आज वर्षे ती गोष्ट मागे पडली आहे व यावरून "पळस कोकणांत गेला तरी तीनच पानं" या म्हणाची आठवण होते. अस्तु. डायरेक्टर साहेब त्यांस आतां लवकर बढती देतील असें आम्ही इच्छितों.

कमिशनर साहेबांनीं याच समारंभांत आणखी दोन गोष्टी सांगितल्या. एक ही कीं, मुलांस धर्म नीति इत्यादि विषयक विद्या आई बापांनीं वेगळी शिकवावी. व दुसरी गोष्ट ही कीं, बक्षिसें वाटणें तीं परीक्षा होण्याबरोबर वाटावीं म्हणजे तीं वाटण्याचा खरा हेतू सिद्धीस जातो. या दोन्हीही सूचना उत्तम आहेत.

गेल्या बुधवारच्या मागील बुधवारीं हैदराबादेस निजाम सरकारच्या वाढदिवसाचा उत्साह झाला. सर्व सरकारी कचेऱ्यांस सुट्या दिल्या होत्या. व मोठा दरबार भरवून सरकारांनीं सर्व सरदार लोकांच्या भेटी घेतल्या. सरकारचें वयास चवदावें वर्ष लागलें, हें त्यांस सुखकारक जावो व ते दीर्घायु होवोत असें आम्ही इच्छितों.

कर्नेल बुशबी साहेब बुलडाण्याचे डिपुटी कमिशनर यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली पण ती त्यांनीं रद्द केली.

मेजर लाटण साहेब खामगावचे स्माल काज जड्ज यांस १६वे तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे सुपरवाइझर यांस दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली. व ते मुलीच्या लग्नानिमित्त गुरुवारीं पुण्यास गेले.

सर सालरजंग दिवाण साहेब यांस तुर्कस्थानच्या बादशहाकडून धर्मसंबंधीं नुकताच एक किताब मिळाला त्याजविषयीं ठाण्याच्या अरुणोदय पत्रांत येणेंप्रमाणे लिहिलें आहे.

हल्लींच्या राजकीय गडबडीच्या प्रसंगीं व आपली स्वताची स्थितीही फारच वाईट झाली असतां अशा वेळीं टर्कीच्या सुलतानानें सर सालरजंग यांस "मदजिदी" असा किताब दिला याबद्दल कित्येक इंग्रज पत्रकर्ते सुलतानास दोष देऊन त्याची थट्टा करीत आहेत व दुसरे कित्येक म्हणतात कीं या नव्या किताबाच्या योगानें सर सालरजंग हे आतां हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानी धर्माच्या लोकांचे धर्मसंबंधाचे मुख्य झाले म्हणजे सर्व मुसलमानांस सर सालरजंग हे पूज्य होऊन सर्व मुसलमान सर सालरजंग यांच्या सल्यानें व त्यांच्या हेतुप्रमाणें वागू लागतील व बादशाहीणीच्या तांबेदार संस्थानिकांचा प्रधान एवढ्या योग्यतेचा झाला हें चांगलें नसून बादशाही सरकारानें त्याचा तो थोरपणा कबूल करणें बरोबर नाहीं. या म्हणण्यांत आमच्या मतें कांहींच अर्थ नाही. रशियानें सुलतानाचा जरी पाडाव केला तरी त्याच्या अधिकारांत कांहीं कमीपणा झाला नसल्यामुळें त्याणें हा किताब देणें कांहीं गैरवाजवी नाहीं. तसेंच आपल्या तांबेदार संस्थानिकांचा एक दिवाण धर्मसंबंधी आपल्या सात कोटि प्रजेचा मुख्य झाला हें बादशाही सरकारास दूषण नसून भूषणच आहे व त्या योगें बादशाही सरकारचें हित होण्याचाच संभव आहे. सर सालरजंग हे इंग्रज सरकारचे परम विश्वासू मित्र असल्यामुळें ते एवढ्या मोठ्या लोकसमूहाचे प्रमूख झाल्यानें तो सर्वलोकसमूह इंग्रज सरकारचा विश्वासू व प्रामाणीक मित्र झाला आणि हा इंग्रज सरकारचा फारच मोठा फायदा आहे.

( रेसिडेन्सी आर्डरवरून. )

मि० ताजुद्दीन हुसेन सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर रजेवरून परत आले तेणें करून बया. आर एस थांपटन आफिशियल सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले होते ते पुन्हा थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

मि० एफ राइड बुलडाण्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट यांस अमरावतीस नेमिलें अमरावतीचे आफिशिएटिंग पोलिस सुपरइंटेंडेंट मि० एच ए हीय यांस बुलढाण्यास नेमिलें.

मि० जे एच बर्न्स उमरावतीचे ट्रेझरी अफिसर यांस ता. १९ एप्रिल पासुन किंवा ते लागू करितील तेव्हां पासून १ महिन्याची हक्काची रजा मिळाली.

## नोटिसा.

तमाम लोकांस जाहिर होण्य स्तव कळविण्यांत येतें कीं, अकोले मुनसिपाल कमेटीचे हद्दींतील पायखाने सफा करण्याचा व त्याजकरितां लोकांपासून जो ठराव प्रमाणें कर घेण्याचा तो वसूल करण्याचा मक्ता मुनसिपाल कमेटी देण्यास तयार आहे. त्यास मक्ता घेण्याची इच्छा असेल त्यांणीं तारीख १५ माहे मे सन १८७८ चे आंत फ्यानेंजिंग कमिटीकडे अर्ज करावे मक्त्या संबंधी विशेष माहिती पाहिजे असल्यास मुनसिपाल अफिसांत कमिटीचे सेक्रेटरी यांजपासी मिळेल कळावें

V. K. Desai.

अकोलें ता. १९ एप्रिल १८७८ } व्हाईस सेक्रटरी अकोले म्युनिसिप्यालिटी.

नोटिस.

रा. रा. खानाजी वल्लद बिठोबा पाटील रहाणार तळेगाव बुजरुख प्रगणे अडगाव तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येते कीं, तुम्ही आमचे शेत १ मौजे तळेगाव बु॥ एथील सर्वे नंबर ४६ चें आम्ही हरासांत घेतलें तें शेत तुम्ही आमचे जवळून रुपये ९६५ अक्षरी नऊशें पासष्ट रुपयांस विकत घेऊन रुपयांचे आदाईचा करार दर साल रुपये १०० प्रमाणें नऊ वर्षांचे आंत आदा करावे नंतर शेत आम्ही तुमचे नावानें करून द्यावें असे करारानें घेतलें त्याचा दस्तैवज झाला नाहीं म्हणून आम्ही तुम्हास २ पत्रें पाठविलीं त्यांत एक रजिस्टर करून व एक नाटपेड. त्या पत्राचे उत्तरांत तुम्ही लिहिलें कीं हल्लां आमचे एथें जमाबंदी आहे करितां मांझे येणे होत नाहीं. नंतर आम्ही कांही दिवसांनंतर आमचा कारकून गणपतराव यांस तुम्हापाशीं पाठविलें त्याच्याशीं तुम्ही आठ दिवसानंतर येण्याचा करार केला त्याकराराप्रमाणेंही तुम्ही आलां नाहीं. हल्लीं तारीख १७ एप्रल सन १८७८ इसवी रोजीं तुम्ही आमचे दुकानावर येऊन कांहींएक तक्रार न करितां दस्तैवजाकरितां कागद आणण्यास तुम्ही आमचे जवळून गेले ते आज तारखेपर्यंत तुम्ही परत आले नाहीं. मागें तुमचा शोध घेतां तुम्ही गावास निघून गेले तर अशा चोरीनें जाण्यास तुम्हास काय कारण असेल तें समजत नाहीं. आतां तुम्हास या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं, तुम्ही आजतारखेपासून १५ दिवसांचे आंत येऊन आम्हास दस्तैवज करून द्यावा आणि अगाऊ अगाऊ सालाबद्दल रुपये १०० आमचे आदा करावे. जर तुम्ही कराराप्रमाणें करणार नाहीं तर तुम्हावर आतां शिरस्त्याप्रमाणें तजवीज करूं. कळावें तारीख २० माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

[सही] वहिमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें तर्फे नरसिंगदास छबिलदास वहिवटदार

नोटिस.

गंगाधर जोरावरमल साहू दुकान अकोलें यांस खाली सही करणार याजकडू नोटिस देण्यांत येतें कीं. सन १८७८ सालांत ताजनापेठ बाजारांत दुकानें बांधण्या करितां जागा हरास झाल्या त्यांतील १८ नंबर तुम्ही आम्ही व गुलाबराय गोविंदराम साहू दुकान अकोलें असें त्रिवर्गांनीं किंमत रुपये ६०० सहाशें यास विकत घेतले व एक नंबर रुपये ३४ सालिमखा वल्द यांजवळून विकत घेतला त्याप्रमाणें आमचे हिश्शाचे रुपये २०० दोनशें आम्ही कमिटींत दाखल केले. व ११८५८६ अक्षरी रुपये साडेपांच आणि सलिमखा यास भरतींत दिले असोन त्या अन्वयें आमचे हिश्शाचे जमीनीचे नंबर ६ आम्हास आजपावेतों न मिळतां तुम्ही उभयतां त्या सर्व नंबरांत दुकानें बांधून वहिवाट करित आहा. पुष्कळ वेळ तुम्हास आम्ही आपलें हिश्शाची जमीन अगर दुकानें मागितलीं असोन तुम्ही हो हो म्हणत गेलां पण दिली नाहीं. करितां आतां या नोटिशीनें तुम्हास कळविण्यांत येतें कीं, आज तारख पासून एक महिन्यांत आमचे हिश्शाचे सहा नंबरांची जागा आम्हास द्यावी. किंवा त्या जागेवर बांधलेलीं दुकानें द्यावींत. दुकानें बांधण्यास लागलेला खर्च वाजवी असेलतो देण्यास आम्ही राजी आहों. जर दिलेल्या मुदतींत तुम्ही वर लिहिल्या प्रमाणें न कराल तर तुम्हावर रीती प्रमाणें दावा करण्यांत येईल. कळावें तारीख २० माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) वहिमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें तर्फे नरसिंगदास छबिलदास वहिवाटदार

नोटिस.

गुलाबराय गोविंदराम साहू दुकान अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, सन १८६८ सालांत ताजनापेठ बाजारांत दुकानें बांधण्यासाठीं जागा हरास झाल्या त्यांतील १८ नंबर तुम्ही आम्ही व गंगाधर जोरावरमल साहू असे त्रिवर्गांनीं किंमत रुपये ६०० सहाशास विकत घेतले व १ नंबर ३४ रुपयांला सलीमखान वल्द यांजजवळून घेतला त्याप्रमाणें आमच्या हिश्शाचे रुपये २०० आम्ही कमिटींत दाखल केले व ११।-॥ अक्षरी रुपये साडेपांच आणे सलीमखानचे रुपयांचे भरतींत दिले असून त्या अन्वयें आमचे हिश्शाचे जमीनीचे नंबर ६ आम्हास आजपावेतों न मिळतां तुम्ही उभयतां त्या सर्व नंबरांत दुकानें बांधून वहिवट करित आहा. पुष्कळ वेळा तुम्हास आम्ही आपले हिश्शाची जमीन अगर दुकानें मागितलीं असतां तुम्ही हो हो म्हणत गेलां पण दिली नाहीं करितां आतां या नोटिशीनें तुम्हास कळविण्यांत येतें कीं, आज तारखेपासून एक महिन्यांत आमचे हिश्शाचे सहा नंबरांची जागा आम्हास द्यावी. किंवा त्या जागेवर बांधलेलीं दुकानें द्यावींत. दुकानें बांधण्यास लागलेला खर्च वाजवी असेल तो देण्यास आम्ही राजी आहों. जर दिलेल्या मुदतींत तुम्ही वर लिहिल्याप्रमाणे न कराल तर तुम्हावर रीतीप्रमाणे दावा करण्यांत येईल. कळावें. तारीख २० माहे एप्रिल सन १८७८ इ.

(सही) वहिमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें तर्फे नरसिंगदास छबिलदास वहिवाटदार.

## वर्तमानसार

कोणी लष्करी आफिसर थोडी रजा मागतील व कारण पडल्या बरोबर २४ तासांत पुन्हा आपले कामावर हजर होतील असें असेल तर त्यांस रजा द्यावी असा ठराव झाला आहे.

मि. ए म्याकलिन यांस कलकत्ता हायकोर्टाचे आफिशि. जडज नेमिलें.

ले. कर्नल चापेन यांस हिंदुस्थानांतील तारायंत्राचे डायरेक्टर जनरल नेमिलें.

कर्नल आर एच किटिंग सी एस आय आसामचे चीफ कमिशनर यांस विलायतेस जाण्याकरितां २ वर्षांची रजा मिळाली असें समजतें.

विलायतेंत मि. आर्चिबल्ड फार्बेस साहेब यांचीं ७९ व्याख्यानें ऐकण्याबद्दल त्यांस २५००० रुपये देण्याचा ठराव झालेला आहे. व आगाऊ १०००० रुपये दिले आहेत.

लखनौचे पठाण लोक स्वतंत्र पलटण भरून रशियाची लढाई उत्पन्न झाल्यास आपणास पाठवावें असें सरकारास ह्मणत आहेत.

काश्मिराकडे जबरदस्त दुष्काळ झाला आहे. तेणेंकरून तिकडील हजारो लोक ब्रिटिश राज्यांत येत आहेत. व सरकार त्यांस जगविण्याविषयीं झटत आहे. उपासामुळें पुष्कळ लोक मेले. महाराजांनीं ४००० मण तांदुळ विपत्तिग्रस्त लोकांकरितां झिलमकडे पाठविले व रावळपिंडीकडे आणखी धान्य खरेदी करितां कामदार पाठविले आहेत.

हिंदुस्थान सरकारानें संकेतच्या राजास पदच्युत करून लाहोरास पाठविलें व त्याचा मुलगा लायक असल्यास त्यास गादीचा वारस करूं असें ठरविलें आहे.

कलकत्याहून तारायंत्रांतून असें वर्तमान आलें आहे कीं पुरीच्या राजानें एक खून केला त्याची चौकशी होऊन तो आरोप त्यावर शाबीद झाला व जन्मपर्यंत त्यास काळे पाण्यावर पाठवावें अशी शिक्षा झाली.

विलायतेंत शिवाय इतर ठिकाणीं रजेवर जे लष्करी कामदार आहेत त्यांनीं तावडतोब आपआपले कामावर हजर व्हावें असा त्यांचे वरिष्ट सरकारचा हुकुम झाला आहे.

मुंबईतील मेमण लोकांपैकीं एक श्रीमान गृहस्थ मि० हाजी इस्मायल हबीब यांनीं आपले जातींतील अनाथ लोकांची विपत्ती कांहीं कमी व्हावी ह्मणून दोन लक्ष रुपये धर्मार्थ काढिले आहेत.

कराचें एथें एका पारशाचे घरांत पुरून ठेवलेल्या द्रव्याच्या घागरी सापडल्या. ती रकम सुमार सहा सात लक्ष रुपये होईल तेथील नबाबानीं त्या द्रव्यावर कांहीं आपला हक्क सांगितला नाहीं. आतां ते घरवाले ते वाटून घेतील.

कराच्या संबंधानें सुरतेस जो मोठा दंगा झाला त्याची बातमी विलायतेस तारायंत्रानें समजली तेव्हां तिकडील लोकांस फार वाईट वाटलें. अशा प्रसंगास अशा दरम्यानपर्यंत मसलत यावयाची नव्हती असें तिकडील लोक ह्मणू लागले.

जुनागड संस्थानांत दुष्काळग्रस्त लोकांनीं तीन गाव लुटले व आणखी किती लुटतील याचा नेम नाहीं. व तेथील पोलिसाची व्यवस्था बरोबर नाहीं असें तारायंत्रांतून वर्तमान आलें आहे.

पंजाबचा सन १८७६।७७ सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून समजतें कीं त्या मुलखाचा वसूल ३४२६७०४७ रुपये आहे. या सालीं फार पाऊस पडल्यानें पुष्कळ नुकसान झालें व लोकांकडून शेतसारा बरोबर आला नाहीं चहाची लागवड त्या मुलखांत अधिकाधिक होत आहे. ७,६३,५६० रत्तल चहा या वर्षीं पिकला. गुरांनां तिकडे या वर्षीं मोठा रोग झाला होता व तेणेंकरून एका भागांत ४००० गुरें मेलीं.

अयोध्या प्रांताचे गयझिटियर नुकतेंच छापून प्रसिद्ध झालें आहे त्याचे मोठमोठे तीन भाग आहेत. व एकंदर माहिती त्यांत फार उत्तम आहे.

ब्रह्मदेशचा राजा वेळेविषयीं फार नियमित आहे त्याचे प्रधान एक वेळ वक्तशीर कामावर आले नव्हते तर त्यानें त्यांस थोडा वेळ कैदेंत ठेविलें होतें व नंतर ताकीद दिली कीं, यापुढें असें कोणी करील तर त्यांनां कैदेचीच सजा अधिक काल दिली जाईल.

पुणें जिल्ह्यांत घोडनदी तालुक्यांत जांबुद येथें ता. ४ रोजीं गारांचा मोठा पाऊस पडला. गुडघ्या इतका थर झाला होता व कांहीं गारा कवठा एवढ्या होत्या. फार नुकसान झालें. व २२० जनावरें मेलीं.

रा. रा. नारायण भिकाजी जोगळेकर जमखिंडीचे कारभारी हल्लीं पुण्यास आले आहेत त्यांस श्री. रा. आपा साहेब त्या संस्थानचे मालक यांणीं आणखी एक वर्ष आपल्याकडे ठेवावें अशाविषयीं सरकारास लिहिल्याचें समजतें.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, मिरज मळा संस्थानचे कारभारी रा. ब. भिकदेव वासुदेव आठल्ये हे विषम ज्वरानें ११ वे तारखेस मिरज मुक्कामीं मरण पावले.

मि० श्रीपाद बाबाजी ठाकूर विलायतेस जाऊन आले आहेत त्या संबंधानें ब्राह्मण लोकांनीं त्यांशीं अन्नव्यवहार करावा किंवा नाहीं असा प्रश्न निघाला होता त्याबद्दल स्वामी शंकराचार्य जगद्गुरू यांणीं ठराव केला कीं, त्यांस कर्म लोपापवादाचें प्रायश्चित्त देउन शुद्ध केलें आहे. सर्व ब्रह्मवृंदांनीं त्यांशीं यथापूर्व व्यवहार करावा.

गेल्याचे मागील बुधवारीं मुंबईचे टांकशाळेंतील एका कोठडीस आग लागली. वरील मजल्यांनीही पेट घेतला; परंतु लवकर समजल्यानें ती लागलीच विझली गेली. नुकसान सुमारें ३,००० रुपयांचें झालें.

वायव्य व बंगाल प्रांतांत लोक रूसा प्रीत्यर्थ जो अतिशय खर्च करीत असतात तो त्यांणीं न करण्या विषयीं मुनशी प्यारेलाल हे फार दिवसापासून खटपट करीत आहेत. हें कृत्य सफळ होण्याकरितां त्यांस मदत करावी ह्मणून बहारबदरभंगाचे महाराजांनीं १,००० व दुमरावाचे महाराजांनीं दरमहा ३० रुपये देण्याचे कबूल केलें आहे.

प्रेतें दहन करण्याची चाल युरोपांत अजून चांगली सुरू झाली नाहीं. गेल्या सालांत मिलन ( इतालि ) एथें सोळा प्रेतें दहन केल्याचें कळतें.

पुरी ( जगन्नाथ ) चे राजे व शिवाय चार असामी यांजवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा शाबीत झाल्यावरून त्यांस काळे पाण्याची जन्मठेप झाल्याची तार आली आहे. याबद्दल विशेष माहिती समजल्यावर पुढें लिहूं.

सन १८७७ सालांत फक्त पारीस शहरांत पैसे ठेवण्याच्या पिशव्या, घड्याळें वगैरे दुसरें सामान मिळून एकंदर १९ हजार नग पोलिसास रस्त्यावर पडलेले सांपडले. घड्याळें. दागिने वगैरे सामानापासून झालेल्या उत्पन्ना शिवाय फक्त पैशाचे पिशव्यांत ७३,९८४ फ्रांक ( नाणें ) सांपडले. ने. ओ.

---

## शेतकरी लोकांची दरिद्रावस्था.

हिंदुस्तानचे रयतेमध्यें कृषिकर्मावर उपजीवन करणारे लोकांची संख्या विशेष आहे असें अनुमान आहे व या लोकांची स्थिती अतिदुःखद असल्यामुळेंच या हिंदुस्थानांतील रयतेची स्थिति फार वाईट आहे व चोंहीकडे अन्न मगत होऊन गेली आहे. ज्या लोकांस या देशांतील दरिद्राचा व्हास करून लोकांस सुग्रास अन्न खावयास घालण्याची इच्छा असेल, ज्या हिंदूची किंवा युरोपियनलोकांची या आर्यभूमीस ऊर्जितदशेस आणण्याची मनीषा असेल व या देशाचे उन्नतीकडे ज्यांचें लक्ष लागलें असेल अशा सर्व लोकांनीं प्रथम शेतकरी लोकांची स्थिति चांगली करण्याकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. हिंदुस्थान देशांतील रयतेची निकृष्टावस्था दूर करून त्यांस सधन करण्याकडे पुष्कळ हिंदुलोकांचें लक्ष लागलें आहे येवढेंच नव्हे तर राज्यकर्त्यांचे वर्गांपैकीही पुष्कळ सद्गृहस्थांस या गोष्टीचा नाद लागला आहे. ब्राइट, फासेट इत्यादि सन्मणिमालेंत मि० डब्ल्यु० वेडरबर्न यांचीही गणना करण्यास लायक हे गृहस्थ आहेत असें यांच्या हिंदुस्थानांतील कृतीवरून वाटू लागलें होतें व त्या आमच्या या इच्छेचे दृढीकरणही होत चाललेलें आहे. ता. १३ मार्च रोजीं ईस्ट इंडिया असोसिएशन समोर कृषिकर्मोपजीवी लोकांची स्थिति सुधारण्यास पंचायत हेंच उत्तम साधन या विषयावर एक निबंध वाचला. या निबंधाची सरणी भाषा, व विषय प्रतिपादन उत्तमच आहेत असें ह्मटल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. देश सुधारणेच्या आज पावेतों ज्या अनेक गोष्टी निघाल्या व ज्या अमलांत आल्या त्या सर्वांत लवाद कोर्टापासून तावडतोब जसा फायदा दृष्टीस पडला व पडत आहे तसा इतर कोणतेही गोष्टीपासून पडला नाहीं, व पडेल असेंही वाटत नाहीं. या देशांत लवाद कोर्टें स्थापन करण्याविषयीं मि० वेडरबर्न यांचें पूर्ण मत होतें एवढेंच नव्हे तर एकदोन ठिकाणीं तर यांनीं स्वतः खटपट करून लवाद कोर्टें स्थापनही केलीं आहेत. मि० वेडरबर्न यांस या देशांतील लोकांची स्थिति उत्तम माहीत असल्यामुळें त्यांचे ह्मणण्यास विशेष मान दिला जाईल. ईष्ट इंडिया आसोसिएशन सभेचे योगानें या देशासंबंधीं बरीच माहिती विलायतेस प्रसृत झाली आहे व पुष्कळ होण्याचा संभव आहे. असें झाल्यानें आह्मा लोकांचे तक्रारीबद्दल आमचें सरकार लवकरच योजना करील अशीही आशा आहे. असो. मि० वेडरबर्न यांनीं वाचलेला निबंध फारच मोठा असल्यामुळें तो सारा भाषांतर करून घेतां येत नाहीं तरी त्यांतील मख्यमुख्य गोष्टी घेऊन वाचकांस त्या निबंधांतील आशय कळविण्याचा आमचा इरादा आहे.

"आमचे परकीय लोकांचें राज्य असल्या मुळें कित्येकांस तें पसंत पडणार नाहीं हे आह्मांसही माहीत आहे. ज्या कांहीं लोकांचे अमलानें पूर्वींची राज्यव्यवस्था चालत असेल अशा लोकांस अधिकार इतमाम वगैरे हल्लीं कांहींच नसल्यामुळें आमचें राज्य त्यांस चांगलें वाटत नसेल. तसेंच राजकीय किंवा लष्करी कामांत हात घालावा अशी ज्यांनी उत्कंठा असेल अशा लोकांसही आमचें राज्य आवडत नसेल. परंतु अशा वर्गाचे लोक खेरीज करून शेतकरी लोकांचे हित करण्याचा या राज्याचा मूळ संकेत असल्यामुळें या लोकांची स्थिति आजपावेतों चांगली झाली असावी. ते लोक सतत उद्योगी, मितव्ययी व हुकुमाचे बंदे असल्यामुळें हल्लींच्या अमलाखालीं ऊर्जित दशेस येऊन त्यांची भरभराटी असावी परंतु तसें नसून त्यांची स्थिति अगदीं उलट आहे. हिंदुस्थानचे सर्व भागांतून एकच हाकाक ऐकूं येत आहे. शेतकरी लोकांजवळ द्रव्य संचय नाहीं येवढेंच नव्हे ते दरिद्रांत बुडून गेले आहेत. व त्यांचे नेहमीचें रहाणें ह्मणजे केवळ निर्दय अशा सावकराचे व दिवाणी कोर्टांचे मेहेरबानीवर आहे. दिवाणी कोर्टांचे मदतीनें सावकार लोक आपले येण्याचे फेडी करितां या गरीब लोकांची भांडीं कुंडीं घरें दारें गुरेंढोरें विकून टकून त्यांचे घरादारांचा उन्हाळा करून टाकितात, ही वाईट स्थिति एका ठिकाणीं तर इतक्या पक्कयास येऊन पोंचली कीं, तेथील लोकांची स्थिति चांगली करण्याचा या सरकारचा इरादा असतांही या लोकांची अशी स्थिति कां व्हावी हा साहजिकच प्रश्न निघतो. सर्वच चांगले हेतु निष्फळ कां झाले असावे व चांगल्याचें बीजारोपण आह्मी करित असतां इतकी मोठी दुर्धर अवस्था कां प्राप्त व्हावी हें समजत नाहीं." येथपर्यंत विषयाचा उपोद्घात होऊन या नंतर विषयप्रतिपादन केला आहे. त विच्यार यथावकाश पुढील खेपेस देऊं. किरण.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २८ माहे एप्रिल सन १८७८ इसवी. अंक १७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचें अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लों-कांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## बुकविक्रीची जाहिरात.

आमचे छापखान्यांत खालीं लिहिलेलीं बुकें विक्रीस आहेत तीं रोख किमतीनें दिलीं जातील.

| बुकाचें नाव. | किंमत. रु. आ. |
|---|---|
| मुंबई इलाख्यांतील मुलकी सर्क्युलरें | ४ |
| क्रिमिनल प्रोसिजर टिपांसहित | ४ |
| पिनलकोड | १०४ |
| अबकारीचे नियम | ०६ |
| पोलिसाचे रूळ | ०२ |
| वसंतमाला | ०१० |
| रुक्मिणीहरण नाटक | १०४ |
| गोपीचंद नाटक हिंदुस्थानी | ०१० |
| विराटपर्व नाटक | ०१० |
| हरिश्चंद्रसत्वदर्शन नाटक | ०१० |
| सुहास्यवदना | ०८ |
| वालीवध नाटक | ०५ |
| मयूरकृत मंत्ररामायण | १०४ |
| सर्वसंग्रह वेगवेगळ्या कवींचीं आख्यानें | ०८ |
| सर्व संग्रह वामन पंडित कृत भाग १ ला. | ०१० |
| ,, ,, भाग २ रा. | ०१० |
| चतुःश्लोकी भागवत | ०६ |
| नलाख्यान मोरोपंती आर्या | ०३ |
| सिंहासनबत्तिशी हिंदुस्थानी | ०१२ |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०१० |
| रत्नमाला | ०५ |
| वेताळपंचविसी | ०४ |
| ध्रुवाख्यान | ००६ |
| हिंदुस्थानच्या स्थितीवर निबंध | ०१ |
| चक्रव्यूह | ०१०६ |
| व्यंकटेशस्तोत्र | ०१ |
| शिवसहस्रनामावली | ०२ |
| विष्णुसहस्रनामावली | ०२ |
| गायनप्रकाश | ०३ |
| रामनवमी कथा | ०१ |
| भूपाळ्या | ०१ |
| हारिपाठ | ००९ |
| हावर्ड कृत इं० तिसरे बुकाचें मराठी भाषांतर | ०१२ |
| धातुरूपावली | ०३ |
| लहान मुलाकरितां मूळाक्षरांच्या गंजिफा | ०२ |
| बालकाकरितां पहिलें पुस्तक | ०१ |
| अंकलिपी | ००९ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य | ०३ |
| बालज्ञान | ०१०६ |
| हावर्ड कृत १ ले बुकाचें म. भाषांतर | ०१०६ |

## नोटिसा.

रा. लक्ष्मण वल्लद सखाराम पापळकर रहाणार मूर्तिजापुर यास खालीं सही करणार रतनलाल भवानीराम मारवाडी दुकान कुरणखेड याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मापासून तारीख १५ माहे एप्रिल सन १८७८ इसवी रोजीं मूर्तिजापुर रेलवे स्टेशनावर ५० खंडी आळशी दर ३५॥ साडेपस्तीस रुपये प्रमाणें विकत घेतली व ती आळशी आह्मी तुह्मास ८ दिवसांनीं मोजून द्यावी व तुह्मी आह्मास सदरी लिहिल्या भावाप्रमाणें ५० खंडी आळशीचे रुपये आदा करून द्यावे असा करार ठरला. त्याप्रमाणें तारीख २२ माहे एप्रिल सन १८७८ इसवी रोजीं आळशीचें माप घेण्याकरितां आह्मी तुह्मास मूर्तिजापुरच्या स्टेशनावर बोलाविलें व तुह्मीही मापारी व पोतीं वगैरे घेऊन आला ह्मणून आह्मी ५।७ पोतीं फोडून मालाचा ढीग केला. तो माल जरी हालसालीं चांगला होता तरी भाव उतरल्या कारणानें तुह्मी तो खराब आहे अशी सबब काढून परत जाऊं लागला. तेव्हां तेथें दुसरे च्यार व्यापारी हजर होते व त्यांनीं तुह्मास हा हालसालीं माल मोजून घेण्यासारखा आहे असें सांगितलें पण तुह्मी ऐकिलें नाहीं व पोतीं घेऊन परत गेलां. ह्मणून या नोटिसीनें तुह्मास इतकेंच कळवितों कीं ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत सवदा झाल्याप्रमाणें ५० खंडी आळशी चवघे व्यापारी पसंत करतील असा पेठ चालीचा माल मोजून घ्यावा व रुपये द्यावेत. कारण तुह्माशी सवदा केल्यावर ही आळशी तुह्माकरितां शेट भवानी हिरजी याचे एथें मी मुद्दाम खरेदी केली आहे व त्यांचें रुपयांचा माझे मागें तगादा आहे. तर सदरी लिहिलेल्या मुदतींत जर तुह्मी माल मोजून घेऊन रुपये दिले नाहींत तर सदर्हू आळशी पेठेंत असलेल भावानें विकून टाकून रकम उभी करीन व त्यांत भाव मंदा झाल्या कारणानें जो तोटा येईल तो दिवाणी कोर्टांत तुह्मावर दावा करून रकमेच्या व्याजासुद्धां व कोर्टखर्चासुद्धां रकम भरून घेईन. या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल हें खूप समजावें कळावें, तारीख २४ माहे एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) रतनलाल भवानीराम मारवाडी दुकान कुरणखेड दस्तुर खुद्द

### नोटिस

बाळिराम वल्लद चिमणाजी सुतार रहाणार वाशीम यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी ता. १४ माहे अक्टोबर सन १८७८ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटिस सविस्तर रीतीनें दिली होती पण तिचा तुह्मी कांहीं जबाब न दिल्यामुळें आज ही दुसरी नोटिस मुद्दाम दिली आहे. स्वस्थ बसल्यानें कार्य भाग होतो अशी तुमची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कायदेशीर जें प्रकरण चालू झालें आहे त्याचा जबाब कायदेशीर रीतीनेंच तुह्मी दिल्यावाचून तुमचा कांहीं फायदा होणार नाहीं. तुमची कांहीं तक्रार असती तर ती तुह्मी मागेंच नोटिसीचे जबाबीं दाखल केली असती पण निरुत्तर आहा. याजवरून जें मागें मी तुह्मास कळविलें आहे तें सर्व खरें आहे व तुह्मास रुजू आहे असें मी समजते. तुमचे अंगीं संसारसंबंधी मुख्य गोष्टीचें न्यून असतांही मी केवळ आपल्या भलाईनें तुह्मास पतकरून तुह्मापाशीं रहाण्याचें मागील नोटिसींत कबूल केलें होतें पण तुह्मी बेमान आहा व तुह्मापाशीं भलाई कांहीं उपयोगाची नाहीं असें मला वाटूं लागलें आहे. सबब ही केवळ जाहिराती दाखल नोटिस दिली आहे तर ही पावतांच फारकत पाठवून द्यावी व खर्चाचे रुपये ५०० पाठवून द्यावे न दिल्यास योग्य मुदतपर्यंत वाट पाहून कायदेशीर रीतीनें दोन्हीचाही अंमल करून दुसरा घरठाव करण्याची तजवीज केली जाईल मग तुमचा मजवर कोणत्याही प्रकारें अंमल चालणार नाहीं. हें खूप समजावें. कळावें तारीख २५ एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) सई मर्दे बाळिराम सुतार रहाणार शिवणी निशाणी हातची बांगडी.

### नोटिस.

तानी मर्दे गंगाराम वाघ जात कुणबी हल्लीं मुक्काम अगर इला गंगाराम वल्लद सखाराम वाघ जात कुणबी रहाणार मौजे किनखेड तालुके अकोट याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं, तूं मला तारीख ७ माहे एप्रिल सन १८७८ इसवीच्या वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटिस दिली कीं. दोन वर्षांत मी ४ महिने तुझे एथें होतें, तूं चांगलें वागविलें नाहींस हाल केले व मजजवळ कांहीं नाहीं असें नोकला. दोन वर्षांत माझी परत केली नाहीं. इत्यादि गोष्टी लिहिल्या पण त्या सर्व खोट्या आहेत. तूं वारगळ वाईट चालीची बायको आहेस ह्मणून तुझ्यानें माझ्या गरीबाच्या संसाराचा निभाव होणार नाहीं हें मला पक्कें कळून आलें. तुझ्याकरितां मी आपलें कदीमचे रहाण्याचें गांव चिचोली सोडून एक वर्षापूर्वीं किनखेडे एथें रहावयास आलों व तेथें आपण एकत्रच होतों. सुमार तीन महिने झाले तूं माझे घरांतून निघून अगर एथें रहावयास गेली. तेथेंही मी तुला नेण्याकारितां दोन तीन वेळा आलों होतों पण तूं माझे घरीं आली नाहींस. एकंदर तुझ्या अंगच्या चलाख गुणानीं तूं माझे घरीं रहावयास लायक नाहींस ह्मणून तुजला इतकेंच कळवितों कीं, तुझे अंगावर माझे असलेले डागडागिने मला परत देऊन तुझे गंधर्वास माझे दोनशें रुपये खर्च झाले ते रोख आणून दे व तूं [illegible] कळी हो. या प्रमाणें तूं केलें नाहीं [illegible] फारकतीही द्यावयाचा नाहीं. दोन व[illegible] वींच शेकडो रुपये खर्च करून तुझ्याशीं गंधर्व केलें तें फारकती देण्याकारितां केलें नसेल. पण अशा वारगळ मनुष्याशी गाठ पडल्या मुळें तेंही करण्यास मी सिद्ध आहे. कारितां सुमार शंभर रुपयांचे डागिने व दोनशें रुपये खर्चाचे असे तीनशें रुपयांचा ऐवज लवकर आणून दे. त्या वाचून जर तूं गंधर्व करशील तर तुझ्यावर व तुझ्या साथीदारावर फौजदारी करून तुला ताबेंत घेईन. कळावें तारीख २५ एप्रिल सन १८७८ इसवी.

( सही ) गंगाराम वल्लद सखाराम वाघ याचे हातची असे.

### जाहिरात.

तमाम लोकांस जाहिर होण्यास्तव कळविण्यांत येतें कीं, अकोले मुनसिपाल कमेटीचे हद्दींतील पायखाने सफा करण्याचा व त्याकरितां लोकांपासून जो ठरावाप्रमाणें कर घेण्याचा तो वसूल करण्याचा मक्ता मुनसिपाल कमेटी देण्यास तयार आहे. ज्यास मक्ता घेण्याची इच्छा असेल त्यांणीं तारीख १२ माहे मे सन १८७८ चे आंत म्यानेजिंग कमेटीकडे अर्ज करावे मक्त्या संबंधी विशेष माहिती पाहिजे असल्यास मुनसिपाल आफिसांत कमेटीचे सेक्रेटरी यांजपासी मिळेल कळावें

अकोलें ता. १९ एप्रिल १८७८ — V. K. Desai. व्हाईससेक्रेटरी अकोले म्युनिसिप्यालिटी.

## लढाई

लढाई संबंधी याही आठवड्यांत निकराचें कांहीं वर्तमान नाहीं. जर्मनीचा बादशाहा, रशिया व इंग्लंड यांची लढाई होऊ नये याविषयीं खटपट करीत आहे व त्या खटपटींत यश येईल असा सुमार दिसतो. बर्लिन एथें प्रिन्स बिस्मार्क यांचे अध्यक्षत्वानें कानग्रेस भरण्याची वाटाघाट अजून चालूच आहे. व हिंदुस्थानांतून माल्टा एथें फौजा पाठविण्याची सरकारची कडेकोट तयारी झाली आहे व इतक्यांत मुंबईहून कांहीं फौज रवाना झाली असेल व बाकीची होणार आहे. परंतु ही सर्व रशियाचा अखेर जबाब मिळेपर्यंतची पूर्वतयारी आहे. ह्मणजे लढाई न करण्याचें ठरल्यास फौजा माघाऱ्या येतील. ही नवी लढाई उत्पन्न झाल्यास आपण अगदीं अलग रहावें व रशियाचा तहनामा मोडूं नये असें टर्किच्या मनांत असल्याचीं वर्तमानें बाहेर आलीं आहेत. त्यांचा बेकरबादशाहा विलायेस गेलेला आहे व त्याला त्यानें तावडतोब माघारें बोलाविलें आहे. व त्याला पोलिसचा मुख्याधिकार दिला आहे. हे बेकर बादशाहा आपल्या युवराजाच स्नेही आहेत त्यांकडे त्यांना मेजवानी झाली व सदरलंडच्या ड्युककडे मेजवानी झाली व इतर ठिकाणींही त्यांचें चांगलें आदरातिथ्य झालें. पार्लमेंट सभा मे महिन्याच्या ६ व्या तारखेपर्यंत एक व दुसरी १३ वे तारखेपर्यंत बंद आहेत.

इतकें लिहून झाल्यावर काल शुक्रवारचा टाइम्स पहाण्यांत आला त्यांतील तारबातमीचें स्वरूप कांहीं वेगळें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं रशिया इंग्लिश सरकारच्या बेतास मान्य होतां दिसत नाहीं व इंग्लिश सरकार त्याच्याच धोरणानें खचित वागणार नाहीं तेव्हां लढाई होईल असें वाटतें.

तुर्कस्थानांतील स्थिति दिवसानुदिवस बलदत चालली आहे व ती रशियास बाधक आहे. बलगेरियन लोकांनीं रोमेलियांतील मुसलमानांस फार त्रास दिला ह्मणून त्यांचा सुमार ३०००० जमाव होऊन एक मोठें बंड उभें राहिलें आहे. व त्यावर रशियन फौज सारी गुंतली आहे व आणखीही बाहेरून फौज आणविली पाहिजे व दुसऱ्याही एक दोन ठिकाणीं बंडें उद्भवलीं आहेत.

आस्त्रिया, इटाली व फ्रांस यांच्याशीं इंग्लिश सरकारचा चांगला मेळ आहे.

इराणचा शहा युरोपांत जाणार आहे व तो रशियांत पहिल्यानें जाईल असें ह्मणतात.

## वर्तमानपत्राविषयींचा नवा कायदा.

आलीकडे नुकताच नेटिव वर्तमानपत्राविषयीं सरकारानें एक कायदा केला आहे व तेणेंकरून त्यांच्या स्वतंत्रते संबंधी नाडी बऱ्याच आंवळून धरिल्या आहेत हे आमच्या वाचकांस माहित झाले आहे व तेणेंकरून कोणत्या पत्रावर केव्हां कशी गदा येईल याचा नेम नाहीं असा धाक सर्व आवळगून आहेत व ते त्यांचे उद्गार लोकदृष्टीस येत आहेत. कारण कायद्याच्या इतक्या थोड्या अवकाशांत मुंबई इलाख्यांत दोन, व बंगाल इलाख्यांत तीन पत्रें लयास गेलीं आहेत हा त्याचा केवढा भयंकर प्रताप आहे! व अशानें कोणाचें चित्त डगमगणार नाहीं? इतक्यांत प्रेस कमिशनर ह्मणून हिंदुस्थान सरकारच्या दिमतीस मि० लीथब्रीज साहेब यांची नेमणूक झाली याप्रमाणें वर्तमानपत्राच्या विरुद्धपक्षीं सर्व तयारी होऊन काम जारी आहे.

सरकारच्या इच्छेपुढें बापुड्या वर्तमानपत्रकर्त्यांनीं काय करावयाचें आहे? व सरकारानें एवढा जबरदस्त कायदा करावा असें मर्यादोल्लंघन तरी वर्तमानपत्र कर्त्यांकडून झाल्याचें विशेष कांहीं दिसण्यांत आलें नाहीं. तरी सरकारचीं कार्यें करणें व बेत आपणास कोठून कळणार? ह्मणून निमूटपणें कांहीं दिवस स्वस्थ बसून सरकारास आपली इमानदारी दाखवावी व दिल्या मर्यादेतच वर्तमानपत्रांचें काम चालवावें हें इष्ट आहे. सरकार दुसऱ्या देशचें व दुसऱ्या धर्माचें आहे. व आमचा देश अफाट, यांत जाति पुष्कळ, गैरमेळ फार ह्मणून सरकारास कदाचित् वाटत असेल कीं, नेटिव वर्तमानपत्रांतील कोणाएकाद्याच्या दूषित लेखावरून प्रजेत इंग्लिश राज्याविषयीं अप्रीति होऊं शकेल. व हल्लीच्या गडबडीच्या प्रसंगीं तसें होणें बिलकूल उपयोगी नाहीं; ह्मणून शेळीवर जाण्यात वाघावर जाण्याची सामुग्री तयार असावी. या हिशेबानें सरकारानें हा प्रेसआक्ट कडेकोट बंदोबस्ताचा केला असेल व थोड्या दिवसांत प्रसंगाचा रंग बदलला ह्मणजे सरकार पूर्ववत् कृपा करणार असेल. तरी आह्मी एकच गोष्ट सांगतों कीं, सरकारचे कोणा अधिकाऱ्यास सदरी सांगितल्याप्रमाणें संशय आला असेल तर येवो पण ज्यांना अक्कल ह्मणून आहे असे हिंदु लोक इंग्लिश राज्य नको असें कधीं ह्मणणार नाहींत, इतिहासांतून मराठी, व मुसलमानी राज्यांचे गुण आह्मी पाहिले, व अलीकडील काळांतही संस्थानें आणि इंग्लिश राज्य यांतील तफावत ह्मटली ह्मणजे अंधार आणि उजेड इतक्या फरकाची आह्मी पहात असतां आह्मांतून कोणासही अवदशेच्या व अस्वस्थतेच्या फेऱ्यांत आपण होऊन जावें असें सहसा वाटणार नाहीं हें खचीत. व या करितांच सदरील सरकारी अधिकाऱ्याचा तर्क खोटा आहे व वर्तमानपत्रांचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे असें आह्मांस वाटतें पण गोष्टीचा खुलासा आज व्याख्यानें देऊन होण्यापेक्षां प्रसंगाच्या पूर्ण अनुभवानें होऊं द्यावा हेंच अधिक चांगलें आहे असें आह्मी समजतों.

कलकत्यास या आक्टा विरुध्द विलायतेस अर्ज पाठविण्याच्या विच्यारासाठीं एक मोठी टौलेजंग सभा भरली होती व तींत अर्ज पाठवावे असें ठरलें. मुंबईस वर्तमान पत्रकर्त्यांची सभा भरली होती पण या सभेनें तूर्तच्या खवळाखवळीच्या प्रसंगांत अर्ज वगैरे कांहीं करूंनये असें ठरविलें. आतां पुण्याची सार्वजनिक सभा लोकसमाज मिळवून अर्ज करण्याच्या तयारींत आहे. या प्रमाणें लोकांचे प्रयत्न चालले आहेत. विलायतेस पार्लमेन्ट सभेंत या कायद्याची गोष्ट निघाली होती तेव्हां किंत्येक योर गृहस्थांस या कायद्याचें मूलतत्व आवडलें नाहीं. व त्यांनीं हिंदुस्थान सरकारास जरा दोषही दिला तरी त्यांस असें वाटलें कीं, कायदा करणें हिंदुस्थान सरकारास जितकें चांगलें नाहीं तितकें किंवा त्याहूनें अधीकच तो केलेला कायदा रद्द करविणें विलायेत सरकारास चांगलें नाहीं. इतकी विचक्षणा होऊन गोष्ट तहकुब राहिली व याचा हिंदुस्थान सरकारच्या मनावरही चांगला परीणाम झाला असें दिसून येऊन आह्मास संतोष होतो.

प्रेस आक्ट मध्यें ईलाख्याच्या सरकारास मोकळीक दिलेली आहे कीं, त्यांनीं नजरेस येईल त्याप्रमाणें कोणत्याही नेटिव वर्तमान पत्राचा योग्य परीणाम करावा, पण थोड्याच काळांत त्या अधिकाराचा उपयोग व्हावा त्याहून अधिक झाला असें हिं० सरकारास वाटलें किंवा दुसरें कांहीं कारण झालें न जाणो, हिंदुस्थान सरकारानें नवीन ठराव केला कीं, इलाख्याच्या सरकारास या बाबदींत स्वतंत्र मुखत्यारी नाहीं. त्यांनां वर्तमान पत्रांविषयीं कांहीं तजवीज करणें असेल तेव्हां ती करण्या पूर्वीं हिंदुस्थान सरकारची त्यानीं मंजुरात घेत जावी. कोणा वर्तमानपत्र कर्त्याचे, हा कायदा ठरण्या पूर्वींचे लेख दूषित होते हें मनांत आणून त्याविषयीं इलाख्याच्या सरकारानें कांहीं विच्यार करूं नये. चालु लेखाचे विद्यमान कालापुरते गुणदोष पहावे, मागील उखाळ्या पाखाळ्या काढू नयेत अशा मतलबाचा हिंदुस्थान सरकारानें नवीन ठराव केला आहे असें समजतें. आणि आजच्या काळास हें इतकेंच जरी झालें आहे तरी पत्र कर्त्यांवर पुष्कळ कृपादान झालें असें आह्मी समजतों व हिंदुस्थान सरकारचे आभार मानितो.

## शंकराचार्य.

जगद्गुरुशंकराच्यार्य हे आमच्या हिंदु धर्माचे गुरू आहेत. ज्याला जे कर्ममार्ग लाऊन दिले आहेत त्यांचे बाह्य आचरण कोणा कडून झाल्यास त्याना शासन करणें, शुद्ध करणें, अनुज्ञा सांगणें हीं कामें जगद्गुरूचीं आहेत. व तीं ते शेकडो वर्षें उत्तम रीतीनें करीत आले आहेत. ह्मणून आमचे लोकांची त्यांच्या ठिकाणीं मोठी श्रध्धा आहे व कालमानानें सर्वांस नाहीं तरी बहुतांस त्यांचा बचक आहे. व असें आहे ह्मणूनच धर्म संरक्षण बहुत कालमर्याद होईल असें मानण्यास आधार आहे. कोणतीही कामें शिरावर स्वामी असल्या वाचून चांगलीं होत नाहींत. त्यांतून धर्माचें काम तर फार नाजुक आणि लक्षावधि लोकांच्या समूहाचे तेव्हां त्याला स्वामीची आवश्यकता विशेषच; याप्रमाणें श्री मच्छंकराचार्य स्वामी आपले हिंदु धर्मास आहेत व लोक त्यांची आज्ञा पाळितात ही मोठी महत्वाची व संतोषाची गोष्ट आहे.

शंकराच्यार्यांपुढें आलीकडे मागच्या पेक्षां नवीन तऱ्हेचे विषय जाऊं लागले व ते प्रांजलपणें त्याचा विच्यार करून देशकालानुरूप योग्यायोग्य ठरवूं लागले हें ही प्रस्तुत एक मोठें उमेदीस कारण होत चाललें आहे. पुनर्विवाह स शास्त्र किंवा अशास्त्र या विषयीं स्वामी सन्निध वाद व्हावा अशी दोहोंतर्फेच्या मंडळीनीं आपली इच्छा दर्शविली ती त्यांनीं मान्य करून पुण्यास ९।१० दिवस सभा चालवून आपले समक्ष वाद होऊं दिला हें एक मोठेंच काम स्वामींनीं केलें तेणेंकरून जुन्या मताच्या तर सर्व लोकांची उत्तम श्रध्धा स्वमीवर राहिली. व नव्यांतही बहुतप्रकार झाले. कोणास शंका राहिल्या कोण स तो विषय भ्रामक वाटला, कोणास विधवाच्या विवाहास शास्त्रार्थ स्पष्ट नसावा असें वाटलें, कोणास स्वामीचा निर्णय मानूनये असें वाटलें, व विधवांचा कळवळा बाळगणाऱ्या बाका सर्व लोकांस असें वाटलें कीं, हे पुनर्विवाहोत्तजक लोक शास्त्रार्थाचे बंड पुढें न आणते व जगद्गुरूस विनविते कीं, विधवांचे दुःख प्रलाप कानावर घेऊन सदय अतःकरणानें त्या शोक सांगरांत गटकळ्या खाऊन बुडत असलल्यांचा उत्धार करा, त्या तुमच्या धर्म कन्या कोना कोपऱ्यांत दडून राहील्या आहेत, त्यांचे केवळ दर्शन अमंगल झालें आहे, त्यांच्या सौभाग्यावर दरवडा पडला आहे, मंगल स्नानानें अवभृत होणारे त्यांचे उत्तम केशकलाप यांवर दुष्ट नापिकाच्या प्रखर शस्त्रांचा हल्ला झाला आहे व त्यांच्या नेहमीच्या खाण्यापिण्यावर व लेण्या नेसण्यावरही घाला आला आहे तर अशा भयंकर स्थितींतून बाहेर काढण्यास तुह्मी जगद्गुरू त्यांचे मायबाप आहा, कोपऱ्यातल्या उतरंडीच्या मडक्याची स्थिति त्यांस आली आहे तींतून काढून त्यांस उजेडांत व मनुष्यांत आणा, जुन्या शास्त्रार्थांचा जीर्णोधार करा, व पुन्हा जगद्गुरूचें नाव या भूमंडलावर अमर करा असें ह्मणून सर्व पुनर्विवाहोत्तेजक लोक स्वामीच्या चरणीं दंडप्राय झाले असते तर त्यांस दया आली असती व निदान अल्पवयी बाल विधवांस तरी अनुकुल असा कांहीं शास्त्रमार्ग त्यांनीं आज्ञापिला असता असें आह्मास वाटतें. अस्तु-

दुसरी गोष्ट, अलीकडे ब्राह्मण लोक विलायतेस जाऊं लागले आहेत व तसे अपयात्रित झाल्यानें ते धर्माचरणास दूषित होतात असें समजून त्यांच्याशीं इतर लोक अन्न व्यवहार करीत नाहींत, किंवा त्यांस कोणी शुद्ध करीत नाहींत ही गोष्ट बिच्याऱ्या मुंबईकर वासुदेव बाबाजी नवरंग्याच्या प्रकरणावरून आह्मास माहित झालेली आहे. ते गृहस्थ विलायतेहून आले व बहुत ब्राह्मण लोकांचे त्यांनीं आर्जव केले कीं आह्मांस पावन करा, आह्मी अमार्ग कांहीं केला नाहीं, पण त्यांची गोष्ट कोणी कानावर घेतली नाहीं व स्वामी महाराजाकडे त्यांची दाद लागली नाहीं तेणेंकरून त्यांस दाढी व पाटलूण वापरून ब्रह्मो व्हावें लागलें. ह्मणजे ब्रह्मसमाज पंथांत ते शिरले.

पण अलीकडे विलायतेहून आलेल्या एक दोन गृहस्थांची स्वामी शंकराच्यार्यांनी चांगली दाद घेतली हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

रा. रा. गणेश सिताराम शास्त्री इंदुराहून तेथील राजाज्ञेनें विलायतेस गेले होते ते परत आल्यावर स्वामींनीं त्यांस पंक्तीपावन केलें व अलीकडे सोलापुरचे असिस्टंट कलेक्टर रा. ए. श्रीपाद बाबाजी ठाकूर विलायतेहून आलेले पंढरपुर मुक्कामीं पंक्तीपावन करून घेतले त्याजबद्दलचें स्वामीचें आज्ञापत्र आह्माकडे आलें आहे त्यांत ते स्पष्ट लिहितात कीं, जर कोणी या आज्ञे खेरीज वागेल तर त्याजला संस्थानांतून शिक्षा मिळेल. वा:! हीतों गोष्ट फार चांगली झाली !

या बाबदींत रा. रा. श्रीपादराव यांजकडूनही आह्मांस पत्र आलें आहे त्यांत ते स्पष्ट लिहितात कीं, " आतां विलायतेस जाण्यास कोणास कांहीं हरकत राहिली नाहीं. हें स्वामीच्या आज्ञापत्रावरून सिद्ध आहे. व ही गोष्ट एतद्देशीय लोकांस मोठ्या महत्वाची आहे सबब सर्वत्र प्रकट व्हावी " हें त्यांचें ह्मणणें शब्दश: खरें आहे. व या प्रसिद्धीकरणानें पुष्कळ तरुण विद्वान लोक विद्याभ्यासाकरितां, परीक्षा देण्याकरितां व देशव्यवहाराकरितां विलायतेस जाण्याचे कामीं धर्मबाह्य होण्याची भीती मानित आहेत ती आतां टाकून देतील व धडका विलायतेस जाऊं लागतील आणि तिकडील ज्ञान, विद्या, कलाकौशल्य व सोयी आपल्या राष्ट्रांत आणून देशाचा फायदा करतील, व तसें सत्वर घडून येवो असें आह्मी इच्छितों.

आमच्या अकोल्यासही प्रस्तुत एक शंकराच्यार्य आले आहेत त्यांनीं गावांतील भिक्षुक मंडळींतील दुफळीचा निकाल केला. व गृहस्थ, भिक्षुक, ग्रामस्थ, परस्थ सर्वांनीं स्वामीचें तीर्थ घ्यावें असें ठरविलें ह्मणतात. आतां या ठरावाचा अंमल कसा होतो पहावें.

---

**अकोलामार्केट**—ताजना पेठेंत बाजाराची नवीन तऱ्हेची टुमदार मांडणी मे० दस्तुर बहिमनजी साहेब म्युनिसिप्यालिटीचे व्हाइस प्रेसिडेंट यांच्या बेतबातानें चालू आहे तो सर्वलोकांचे पहाण्यांत आजीकडे आलीच असेल. त्यांनीं व्यापारी लोकांस उत्तेजन देऊन त्यांकरवीं सुंदर व भव्य दुकानें पांच पन्नास हजार रुपये किमतीचीं उभीं केलीं व पुढें चौफेर सुधारणा करण्याचा त्यांचा क्रम चालू आहे. त्यांच्या प्रयत्नाची मोठी कमाल आहे. लोकांनीं खरेदीचे कामीं पड घेतली कीं कमिटीचे खर्चानें ते असें सुशोभित व मनोरम काम उभे करून देतात कीं त्याला गिराईक मी मी ह्मणत पाठीस लागून येतात व असें झालें ह्मणजे बहिमनजी साहेब तीं दुकानें विकून त्यांच्या नमुन्यांत त्यांच्या शेजारीच दुसरी दोन च्यार बांधविण्याची व्यापाऱ्याकडून खटपट करवितात. पुढें पूर्ववत आणखीं क्रम सुरू. या प्रमाणें आज दोन वर्षें त्यांची पराकाष्ठेची मेहनत सुरू आहे. लोखंडी मार्केटच्या चौफेर आखणी त्यांनीं मोठी छानदार केली आहे व थाड्या कालांत तथील सर्व कामें पुरी झाल्यावर या बाजारची शोभा अनुपम दिसेल व त्या योगें आमच्या बहिमनजी साहेबाचें नाव अजरामर होईल यांत संशय नाहीं. आह्मी आपल्या पूर्ण अनुभवावरून खात्रीनें सांगतो कीं, हें सुमार लाख रुपये खर्चाचें काम लोकांनीं केवळ बहिमनजी साहेबांच्या वजनदारीवर, भलाईवर, बोधावर, व युक्ती प्रयुक्तीवर केलें आहे. व ही मनोहर व उत्तम कृति दुसऱ्या कोणाकडून ही झाली नसती. आतां या लिहिण्यांत आह्मी दुसऱ्या थोर अधिकाऱ्यांची निंदा करितों किंवा बहिमनजी साहेबाची उगीच तारीफ करितो असें काडीमात्र नाहीं. त्यांची कृति आह्मांकडून असें वदविते.

परवा शुक्रवारीं मार्केटांत दोन जागा ६०० रुपयांस विकल्या. व मे महिन्याचे १५ वे तारखेस आणखी कांहीं विकावयाच्या आहेत आतां जागा थोड्या राहिल्या आहेत. तेव्हां राहिलेल्या व्यापारी लोकांनीं ती संधी अवश्य साधावी हें बरें. कारण तो बाजार दिवसानुदिवस भरभराटीचा होईल असें दिसतें.

---

## कृष्णाकुमारीकाव्य.

### श्लोक

कल्याणी महिषासुरप्रमथनी,
शत्रू हत्या होउनी ।
अस्ताव्यस्त नगाब्धिही विखरितां,
शृंगादिकें ताडुनी ॥
भ्याले देव, तथापि निर्भयमनें,
दैत्यावदे " गर्व हा ।
साराज्ञाडिन वीरपाण करूनी "
ते धैर्य देवो महा ॥ १ ॥
अत्यद्भुत प्रियशिशुस्तव वस्तु बाप ।
जोडी तिला जरि दुजे झटती उमाप॥
हेवा मिटो ह्मणुनि ती लपवावि त्यानें।
कृष्णाकुमारि तशि संहरिली विधीनें ॥२॥
कड्यामाजी मल्ली रुचिरतरवल्ली निपजली।
न वायूनें नेला परिमल न प्याला रस अली
जिचा ती प्लक्षादि प्रखरतर वृक्षावृत वृथा।
परीणामा पावे पुढिल मन भावे तशि कथा
॥ ३ ॥
कृष्णानाम कुमारिका बहु जिची
तृष्णा गुणांला असे।
त्या रूपादि गुणीं तियेस वरिलें
मेरूस देवीं जसें ॥
राजे तीस अनेक फार भुलले,
माजे तयांभीतरी, ॥
वैराग्री, तंव भीरु बापचि तिच्या
लावी गळ्याला सुरी ॥ ४ ॥
संक्षेप हा ज्या इतिहासकाचा ।
तो वर्णितों यास्तव देव वाचा ॥
देवो मला सज्जन रंजवाया ।
येवोत त्यामाजि न शब्द वांया ॥५॥
भूलोक हा एक महा भुजंग,
समुद्र वृत्ताकृति तें तदंग ॥
पृथ्वी फणा त्यावरि सत्य जाणा,
या रूपकातें उपजे शहाणा ॥ ६ ॥
जे रम्य ते देश तियेंत रत्ने,
तीं लाभलीं ज्या मनुजा अयत्नें ॥
ते भोगिती भोग सुखें अनेक,
देवांहि त्यांची चिडवील नेक ॥ ७ ॥
असे देश जे लोकविख्यात मोठे,
तयांमाजि मेवाड हा, हें न खोटें ॥
धनें सर्व धान्येंहि तेथें अपार
ह्मणोनी जनांमाजि उत्साह फार ॥८॥
चारी जाती वर्तती स्वस्वधर्मीं,
नाहीं कोणी दुष्ट हिंसादि कर्मीं ॥
ऐशायोगें शांति तेथें विराजे
तेणें त्याची कीर्ति सर्वत्र गाजे ॥ ९ ॥
उदेपूर जें त्याचि ती राजधानी
तिथें नांदती सर्व विद्याभिमानी ॥
तयाकारणें होतसे ज्ञानवृद्धी
ह्मणोनी अविच्छिन्न संपत्समृद्धी ॥१०॥
पदार्थ जे शोभविती पुरास
ते सर्व तेथें असती, घरास
शोभा जिहीं तेहि तसेच भारी
कृतार्थ तेणें नर आणि नारी ॥११॥
उपवनें पवनें हळु डोलती
मधुपर भ्रमर स्वर बोलती
भ्रमकरें मकरें क्षुभितांभ त्या
श्रमहरा सरसा न कधीं रित्या ॥१२॥
मधुमनें धुम नेलि मधुव्रतें
मधुतती धुत तीव्र तृषा, रितें
अणु नव्हे परि तोयज एकही
अशी समृद्धि सरीं अणिका न ही १३

---

## वऱ्हाड.

कमिशनर साहेब व जुडिशियल कमिशनर साहेब यांच्या स्वाऱ्या चिखलदऱ्यासच आहेत.

---

आमचे निजाम सरकारास इंग्लिश सरकारानें विच्यारलें आहे कीं कारण पडल्यास आपल्या फौजे पैकीं कांहीं फौज लढाईवर पाठविण्यास द्याल किंवा कसें, त्यावर निजाम सरकारानीं सांगितलें कीं आह्मी संतोषानें आमची फौज आपणास देऊ. असें जामेजमशेद पत्रावरून ज्ञानसमध्ये लिहिलें आहे.

---

रेसिडेंट साहेबांच्या कन्येचें हैदराबादेस १२ वे तारखेस लग्न झालें. रायल हार्स आर्टिलरी पैकीं मेजर केन हे जामात झाले. लग्न समारंभ अति उत्तम झाला.

---

रा. रा. विष्णु गोविंद वैद्य अकोल्यांच इनच्यार्ज स्टेशनमास्तर यांची सोलापुरास गुडस क्लार्कचे जागेवरबदली झाली.

---

**ज्ञानसंग्रह**— आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं ज्ञानसंग्रह नावांचे उपयुक्त मासिक पुस्तक मागें एथें निघत असलेलें पुन्हा निघण्याची तयारी झाली आहे. हें विद्याखात्याच्या मंडळीस भूषण होय. हें लवकर निघो व दीर्घकालमर्याद चालो असें आह्मी इच्छितों.

---

मलकापुरचे मास्तर रा. रा. हरि मोरेश्वर शेवडे यांनीं मे महिन्यापुढें खासगी कामाकरितां सहा महिन्यांची रजा घेतली आहे. तिजमध्यें ते कोंकणांत घरीं जाणार.

---

वऱ्हाडांत अफूचा पेरा या पुढें कोणी करूं नदे असा सरकारचा हुकूम झाला आहे.

---

रा. रा. लक्ष्मण गोविंद फडके वाशिमचे डे. इ. इन्स्पेक्टर २ दिवसाचे रजेवर एथें आले.

---

( रेसिडेन्सी आर्डरवरून )

मि० इनायत हुसेन उमरावतीचे तहशिलदार यांस तारीख १६ एप्रिल पासून किंवा ते लागू करितील तेथपासून ५३ दिवसांची हक्काची रजा मिळाली व त्यांच्या गैरहजरींत मि० गिरराव रामचंद्र उमरावतीचे डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट हे काम पहातील.

मि० पी चामरेट वणीचे सिविल सरजन यांस १५ दिवसांची हक्काची रजा मिळाली व त्यांचे गैरहजिरींत आस्पिटल असिस्टंट इनक शाद्राक हे काम पहातील.

मि० इ मोफट चे पोलिस सुपरइंटेंडेंट यांस विलायतेस जाण्याकरितां एक वर्षा रजा मिळाली.

क्या० सी. बी. युआन स्मिथ सी एस आय थर्ड क्लास आफिसियेटिंग पोलिटिकल एजंट व फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट हे मि. ग्रांटचे वर्गावर्गीत आफिशियेटिंग सेकंड क्लास पोलिटिकल एजंट झाले.

मि० सी भिमराव अमरावतीचे अस्त्रानी यांस सेकंड क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार व दिवाणी एक हजार रुपये पर्यंत अधिकार मिळाले.

---

NOTICE.

Offers to supply the Akola Central Jail with the following articles on the termes mentioned below For 1 year commencing from the 1st June will be received by Superintendent of the Jail up to 8 o'clock on the 15th May 1878.

2. The rates at which articles to be supplied are to be paid for will be determined month by month by the price current supplied by the Deputy Commissioner.

3. The Contractor to find himself to errect a godown outside the Jail and to keep in it a supply equal to two days consumption of all the articles specified in the dietary scale attached except those of a perishable nature subject to a penalty of Rs. 50 for each day the default is incurred

4. That prior to goods being storred in the godown they shall be passed by the Supreintendent whose decision will be final.

5. That personal security to the extent of Rs. 1000 be furnished for the due performance of the Contract.

6. No advance of cash will be made to Contractor. Payment of articles supplied will be made as soon as possible after the 1st of each month.

7. The Superintendent reserves to himself the right of annulling any contract at any time should occasion arise

C. Davies
Superintedent Central Jail

---

## वर्तमानसार.

जुनागड संस्थानांत दुष्काळ पडला असल्या मुळें बेबंद कारभार झाला आहे. हातु लोकांनीं ९ गाव लुटले पण सरकारांतून त्यांची चांगलीशी तजवीज झाली नाहीं.

मद्रासेहून २१ वी काळी पलटण मालटा ऐथें जावयाची तिजमध्यें मिसळून आह्मास न्यावें अशी १९ वे पल्टणींतील लोकांनीं सरकारास आग्रहपूर्वक विनंती केली तीवरून १०० लोक तिच्यापैकीं नेण्याचा विच्यार झाला आहे.

राव राजे सर दिनकरराव श्री क्षेत्र-काशीस गेले आहेत.

नाशकाजवळ भगूर ऐथें व भुसावळ पलीकडे खंडव्यास पल्टणीच्या मुक्कामासाठीं जागा केलेल्या आहेत. त्या शिवाय नेटिव फौजेसाठीं हल्लीं विगतपुरीस विश्रांतीचा तळ केला आहे.

मार्च अखेर भरलेल्या सालाचे हिंदुस्थानांतील जंगल खात्याचें उत्पन्न ६९,९२,९०० रुपयांचें झालें व खर्च ४९,६७,३९० रुपये झाला. ह्मणजे सुमार वीस लक्ष रुपयांचा या खात्यांतून सरकारास फायदा झाला.

पुरीच्या राजाला खुनाचे अरोपावरून काळे पाण्याची शिक्षा झाली आहे तिजवर राजानें अपील केलें आहे त्याची चौकशी २६ वे तारखेस होणार होती. व अपिलाचा निकाल होईपर्यंत शिक्षेचा अमल आपणावर होऊं नये असें त्याचें मागणें होतें तेंही सरकारानें त्यास दिलें.

अमेरिकेकडे एकत्र संस्थानांत गोठमोठाल्या खरेद्या करण्याची गर्दी उडून गेली आहे. इग्लिश सरकार धान्य वगैरे घेत आहेत व रशियन सरकार क्यनेन व इतर औषधी घेत आहेत.

मागील गुरुवारीं स्वर्गवासी विनायकराव जगन्नाथ शंकर शेट यांचे कुटुंब लक्ष्मीबाई यांणीं रा० बाळकृष्ण गणोबा यांचा पुत्र सिताराम हा दत्तक घेतला. समारंभास सर्व जातीचे पुष्कळ हिंदु लोक आले होते. नाना शंकरशेट यांचा वंश कोणत्या तरी प्रकारें पुढें योग्य रीतीनें चालेल तर सर्व महाराष्ट्र लोकांस आनंदच होणार आहे. या समारंभांत रा० बाबाजी काशिनाथ किंवा नानाचे इतर कोणी जामात वगैरे संबंधी दिसून आले नाहींत ह्मणून मात्र आह्मास वाईट वाटतें. सु. प.

मिस मेरी कारपेंटर या प्रसिद्ध बाईचे स्मारक कृप्रासाठीं विलायतेस फंड जमा होत आहे. त्याबद्दल २२,४८,१३० रु० गोळा झाले आहेत.

कान्स्टांटिनोपल येथील पत्रावरून समजतें कीं, युरोपांत लढाई झाल्यावर तुर्कस्थान अगदीं निराळें रहाणार आहे. कारण या देशास आतां लढाईचा कंटाळा आला आहे. तसेंच रशिया बरोबर झालेल्या तहांत व्यत्यय न येईल अशीही तजवीज करणार आहे. किरण.

ब्रह्मदेशचे राजानें उत्तम धुवा साखर करण्याचें कारखाने घातले आहेत. इं. प.

चिनी सरकार व काशगरचे अमीर बेगकुली बेग यांत लढाई सुरू असल्याचें वाचकांस माहित आहे. हल्लीं असें कळतें कीं, चिनी फौजेनें त्या लोकांची कत्तल केल्यामुळें सुमारें ३०,००० मोगल रशियाचे सरहद्दींत पळून गेले असून रशिया त्या लोकांचें संगोपन करीत आहे; व पुढें त्या लोकांच्या आपल्या राज्यांत निरनिराळ्या ठिकाणीं वसाहती करणार आहे असे समजतें.

सन १८७६–७७ त सेपटेंबर महिन्याचे अखेरीपर्यंत या देशांत सुमारें २,००,००० रुपयांचा विलायती साबू या देशांत आला व देशी साबू २,९०००० रुपयांचा परदेशीं गेला. ज्या पदार्थांचा साबू बनवतात ते सर्व इकडेस मिळतात परंतु तो उत्तम तऱ्हेचा बनविण्याची कृति आमचे लोकांस माहित नाहीं तरी आमचे लोकांनीं तिकडेस विशेष लक्ष द्यावें.

फाशीची शिक्षा बंद करण्याविषयीं विलायतेंतील कांहीं लोक आज बरेच दिवस खटपट करीत आहेत. या संबधानें कायद्याचा एक मसुदा पार्लमेन्ट सभेपुढें थोड्या दिवसांपूर्वीं आला होता; परंतु सभेपैकीं बहुतेक लोकांनीं तो नामंजूर केला ह्मणून कळतें. युरोपांतील ज्या देशांत ही शिक्षा बंद आहे त्यांचीं नावें;— पोर्तुगल हालन्ड, बेलजम; रोड्स नांवाचे बेट. टस्कनी, व मिचिगन ( अमेरिका ).

ने. ओ.

## देशभाषांतील वर्तमानपत्रकर्त्यांचें हल्लींच्या स्थितींत कर्त्तव्य.

कितीएक लोकांस असें वाटत होतें कीं, हिंदुस्थान सरकारानें देशभाषांतील वर्तमानपत्रांच्या संबंधानें केलेला कायदा विलायतेंत रद्द होईल आणि सरकार हा नवीन कायदा कदाचित् अमलांत आणणार नाहीं; परंतु ही अनुमानें व्यर्थ आहेत असें बहुतेक लोकांस वाटावयास लागलें आहे आणि ती त्यांची कल्पना गैर आहे असें ह्मणतां येणार नाहीं. हिंदुस्थान सरकारानें विलायतेंतील वर्तमानपत्रें व लोक यांचें मत अनुकूल करून घेऊन व स्टेट सेक्रेटरी यांची संमत्ती मिळवून एतद्देशीय वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर एकदम व एकाएकीं घाला केला. आतां आमच्या लोकांनीं पार्लमेंट सभेस तूर्त अर्ज करण्यापासून विशेष उपयोग होईल असा संभव दिसत नाहीं. यद्यपि विलायतेंतील योग्य व खऱ्या उदार मनाच्या इंग्रज लोकांस वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याच्या नष्टतेचा प्रकार पसंत नाहीं व कधींही आवडणार नाहीं; तथापि स्वार्थ व राज्याच्या स्थैर्याची आशा हीं फार जबरदस्त आहेत आणि त्यांचे बुजगावणें हिंदुस्थानच्या अधिकाऱ्यांनीं पुढें आणिल्यामुळें त्यांस मुकाट्यानें बसावें लागेल. वर्तमानपत्रांच्या या प्रतिबंधानें इंग्लंडचें हित होऊन त्यांचें राज्य दृढ राहील अशी त्यांची समजूत झाल्यामुळें तेथील लोक हिंदुस्थान सरकारच्या या कामांत हात घालणार नाहींत. आतां आमच्या एथील सरकारास तरी एवढें काय व कां वाटलें हें समजत नाहीं; तथापि त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें योग्य असा ह्मणून बंदोबस्त केला तेव्हां आतां आह्मी विशेष कुरकूर करून उपयोग व फायदा नाहीं. तसेंच हा कायदा अमलांत येणार नाहीं ह्मणून संशय होता त्याचेंही बंगाल्याकडील सहचार या पत्राच्या परिणामावरून निराकरण झालें. बंगाल इलाख्यांत आणखी कांहीं पत्रांविषयीं वाटाघाट चालली आहे असें ह्मणतात. सारांश अशा अडचणीचा विचार करून व सरकारचा आंतील काय खरा उद्देश व त्यांच्या या विचाराचें कारण हीं आपणांस समजत नाहींत हें मनांत आणून आपल्यास कांहीं तरी निराळ्या प्रकारचें वर्त्तन करणें प्राप्त आहे.

आतां आह्मी आपल्या बंधुवर्गास इतकेंच ह्मणतों कीं, अशा प्रसंगीं आपलें कर्तव्य काय याचा विचार सर्वांनीं केला पाहिजे आणि या संबंधानें उद्गार सर्वांचे बाहेर पडल्यावांचून कोणत्या रीतीनें आपण वागावें, कशाविषयीं लिहावें व कोणत्या प्रकारानें व झोकानें वर्तमानपत्रांतील लेख लिहावें याचा निर्णय व्हावयाचा नाहीं. तेव्हां सर्वांनीं शांतपणानें विचार करून व देश, लोक, सरकार, या सर्व संबंधाकडे लक्ष पुरवून आपलें कर्तव्य काय आहे हें ठरविलें पाहिजे. याचा इत्यर्थ ठरण्याकरितां सर्व पत्रकर्त्यांनीं आपापले अभिप्राय प्रगट केले पाहिजेत. शिवाय सर्व सुज्ञ व स्वदेशहितेच्छु व विद्वान् लोकांनीं आपल्याकडून योग्य सूचना केल्या असतां अशा प्रसंगीं त्याचे देशावर, लोकांवर व वर्तमानपत्रकर्त्यांवर मोठे उपकार होतील तेव्हां यासंबंधानें आह्मांस वाटतें तें आह्मी विनयपूर्वक आमच्या बंधुवर्गापुढें ठेवितों.

आमच्या देशांतील वर्तमानपत्रांचें कर्त्तव्य काय याचें एकदम व थोडक्यांत अनुमान करणें फार कठीण आहे. कारण आमच्या देशाची व लोकांची स्थिति फार चमत्कारिक आहे. प्रथम हा प्रकार मुळीं नवीनच या देशांत असल्यामुळें लोकांमध्यें वर्तमानपत्रांविषयीं रुची उत्पन्न करावयाची हें पहिलें काम आहे. नतर यांच्या योगेंकरून लोकांमध्यें सर्व प्रकारच्या ज्ञानाचा प्रवेश करावयाचा आणि लोकांचें मत बहुतेक गोष्टींविषयीं ठरवावयाचें. शिवाय त्यांचे बरे वाईट उद्गार व त्यांच्या स्थितीविषयीं हकीकत सरकारास कळवून सरकारांत प्रजेची दाद लावावयाची. त्याप्रमाणें सरकारच्या कृतीविषयीं व हेतूविषयीं लोकांची खरी समजूत व्हावी ह्मणून प्रयत्न करावयाचा. याखेरीज उद्दीम, धंदे, व्यापार वगैरे वाढून देश व लोक स्थिति सुधारण्याकरितां लोकांस सूचना करून उत्तेजन द्यावयाचें. सारांश जेणेंकरून देशाचें व लोकांचें हित व सुधारणा होऊन आमचा देश व लोक युरोपांतील वगैरे थोर व सुधारलेल्या राष्ट्रांच्या योग्यतेस यावे आणि रयत व ज्या सरकाराशीं ईश्वरेच्छेनें आमचा संबंध झाला तें सरकार यांजमध्यें प्रेम व एकविचार वाढून उभयतांचे हित व्हावें. आतां हीं व आणखी कितीएक आमचीं कर्त्तव्यें आहेत तेव्हां यांजपैकीं राजकीय संबंधाचा प्रकार आपल्यास तूर्त बंद झाला; तथापि लोकहिताचे व ज्ञानप्रसाराचे प्रकार आणि उद्योग, धंदे, व्यापार यांजकडे विशेष लोकांचे लक्ष वळविण्याचें वर्तमानपत्र कर्त्यांचें मुख्य कर्तव्य या प्रसंगीं आहे असें आह्मांस वाटतें. या गोष्टीकडे व विद्यावृद्धीकडे वगैरे आमचें लक्ष असावें तितकें पूर्वीं नसून राजकीय कामावर विशेष वहर होता तरी अवश्य जीं आपलीं देशहिताचीं कामें त्यांजविषयीं लिहिण्याचा प्रकार चालविला पाहिजे. राजकीय संबंधानें ज्या गोष्टी घडून येतील तेवढ्या केवळ वर्तमानाप्रमाणें कळवून स्वस्थ असलें पाहिजे. आज कडक समय आहे तेव्हां तूर्त थंडपणानें सर्व घेऊन पुढें सरकारचें मन थोडें थंड झालें ह्मणजे वर्तमानपत्रांस पूर्वींप्रमाणें स्वातंत्र्य देण्याविषयीं विनंती करण्यास लोकांस हरकत नाहीं व सरकारी कामगार व उदार इंग्रज लोक यांचीं मनें वळून कदाचित् पूर्ववत् स्वातंत्र्यही मिळेल. यास्तव या प्रसंगीं थंडपणानें व इतर देशहिताच्या गोष्टींविषयीं मजकूर लिहिणें हें आमचें कर्तव्य आहे असें आह्मांस वाटतें. ने. ओ.


## जाहिरात.

NOTICE.

THE BANK OF BOMBAY.

The Khamgaum Branch is prepared to receive Fixed Deposits on the terms noted below:—

For 6 Months certain at 3 per cent per-annum.

For 12 Months certain at 4 per cent per-annum.

For Sum of Rupees 5000, and upwards other arrangements may be made by addressing the under signed.

Harry H. Hynes
Agent.

Khamgaum,
19 th November 1877.

## जाहिरात.

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून या पासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ८६ सहा आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज, व नायेट यांजवरही चांगले प्रकारें लागूं होतें.

*** या गजकरणाच्या औषधाच्या डब्या दोन वर्षां पूर्वीं आमचे छापखान्यांत विक्री करितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलीकडे सदहू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी ह्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत ता. १८ एप्रिल सन १८७८ इसवी.


हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.